JCK-श्री
7-73

श्रीद्वारकामाई संशोधनांक

R. No. 387

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष १४] चैत्र, वैशाख व ज्येष्ठ [अंक १, २ व ३

शके १[illegible]

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमिह सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका

C.B.SATPA...
COLLECTOR OF
- SEP 1938
BOMBAY
O. T.
30 SEP 1938
III
1938

संपादकः—रामचंद्र रामकृष्ण सामंत

# कै. श्री संत भाऊमहाराज कुंभार

कळविण्यास दुःख वाटतें कीं, श्रीक्षेत्र शिरडी येथें येणारे भक्तांचे विशेषतः श्रीरामनवमीच्या उत्सवाच्या वेळीं येणाऱ्या यात्रेकरूंच्या परिचयाचे श्रीसाईभक्त श्रीसंतभाऊमहाराज कुंभार हे ता. २७।४।३८ रोजीं बुधवारीं दुपारीं ४–१५ वाजतां समाधिस्थ झाले. त्यापूर्वीं कांहीं दिवस ते तापानें आजारी होते.

त्यांची स्मशानयात्रा श्रीसाईबाबांच्या प्रेरणेनें श्री. र. भा. पुरंदरे व श्रीक्षेत्र शिरडी येथील ग्रामस्थ मंडळींनीं उत्तम व यथायोग्य रीतीनें पार पाडली. सुमारें चारपांचशें मंडळी हजर होती. त्यांच्या अंतकालाच्या बाराव्या दिवशीं ता. ८।५।३८ रोजीं रविवारीं पुरुषांचा भंडारा झाला. चारपांचशें पात्र झालें. तेराव्या दिवशीं ता. ९ रोजीं सोमवारीं स्त्रियांचा भंडारा थाटाचा झाला. श्रीशिरडी कमिटीतर्फे चिटणीस श्री. खारकर या कार्याकरितां मुद्दाम गेले होते. स्थानिक सभासदही होते. स्थानिक ग्रामस्थांनीं मेहनत घेऊन कार्य चांगलेंच साजरें केलें.

कै. श्रीसंत भाऊमहाराज यांची समाधि लेंडीबागेच्या वाटेवर निंबवृक्षाखालीं नानावली यांच्या पश्चिम बाजूस दिली आहे. समाधीचें बांधकाम भक्तवृंदांच्या मदतीनें रीतसर केलें जाईल व त्या कामानिमित्त वर्गणी आल्यास ती साभार स्वीकारली जाईल.

—संपादक



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वता योजनैकं ।
प्रादुर्भूत्वाऽस्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

शके १८५९ ] श्रीसद्गुरु साईनाथ [ वर्ष १४ अंक १–२–३

# श्रीदत्तचित्साइसद्गुरुभ्योनमः

## शिरडी येथील नेहमीं निवास करीत असलेल्या मशिदीला बाबा द्वारकामाई कां म्हणत याबद्दलचें संशोधन

पुराणवस्तु संशोधन प्रियविषय–विद्वान पंडितांना वरील संशोधन खात्रीनें अत्यंत महत्त्वाचें व अप्रतिम मोलाचें वाटेल. इतरांस तें फोल, नीरस व रुक्षहीं वाटेल. पण त्याला कोणाचा इलाज नाहीं. तथापि कसेंही असलें, तरी या संशोधनानें बाबांच्या भक्तजनांना, बाबांच्या अतिमर्त्य, अतिमानुष, अतिपौरुष ज्ञानाचें निःसंशय साश्चर्य व सानंद कुतूहल व समाधान वाटेल.

कोणतेंही संशोधन लोकादराला पात्र होण्यास माझ्या अल्प समजुतीप्रमाणें तें, भूगर्भशास्त्र, इतिहास,–पुराण, संतवचन व प्रतीति या तीन किंवा चार कसोटयांना उतरलें पाहिजे. आतां वरील संशोधन या सर्व कसोटयांस उतरलें, तर तें सितोपला व पय यांच्या सुंदर संमिश्रणाप्रमाणें अमृततुल्य गोड, मधुर, स्वादिष्ट व रुचकर होईल यांत शंका नाहीं.

वरील कसोटयांपैकीं या संशोधनाला तूर्त तरी संतवचन, पुराण, निसर्ग व अल्पप्रतीति याच कसोटयांचा मुख्य आधार आहे. तो खालीं लिहिल्याप्रमाणें तोंडी व लेखी आहे. सहृदय व तज्ञ वाचकवृंदांनीं व प्रेमी भक्तजनांनीं याचा निःपक्षपातबुद्धीनें पूर्ण विचार करून आपलें मनोगत प्रकट करावें. व ज्यांना यासंबंधीं जास्त माहिती असेल, ती त्यांनीं कृपेनें प्रसिद्ध करावी. अशी नम्र व सविनय प्रार्थना आहे.

बाबा शिरडींत आल्यापासून समाधिकालापर्यंत क्वचित् प्रसंग खेरीज करून, ज्या मशिदींत अखंड निवास करीत, त्या मशिदीला ते कधीं द्वारका, कधीं द्वारकामाई, कधीं द्वारकामाता, व कधीं द्वारावती या नांवानें संबोधीत. ही गोष्ट शिरडींत व इतरत्र हल्लीं हयात असलेल्या श्री. माधवराव बळवंत देशपांडे, तात्याजी गणपतराव पाटील कोते, बाळोबा काशीराम शिंपी, बयाजी पाटील कोते, रघूजी पाटील शिंदे, व रघुवीर भास्कर पुरंदरे आदि करून पुष्कळ भक्तजनांनीं अनेक वेळां ऐकिली आहे. कै. भक्तश्रेष्ठ श्री. गोविंद रघुनाथ ऊर्फ अण्णासाहेब दाभोळकर यांनीं, या द्वारकामाईचें सामर्थ्य, वैभव व योग्यता बाबांनीं स्वतः ज्या एका प्रसंगीं वर्णन करून त्याची प्रत्यक्ष प्रतीति कै. भक्तवर्य श्री. बाळासाहेब मिरीकर यांना व माधवराव देशपांडे यांना दाखविली त्या लीलेचें वर्णन, आपल्या श्रीसाइसच्चरिताच्या बाविसाव्या अध्ययांत सविस्तरपणें केलें आहे. तेंच मी खालीं या गोष्टीचा पुरावा म्हणून जसेंच्या तसें देत आहें. बाळासाहेब मिरीकर त्या वेळीं कोपरगांवचे मामलेदार असून त्यांचा मुकाम चितळी स्टेशनजवळील श्रीमारुतीच्या देवालयांत होता. तेथून शिरडी नजीक असल्यामुळें ते बाबांच्या दर्शनाकरितां त्या दिवशीं आले होते. दर्शन झाल्यावर परत जाण्यास बाबांची त्यांनीं आज्ञा मागितली. जा, पण शाम्याला बरोबर घेऊन जा, असें बाबा म्हणाले. त्यप्रमाणें बाळासाहेब माधवरावास बरोबर घेऊन गेले.

बाळासाहेब बाबांच्या जवळ बसले असतांना बाबांनीं त्यांना द्वारकामाईचा अद्भुत शक्ति व पुढें त्याच दिवशीं रात्रीं होणारें भविष्य स्वमुखानें कथन केलें. तें असें:—

**" बाबा मिरीकरांस ते ठायीं । पुसती प्रश्न नवलाई ॥**
**अहो ती आपली द्वारकामाई । आहे कां ठावी तुम्हातें ॥ ४५ ॥**
**बाळासाहेबास हा कांहीं । मुळींच उलगडा झाला नाहीं ॥**
**तंव बाबा वदती आतां पाही । द्वारकामाई ती हीच ॥ ४६ ॥**
**हीच आपली द्वारकामाता । मशीदीचे या अंकीं बैसतां ॥**
**लेंकुरां देई ती निर्भयता । चिंतेची वार्ता नुरेची ॥ ४७ ॥**

---

१ व २ कोंपरगांवचे त्या वेळीं असलेले मामलतदार बाळासाहेब मिरीकर. ३ मशीद हीच द्वारकाबाई. ४ मांडीवर.

मोठी कृपाळू ही मशीदमाई । भोळ्या भाविकांची ही आई ॥
कोणी कसाही पडो अपायीं । करील ही ठायींच रक्षण ॥ ४८ ॥

एकदा हिचे अंकीं जो बैसला । बेडें तयाचा पार पडला ॥
साउलींत हिचे जो पहुडला । तो आरूढला सुखासनीं ॥ ४९ ॥

हीच द्वारका, द्वारावती । बाबा मग तयांस देती विभूती[3] ॥
अभय हस्त शिरीं ठेविती । जावया निघती मिरीकर ॥ ५० ॥

आणीक वाटलें बाबांचे जीवा । मिरीकरातें प्रश्न पुसावा ॥
ठावा कां तुज लांबे[4]-बुवा । आणीक नवलावा तयाचा ॥ ५१ ॥

मग मूठ वाळूनि उजवा हात । कोंपरापाशीं उजवे हातांत ॥
धरूनि फिरवीत, मुखें वदत । ऐसा भयंकर असतो तो ॥ ५२ ॥

परी तो काय करतो आपलें । आपण द्वारकामाईचीं पिलें ॥
कोणा न उमगे तिचें केलें[6]। कौतुक उगलें पहावें ॥ ५३ ॥
द्वारकामाई असतां तारिती । लांब-बाबा काय मारिती ॥
तारित्यापुढें मारित्याची गती । ती काय किती समजावी ॥ ५४ ॥

—श्रीसाईसच्चरित अध्याय २२

बाबांच्या मुखांतले वरील शब्द मींही ऐकिले असतील. पण मला ते पूर्णतः स्मरत नाहींत. मी बाबांच्या पुण्य नगरींत सन १९१० पासून जाऊं लागलों. पण माझा मुक्काम तेथें वर्षाकाठीं ७ किंवा ८ दिवसांपेक्षां केव्हांही जास्त नसे. कै. बाळासाहेब यांची गोष्ट मात्र मी श्री. माधवराव देशपांडे यांचे तोंडून बाबांचे हयातींत व बाबा समाधिस्थ झाल्यावर पुष्कळ वेळां ऐकली आहे.

यात्रेकरितां म्हणून मी सन १९२५ च्या डिसेंबर महिन्यांत प्रथम श्रीद्वारका क्षेत्रीं गेलों. पण तेव्हां द्वारकासंशोधनाची गोष्ट माझ्या मनाला मुळींच शिवली नव्हती. सन १९३० च्या ऑक्टोबर महिन्यांत श्रीसाईसच्चरिताचा ५३ वा अवतारणिकाध्याय तयार करण्याकरितां मी जेव्हां इतर सर्व अध्यायांबरोबर २२ वा अध्याय मनन करून वाचूं लागलों, तेव्हां बाबा शिरडींत ते बसत असलेल्या मशीदीला द्वारका कां म्हणत, याबद्दल विचारतरंग मनांत घोळूं लागले, व आजपर्यंत बुद्धिवान, विद्वान, कल्पक अशा बाबांच्या चाणाक्ष भक्तगणांच्या विचारपथांत हें अत्यंत महत्त्वाचें संशोधन कसें आलें नाहीं याचें

१ जन्ममृत्यूचें संकट. २ बाळासाहेबास. ३ उदी. ४ साप. ५ करणी. सामर्थ्य. प्रभाव. शक्ति. ६ उगाच.

कारण न उमगल्यामुळें बरीचशी खिन्नता व निराशा वाटूं लागली. पुराणवस्तुसंशोधन हा माझा विषय नसल्यामुळें वरील गोष्टीचें संशोधन कसें करावें हें मला समजेना. जरी माझा हा विषय नाहीं, तरी पूर्वीपासून मला या गोष्टींचा थोडासा नाद तर खराच.

चि. जानकीबाई जठार, एल्. सी. पी. एस्. लेडी डॉक्टर जामनगर ( माझ्या कन्या ) यांना भेटण्याकरितां मी सहकुटुंब सन १९२२ सालांत जामनगराला गेलों, व तेथून श्रीकृष्ण परमात्मांची पुण्यनगरी नजीक असल्यामुळें मी पुन्हा द्वारकाधीशाच्या दर्शनाकरितां द्वारकेला गेलों. बाबांच्या वचनसंशोधनाला प्रारंभ कोणत्या दिशेनें व कोणाजवळ व कसा करावा हेंच मला निश्चित कळेना. पंडे लोकांत तपास केला. श्रीद्वारकामहात्म्य वाचलें. पण कांहींच मागमूस लागेना. मी परत आलों.

श्रीकृष्णपरमात्मा निजधामाला गेले, तेव्हां त्यांनीं मूळ द्वारका–सोन्याची द्वारका समुद्रांत बुडविली, व कांहीं कालानें कलियुगाच्या प्रारंभीं निष्ठावंत, प्रेमी व ज्ञानवान् अशा कांहीं ऋषिमंडळीच्या प्रेमाग्रहावरून व विनंतीवरून परमात्मांनीं समुद्रापासून पुन्हा जागा मागून घेऊन त्या जागेवर विश्वकर्म्याकडून दुसरी द्वारका बनवून घेतली, व हल्लीं जी आपण पाहतों तीच दुसरी द्वारका, असें श्रीमद्भागवतांतील कांहीं कथाभागावरून दिसतें.

मूळ द्वारका कोठें होती हें हल्लीं उपलब्ध असलेल्या कोणत्याही ग्रंथावरून खात्रीशीरपणें कळून येत नाहीं; तेव्हां बाबांच्या वचनाप्रमाणे ती पूर्वीं नगर जिल्हा ज्या भूभागांत आहे तेथेंही असूं शकेल. त्यांतील कृष्णपरमात्माचें मंदीर ( राजवाडा ) हल्लीं नगर जिल्ह्याच्या ज्या भूभागांत शिरडी गांव आहे, तेथेंही असूं शकेल, व त्या मंदिरांतील कृष्णपरमात्माची खास बसण्याची जागा शिरडींतील बाबा बसत असलेल्या मशीदभूभागांत असूं शकेल व निजावयाची जागा, एका दिवसाआड ज्या चावडींत बाबा निजावयास जात असत, तीही असूं शकेल.

पण ह्या सर्व कल्पना आहेत. तर्कसुद्धां नव्हेत. आतां बाबांच्या वचनाप्रमाणें कोणत्या तरी काळीं मूळ द्वारका येथें होती असें मानलें, तर ज्या अर्थीं परमात्मा निजधामास जाण्यापूर्वीं त्यांनीं ती समुद्रांत बुडविली असें पुराणांतरीं वर्णन आहे, त्याअर्थीं ती कोठें तरी समुद्रभागाजवळच होती हें निश्चित. नगर जिल्हा महाराष्ट्रांत आहे. तेव्हां मूळ द्वारका जर समुद्रांत असेल तर महाराष्ट्र हा केव्हां तरी एका कालीं समुद्रांत किंवा जलमय असला पाहिजे असें अनुमान साहजिक निघतें. बाबांनीं मुखाक्षरें सदैव सत्य व अमोघ. तीं अन्यथा कधींही होणार नाहींत ही बालंबाल खात्री. पण महाराष्ट्रांत दर्या येणार कोठून ? दर्या ( पश्चिम समुद्र अरबी समुद्र ) व महाराष्ट्र यांच्या दरम्यान निसर्गानें दक्षिणोत्तर असंख्य वर्षांपूर्वींपासून मानदंडाप्रमाणें

एक अवाढव्य, अभेद्य व अजस्र असा उन्नतोन्नत सह्य पर्वत उभा करून ठेविला आहे. हा पश्चिम समुद्र व महाराष्ट्र यांत कमीत कमी तरी १७५ ते २०० मैलांचें अंतर आहे. तेव्हां बाबांच्या वचनाला मेळ बसावा कसा, असें वाटून माझ्या वृत्तीला पुनरपि साशंकतेनें, निराशेनें व उदासीनतेनें ग्रासलें.

पण या शंकेचें पुढें थोड्याच कालांत अल्पसें निराकरण होऊन माझे आशेचे किरण निराशेच्या व उदासीनतेच्या काळ्याकुट्ट ढगांतून थोडथोडे बाहेर डोकावूं लागले.

श्रीनर्मदा खोरें संशोधनमंडळाचे प्रशस्य सचिव (ऑनररी सेक्रेटरी) धर्मवीर कै. विष्णु रघुनाथ ऊर्फ बापूसाहेब करंदीकर, सातारा, यांचा पूर्वी महाराष्ट्रांत गोड्या पाण्याचा समुद्र होता अशा आशयाचा, हिंदुस्थानची अतिप्राचीन कालची अमोल इतिहाससंपत्ति जीं पुराणें, त्यावर आधारलेला लेख ता. १७ ऑगस्ट १९३४ चे केसरी पत्रांत प्रसिद्ध झाला. हा लेख मी कै. भूगर्भशास्त्रज्ञ श्री. रामचंद्र आत्माराम ऊर्फ बाबासाहेब तर्खड यांच्या नजरेला आणिला. या लेखावरून पूर्वी केव्हां तरी महाराष्ट्रांतील नगर जिल्ह्यांत बाबांच्या वचनाप्रमाणें द्वारका असावी या माझ्या अनुमानास बाबासाहेबांनीं बरीचशी पुष्टी दिली. त्यामुळें या कामीं जास्त शोध करण्यास मला बराच हुरूप व उमेद आली. बाबासाहेबांचा ता. ११-४-३६ रोजीं टाइम्स ऑफ इंडियांत " Ahmednagar District Research " या शीर्षकाखालीं प्रसिद्ध झालेला इंग्रजी लेख पाहा.

नंतर याच वर्षांत म्हणजे सन १९३४ सालांत श्रीमती विदुषी काशीबाई कानिटकर, पुणें, यांनीं त्यांचे बाबांच्या संबंधाचे सन १९०९ ते १९१३ च्या दरम्यानचे आपल्याला आलेले आठ अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां बाबासाहेब तर्खड यांच्याकडे पाठविले. त्याप्रमाणें ते अनुभव श्रीसाईलीला वर्ष ११ जोड अंक २-३-४ यांतील पान ७३ ते ८० वर प्रसिद्ध झाले. ते मीं काळजीपूर्वक वाचले. त्यांपैकीं नंबर ६ व नंबर ८ हे संशोधनार्ह आहेत असें वाटून नंबर ६ च्या अनुभवांतील लीलेच्या संशोधनार्थ सामग्री गोळा करूं लागलों. इतक्यांत श्री. रावबहादुर वासुदेव अनंत बांबर्डेकर, वांद्रें, यांनीं त्याच अनुभवासंबंधानें बाबासाहेब तर्खड यांना लिहिलेलें ता. २८-९-३४ चें पत्र बाबासाहेबांनीं मजकडे पाठविलें; यांत मीं तें संशोधनकार्य हातीं घ्यावें अशी रावबहादुरांची सूचना होती. त्यावरून मला एकप्रकारचें प्रोत्साहन मिळून मी माझ्या अल्प समजुतीप्रमाणें व जमविलेल्या अल्प सामग्रीप्रमाणें त्या संशोधनाला लागलों. व त्यासंबंधानें मला जी प्रत्यक्ष तोंडी व लेखी माहिती मिळाली, ती मीं " बाबा हिंदु का मुसलमान व श्री. सखारामहाराज कवाडकर हे बाबांचे गुरुबंधु होते की काय ? अनुमान करा " या शीर्षकाखालीं श्रीसाईलीला मासिक वर्ष १२ जोड अंक १-२ यांत प्रसिद्ध केली. ती जरी अपुरी

आहे, तरी त्यांतील अल्पसंशोधनामुळें श्रीमती विदुषी काशीबाई कानिटकर यांच्या नंबर ८ मध्यें लिहिलेल्या "( छातीला हात लावून रागाच्या आवेशांत मजकडे तोंड करून जोत्यावर उभे राहून ) हा ब्राह्मण आहे. शुभ्र ब्राह्मण आहे. काळ्या वस्तूचा ह्याला संबंध नाहीं. हा शुभ्र ब्राह्मण. मुसलमान येथें पाय काय टेंवील ? त्याची बिशाद काय येथें येण्याची ? हा ब्राह्मण ( छातीला हात लावून ) लाखो जणांना शुभ्र मार्गावर लावून पोंचविणारा आहे. शेवटपर्यंत पोंचविणारा आहे. ही ब्राह्मणाची मशीद आहे. ह्या मशिदीवर काळ्या मुसलमानाची सावली सुद्धां पडूं देणार नाहीं." अनुभवांतील बाबांच्या वरील मुखोद्गाराकडे व ही मशीद द्वारकामाई आहे ह्या त्यांच्या वचनाकडे साहजिक रीत्या पण प्रामुख्यानें माझें लक्ष खेंचलें गेलें, व ज्या अर्थी बाबा छातीला हात लावून ही मशीद ब्राह्मणाची आहे, ही काळ्या मुसलमानाची नाहीं, व ही द्वारकामाई आहे असें वारंवार म्हणतात त्या अर्थी समुद्रांत बुडविलेली मूळ द्वारका तरी एके काळीं येथें असली पाहिजे किंवा हल्लींची द्वारका निर्माण होण्यापूर्वी किंवा निर्माण झाल्यानंतर पुढें केव्हां तरी श्रीकृष्ण परमात्मांनीं कांहीं तरी कारणाकरितां या भागांत दुसरी एखादी द्वारका निर्माण केली असावी असें मनांत येऊं लागलें ! परंतु हीं निवळ अनुमानें आहेत; त्यांना सिद्धांत स्वरूप येण्यास भूगर्भशास्त्र, इतिहास किंवा पुराणें यांचा आधार पाहिजे व तो आपल्या-जवळ मुळींच नाहीं. म्हणून पुनरपि आशेचे किरणांकुर सुकून व करपून जातात कीं काय अशी भीति वाटूं लागली. तथापि बाबांच्या वचनावर पूर्ण निष्ठा, भरंवसा व श्रद्धा ठेवून सबुरी धरून उद्योगाला लागावें अशी जोराची प्रेरणा झाली. तरी पण हा उद्योग म्हणजे सुकाणूवांचून दर्यांत टाकलेल्या होडग्याप्रमाणें आहे असें वाटे.

असो. मी पुन्हा मुलीला भेटण्याकरितां जामनगरास गेलों; तसाच तेथून सन १९३५ च्या फेब्रुवारी महिन्यांत पुन्हां तिसरे वेळीं श्रीद्वारकाधीशाचे दर्शनाकरतां द्वारकेस गेलों पुन्हा पंडे लोकांत व इतर लोकांत तपास केला, व श्री द्वारकामहात्माचा पुन्हा काळजी-पूर्वक अभ्यास केला. पण संशोधनकार्यास त्यापासून कांहीं उपयोग झाला नाहीं. परत आलों.

त्याच वर्षी म्हणजे सन १९३५ सालीं जून महिन्यांत ता. ३० रोजीं द्वारकेच्या अलीकडे ५–६ स्टेशनें खंबालिया म्हणून जामनगर द्वारका ( जे. डी. ) रेल्वेवर एक मोठा गांव आहे, तेथें मुलीला भेटण्याकरितां गेलों, व तेथें या संशोधनानिमित्त एक महिनाभर मुकाम केला. खंबालियाचे प्रांत ऑफिसर श्री. पद्मभा खेंगारजी भाईसाहेब, तेथील हायस्कूलचे हेडमास्तर श्री. प्रतापराय रेंदाणीसाहेब, व रेल्वे इंजीनियर श्री. बक्षीसाहेब यांच्या गांठी घेतल्या. त्यांनीं मला या कामीं फार मदत केली व कामाची दिशा दाखविली त्यांच्याच सांगण्यावरून नंतर मी तेथूनच दुसऱ्या दिवशीं चवथ्या वेळीं द्वारकेस जाऊन द्वारकेचे रहिवासी श्री. कल्याणराय नथूभाई जोशी बी. ए., हेडमास्तर

दिसनगर ह्यांची गांठ घेतली. हे वैष्णव ओदिच ब्राह्मण असून त्यांचें वय अजमासें ४५–५० वर्षांचें आहे. त्यांचा ऐच्छिक विषय शास्त्र–Science. पण ह्यांना संशोधनाचा नाद फार. व ह्यांचें संशोधन म्हणजे मूळ द्वारका कोठें होती हेंच. हे आज १५–२० वर्षें हेंच कार्य करीत आहेत. मूळ द्वारकेसंबंधानें ह्यांचीं तीन अनुमानें आहेत. ( व हीं बहुधा श्रीस्कंदपुराणातील प्रन्हादसंहितेंतील द्वारका महात्माचा अध्याय २५ च्या आधारें काढिलेलीं दिसतात ) पहिलें, मूळ द्वारका ही हल्लींची जी द्वारका आहे, तेथेंच पूर्वी असावी. दुसरें, ती हल्लीं द्वारकेपासून २०–२५ मैलांवर असलेल्या ओखा बंदरावर असावी. तिसरें. गिरनार पर्वताजवळ जो रैवत पर्वत आहे, तेथें असावी. श्रीकल्याणराय यांचें, हल्लीं श्रीमंत बडोदेसरकारच्या परवानगीनें व आश्रयानें हल्लींच्या श्रीद्वारकाधीशाचे मंदिरामागेंच उत्खननाचें काम चालू आहे. यांनीं या संशोधनसंबंधीं इंग्रजींत एक निबंध लिहिला असून यांत त्यांनीं पूर्वी इतर दुसऱ्या गोष्टींबरोबर यादव वंशापैकी क्षत्रप कुलांतील उषवदत्त राजाचें राज्य अहमदनगर जिल्ह्याच्या बाजूला होतें व त्याच्या मुलीवरून त्याचा व द्वारकेचा संबंध होता, असें दाखविलें आहे. हे मुंबईच्या एल्फिन्स्टन कालेजचे पदवीधर आहेत. यांना मराठी चांगलें येतें. ते बाबांचे भक्त आहेत. बाबांबद्दल त्यांना त्रोटक माहिती आहे. त्यांनीं मज-कडून श्रीसाईसच्चरिताची एक प्रत विकत घेतली. मी त्यांना साईबाबा आफ् शिरडी या पुस्तकाची एक प्रत, श्रीसाईबाबा पुण्यतिथि आख्यान व श्रीसाई दत्ताख्यान व आणखी कांहीं श्रीसाईलीलेचे अंक, त्यांची बाबावर असलेली भक्ति पाहून, नजर केले. ते व मी त्यांच्या दर्याकाठीं बांधलेल्या उद्धव निकेतन बंगल्यांत तीन तीन तास प्रमाणें दोन दिवस ( ता. १ व २ जुलै रोजीं ) याच संशोधन विषयावर बोलत बसलों होतों. मूळ द्वारकेचें संशोधन कार्य आमचें असतां तुम्ही या कार्याकरितां इकडे कसें आलां म्हणून साश्चर्य कुतूहल मुद्रेनें त्यांनीं मला विचारलें. व आमची मूळ द्वारका दक्षिणेंत घेऊन जाण्याचा तुमचा विचार आहे कीं काय अशांही एक खुमदार, हंसत मुखानें विनोदपूर्ण पृच्छा केली. तसेंच दक्षिणेंत मूळ द्वारका असावी असें तुम्ही कोणत्या आधारावरून म्हणतां, असाही त्यांनीं मला एक प्रश्न केला. बाबांचीं वचनें हा माझा आधार असें सांगून तीं वचनें मी त्यांच्यापुढें मांडिलीं. त्यांना अत्यंत कौतुक वाटलें व हें कोडें काय आहे याचें त्यांना आकलन होईना. नंतर मी परत खंबालियाला आलों.

खंबालियाला आल्यानंतर श्री. पथुभासाहेब मजकडे आले. मी त्यांना द्वारकेला घडलेली सर्व हकीकत सांगितली. त्यांनीं बडोदें येथील पुराण वस्तुसंशोधन खात्याचे डायरेक्टर श्री. हिरामंडशास्त्री यांनीं मूळ द्वारकेसंबंधीं लिहिलेला व मुंबई क्रॉनिकलमध्ये नुकताच त्या वेळीं प्रसिद्ध झालेला त्यांचा एक लेख मला वाचावयास दिला, व तसेंच ता. ८-७-३५

रोजीं गुजरातींत लिहिलेला " श्री यदुवंश प्रकाश अने जामनगरनो इतिहास " सुमारें ७००-८०० पानांचा ग्रंथ वाचावयास दिला. तो मीं काळजीपूर्वक व लक्षपूर्वक वाचला. त्यांत दिलेली माहिती ग्रंथकर्त्यानें ( श्री. कवि मावदानजी भिमजीभाई रतनु, नवानगर-जामनगर-संस्थानांतील कालावड ग्रामनिवासी ) श्रीमहाभारत, श्रीमद्भागवत व इतर ग्रंथांवरून घेतली आहे. या ग्रंथांवरून हल्लींच्या संशोधन कार्याला माझ्या मतें उपयुक्त अशी माहिती मिळाली ती—

आर्य ज्योतिषाचे सिद्धांताप्रमाणें सृष्टीच्या उत्पत्तीस—१९५५८८५०३१ वर्षे झालीं. त्यांत चार युगें २७ वेळां गेलीं व हल्लीचें २८ वें युग चालू आहे. ( युगें अठ्ठावीस विटेवरी उभा वामांगें रखुमाई पुंडलीक शोभा वगैरे )

सत्ययुगाचीं वर्षे १७२८०००
त्रेतायुगाचीं वर्षे १२९६०००
द्वापारयुगाचीं वर्षे ८६४०००
कलियुगाचीं वर्षे ४३२०००

अठ्ठाविसाव्या सत्य युगांत श्वेत वराह कल्पांत ब्रह्मदेवाच्या वर्षाच्या तिसऱ्या दिवशीं वैवस्वत मनूचा जन्म झाला.

वैवस्वत मनूच्या वंशांत सत्य युगांत ब्रह्मा, वैवस्वत मनु आदि करून ५८ चक्रवर्ति राजे झाले.

त्रेतायुगांत दिलीप, रघु, अज आदि करून ६० चक्रवर्ति राजे झाले.

त्रेतायुगाचे तिसरे चरणांत शेवटच्या सुरथ राजा नंतर प्रजेंत कोणी राजा नव्हता. म्हणून पृथ्वीवर अवतार घेण्यास इंद्रानें चंद्रास आज्ञा केली. त्याप्रमाणें चंद्रानें पृथ्वीवर अवतार घेतला. व तेव्हांपासून पृथ्वीवर चंद्रवंश सुरू झाला.

श्रीआदिनारायणापासून चौथी पिढी चंद्रराजाची, व चंद्र राजापासून ५६ वी किंवा ६० वी पिढी श्रीकृष्णपरमात्म्याची येते.

आतां श्रीकृष्णवंश म्हणजे यदुवंश किंवा यादव किंवा जाधव वंश.

सौराष्ट्रांत पूर्वी सार्वभौम सत्ता खालीं लिहिलेले वंशांत होती.

१. यदुवंश—सत्ता सार्वभौम. राजधानी प्रयाग.

२. मौर्यवंश— ,, ,, उत्तरेस हिमालयापासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत. पूर्वेस मगधापासून पश्चिमेस सौराष्ट्रापर्यंत. या वंशांतील जगप्रसिद्ध राजा अशोक इसवी सनापूर्वी तिसऱ्या शतकांत होऊन गेला.

३. क्षत्रपवंश—सत्ता—कच्छ, सौराष्ट्र, गुजरात, माळवा.

४. गुप्तवंश—सत्ता—गंगा—ब्रह्मपुत्रा यांच्यामधील प्रदेश. व सौराष्ट्र.

५. वल्लभीवंश—या वंशांतील शेवटचा जगविख्यात राजा शिलादित्य. राजधानी खंडियार जवळ वल्लभीपूर.

६. चावडावंश—या वंशातील महा पराक्रमी राजा वनराज चावडा. राजधानी सौराष्ट्र देशांत श्रीसोमनाथाजवळ पाटणा. ( पाटणा ).

७. सोलंकीवंश—सत्ता सौराष्ट्रावर. या वंशातील पराक्रमी राजा भीमदेव.

८. वाघेला वंश—सत्ता सौराष्ट्रावर. ह्या वंशाच्या अमदानींत विसनगर व विजापूर हीं शहरें बांधलीं.

चंद्र राजाची वंशावळ—१ चंद्र, २ बुध, ३ पुरुरवा, ४ आयु, ५ नहुष, ६ ययाती, ७ यदु.

यदुराजा सर्वांत फार पराक्रमी होता. म्हणून त्याच्या वंशातील राजांना यदुवंशीय राजे म्हणतात. या वंशांतील ४१ वा राजा वृष्णी हा महापराक्रमी झाला. पुढें यदु वंशाला वृष्णिक किंवा वृष्णीय असें म्हणूं लागले. या वंशांतील ५४ वे राजे सुरसेन, ५५ वे वसुदेव व ५६ वे श्रीकृष्ण याप्रमाणें या वंशांत राजे झाले.

श्रीकृष्ण हे विक्रमसंवत पूर्वी २५२५ वर्षांपूर्वी होऊन गेले. श्रीकृष्णांनीं करवीर क्षेत्रांत शृंगाल राजाचा वध करून नंतर ते मथुरेला आले. तेथून ते गोकुळास गेले. जरासंधाचा जावई कंस मेल्याची वार्ता ऐकतांच जरासंधानें मथुरेवर १७ हल्ले केले. पण त्या सर्वांत तो पराजित झाला. १८ वे हल्ल्याचे वेळीं जरासंधानें प्रचंड सैन्य जमा केलें. व पुन्हा मथुरेवर हल्ला करण्यास आला. काल्यवनानेंही प्रचंड सैन्य जमा करून तोही मथुरेवर याच वेळीं हल्ला करण्यास आला. ही खबर श्रीकृष्णाला कळतांच ते गोकुळ—वृंदावनाहून अक्रूर व बलिराम यांना बरोबर घेऊन मथुरेस आले. उग्रसेन हा त्या वेळीं मथुरेचा राजा होता. हा कंसाचा बाप व श्रीकृष्णाचा आजा ( आईचा बाप ); पण कंसानें त्याला कारागृहांत टाकलें होतें. त्या गादीवर आपण बसून श्रीकृष्णांनीं त्या हल्ल्यांत जरासंधाचा व काल्यवनाचा पराभव करून उग्रसेनाला मथुरेच्या गादीवर बसवून आपण अनर्तदेशांत पश्चिमसमुद्राकडे द्वारकापुरी निर्माण करून, मथुरेच्या गादीवरून निघून यादवासह द्वारकापुरींत राहिले. सर्व जगतांत अत्युत्तम अशी ही नगरी विश्वकर्माकडून त्यांनीं निर्माण करून घेतली. ( हरिवंश अध्याय ५६–५७–५८ )

अनर्त हा देश सौराष्ट्र देशाजवळ आहे, असें भिडे यांच्या संस्कृत-इंग्लिश कोशांत दिलेल्या शेवटच्या पौराणिक काळाच्या "प्राचीन भारतम्" या नकाशांत दाखविलें आहे.

"सौराष्ट्र also called अनर्त modern Peninsula of the Kathiawar. द्वारका is called अनर्तनगरी or अब्धिनगरी. The old द्वारका stood near मधुपूर 95 miles south-east of द्वारका and also

५. वल्लभीवंश—या वंशांतील शेवटचा जगविख्यात राजा शिलादित्य. राजधानी खंडियार जवळ वल्लभीपूर.

६. चावडावंश—या वंशातील महा पराक्रमी राजा वनराज चावडा. राजधानी सौराष्ट्र देशांत श्रीसोमनाथाजवळ पाटणा. ( पाटणा ).

७. सोलंकीवंश—सत्ता सौराष्ट्रावर. या वंशातील पराक्रमी राजा भीमदेव.

८. वाघेला वंश—सत्ता सौराष्ट्रावर. ह्या वंशाच्या अमदानींत विसनगर व विजापूर हीं शहरें बांधलीं.

चंद्र राजाची वंशावळ—१ चंद्र, २ बुध, ३ पुरुरवा, ४ आयु, ५ नहुष, ६ ययाती, ७ यदु.

यदुराजा सर्वांत फार पराक्रमी होता. म्हणून त्याच्या वंशांतील राजांना यदुवंशीय राजे म्हणतात. या वंशांतील ४१ वा राजा वृष्णी हा महापराक्रमी झाला. पुढें यदु वंशाला वृष्णिक किंवा वृष्णीय असें म्हणूं लागले. या वंशांतील ५४ वें राजे सुरसेन, ५५ वे वसुदेव व ५६ वे श्रीकृष्ण याप्रमाणें या वंशांत राजे झाले.

श्रीकृष्ण हे विक्रमसंवत पूर्वी २५२५ वर्षांपूर्वी होऊन गेले. श्रीकृष्णांनीं करवीर क्षेत्रांत शृंगाल राजाचा वध करून नंतर ते मथुरेला आले. तेथून ते गोकुळास गेले. जरासंधाचा जावई कंस मेल्याची वार्ता ऐकतांच जरासंधानें मथुरेवर १७ हल्ले केले. पण त्या सर्वांत तो पराजित झाला. १८ वे हल्ल्याचे वेळीं जरासंधानें प्रचंड सैन्य जमा केलें. व पुन्हा मथुरेवर हल्ला करण्यास आला. काल्यवनानेंही प्रचंड सैन्य जमा करून तोही मथुरेवर याच वेळीं हल्ला करण्यास आला. ही खबर श्रीकृष्णाला कळतांच ते गोकुळ–वृंदावनाहून अक्रूर व बलिराम यांना बरोबर घेऊन मथुरेस आले. उग्रसेन हा त्या वेळीं मथुरेचा राजा होता. हा कंसाचा बाप व श्रीकृष्णाचा आजा ( आईचा बाप ); पण कंसानें त्याला कारागृहांत टाकलें होतें. त्या गादीवर आपण बसून श्रीकृष्णांनीं त्या हल्ल्यांत जरासंधाचा व काल्यवनाचा पराभव करून उग्रसेनाला मथुरेच्या गादीवर बसवून आपण अनर्तदेशांत पश्चिमसमुद्राकडे द्वारकापुरी निर्माण करून, मथुरेच्या गादीवरून निघून यादवांसह द्वारकापुरींत राहिले. सर्व जगतांत अत्युत्तम अशी ही नगरी विश्वकर्माकडून त्यांनीं निर्माण करून घेतली. ( हरिवंश अध्याय ५६–५७–५८ )

अनर्त हा देश सौराष्ट्र देशाजवळ आहे, असें भिडे यांच्या संस्कृत-इंग्लिश कोशांत दिलेल्या शेवटच्या पौराणिक काळाच्या "प्राचीन भारतम्" या नकाशांत दाखविलें आहे.

"सौराष्ट्र also called अनर्त modern Peninsula of the Kathiawar. द्वारका is called अनर्तनगरी or अब्धिनगरी. The old द्वारका stood near मधुपूर 95 miles south-east of द्वारका and also

near mount रैवतक which appears to be the same as hill near Junagad."

Extracts from appendix III on important Geographical names in ancient India page 147 to the late Prof. V. S. Apte's practical Sanskrit Dictionory.

दुसरे इतिहासकार असें म्हणतात कीं, कृष्णपरमात्मा शंखोद्धार बेटांत ( बेट द्वारकेंत ) कांहीं काल राहिले व हल्लींच्या द्वारकेच्या बाजूला जी मूळ द्वारका समुद्रांत बुडविली, तेथेंच ही द्वारका त्यांनीं बनविली.

श्रीकृष्णांनीं द्वारकेच्या भोंवती ९६ मैल लांबीचा कोट बांधला होता. ही द्वारका कोणत्या ठिकाणी होती, याबद्दल अद्याप निश्चित एकमत नाहीं. कोणी इतिहासकार म्हणतात कीं, ही द्वारका नगरी कोडियार व गिरनार यांच्याजवळ होती, व वेरावळ व पोरबंदर तिच्या वाड्या होत्या.


हींच सोन्याची व रत्नजडीत नक्षीच्या कामाची द्वारका होती. हिच्यांत श्रीकृष्णाचें मंदीर ( निवासस्थान ) निराळें स्वतंत्र होतें. हरिवंश अ. ५६-५७-५८ यांत वर्णन केलेल्या द्वारकेंत आणखी पुष्कळ फेरफार करून ही विशेष द्वारका बनविली असें हरिवंश अ. ९८--९९ यांत लिहिलें आहे.

जामनगर संस्थानांत दर्या किनाऱ्यावर जी हल्लीं बाळाचडी आहे, त्या जागेवर द्वारकेंत मेलेलीं मुलें पुरीत असत. हल्लीं त्या ठिकाणीं बालश्राद्ध होत असतें. या बाळाचडीच्या उत्तरेस समुद्रखाडी आहे. तेथें दरवर्षी अक्षय्य तृतीयेच्या दिवशीं मोठी भरती-ओहटी येते. त्या वेळीं त्या खाडींत मूळ द्वारकेचा खंडेरा ( खाडा ) आतां पण नजरेस पडतो. त्याचें दरवर्षीं फक्त तीनच तास दर्शन होतें, असें तिकडील राहणारे लोक सांगतात.

कित्येक जुन्या ग्रंथांत या द्वारका नगरीचा आठशें मैलांचा घेर होता. व तींत १५-१६ लाखांची वस्ती होती असें वर्णिलें आहे. त्या वेळीं आर्यावर्तांत असलेल्या सर्व मोठ्या शहरांत ही द्वारकानगरी फारच मोठी व विस्तीर्ण होती.

कांहीं झालें तरी मूळ द्वारका हें नगर अवर्णनीय बांधकामाचें व अति मोठ्या विस्ताराचें होतें. यांत चव्हाटे, चौक, राजरस्ते, लहानमोठ्या गल्ल्या, बागबगीचे, उपवनें, उद्यानें, पुष्पवाटिका, वनवाटिका, गगनचुंबित मोठमोठाले महाल, सभास्थानें, हवेल्या, राजवाडे, व असंख्य सुखसोई होत्या.

श्रीकृष्ण परमात्मांची जन्मकुंडली.




अठ्ठावीस युगांत श्रीकृष्ण परमात्मांचे किती अवतार झाले असतील, व त्यांपैकीं ही कोणते अवताराची पत्रिका आहे, व किती वर्षांपूर्वीची आहे, हें ज्योतिर्विदांनीं लक्ष-पूर्वक अभ्यास करून ठरवावें, व त्यातील सत्यासत्यता व ग्राह्याग्राह्यता जनतेच्या नजरेला आणावी अशी सविनय प्रार्थना आहे. या कुंडलीचा उपयोग शिरडी ही द्वारका कोणत्या कालीं होती, त्याच्या कालनिर्णयाकरतां कदाचित् होऊं शकेल.

वरील माहितींत कित्येक ठिकाणीं असंबद्धता दिसेल. तथापि संशोधकांनीं अति-अतिकाळाकडे नजर देऊन व पुराणांतील सांकेतिक भाषा व अंक-खुणा यांजकडे लक्ष देऊन संगति लावल्यास यात्र माहितीचा प्रस्तुत संशोधनाला उपयोग होईलसें वाटतें.

या माहितीवरून जीं ढोबळ अनुमानें निघतात तीं खालीं लिहिल्याप्रमाणें—

१ श्रीकृष्ण परमात्माचा अवतार होण्यापूर्वीं कोणतांही व कोठेंही द्वारका नांवाची नगरी अस्तित्वांत नव्हतीं.

२ श्रीकृष्ण हे मथुरा नगरींत कंस राजाच्या कारागृहांत जन्मले. त्याच रात्रीं त्यांना गोकुळांत नेण्यांत आलें. त्यांनीं गोकुळ व वृंदावन येथें आपलें बाळपण अक्रूर व बळराम यांच्यासमवेत घालविलें. नंतर मथुरेवर जरासंधानें १७ हल्ले केले. त्यात जरा-संधच पराजित झाला. त्यानें पुन्हा १८ वा हल्ला मथुरेवर चढविला. काल्यवनही मोठें सैन्य घेऊन याच वेळीं मथुरेवर आला. ही बातमी श्रीकृष्णाला लागतांच ते तावडतोब मथुरेला गेले. कंसाला मारून, जरासंध व काल्यवन यांचे हल्ले परतवून उग्रसेनाला कंसाच्या कारा-गृहांतून सोडवून त्याला पुनरपि मथुरेच्या गादीवर बसविण्याच्या दरम्यानच्या कालांत श्रीकृष्णांनीं मथुरेंत स्वतः कांहीं काल राज्य केलें. उग्रसेनास मथुरेच्या गादीवर बसविल्या-नंतर आपल्याकरितां अनर्त देशांत समुद्रापासून जागा घेऊन त्या जागेवर हल्लींच्या द्वारकेजवळ, किंवा ओखा बंदराजवळ किंवा रैवत पर्वताजवळ द्वारकानगरी-सोन्याची द्वारकानगरी-निर्माण करून त्यांत ते राहिले.

३ सौराष्ट्र व अनर्त हे निरनिराळे देश नसून सौराष्ट्र म्हणजेच अनर्त. ह्या अनर्त देशांत निर्माण केलेली हीच प्रथम किंवा मूळ द्वारका असावी. ही द्वापार युगांतील द्वारका.

४ यादवी अति माजली, म्हणून ही द्वारका समुद्रांत बुडवून कृष्ण भगवान् निजधामास गेले.

५ वर लिहिलेली, म्हणजे हल्लीं अस्तित्वांत असलेली द्वारका ही दुसरी द्वारका आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे, व याबद्दल दुमत होणें संभवनीय किंवा शक्य नाहीं.

६ श्रीस्कंद पुराणांतील प्रन्हाद संहितेंत सांगितलेल्या द्वारकामहात्म्याच्या पहिल्या अध्यायांत असें लिहिलें आहे कीं, यदुकुलाचा नाश झाल्यानंतर श्रीकृष्ण प्रभास क्षेत्रांत पिंपळ वृक्षाच्या बुंधाच्या आश्रयानें राहिले होते. प्रन्हादजींच्या सांगण्यावरून ऋषिमंडळ कलियुगाच्या प्रारंभीं तेथें गेलें. आपण पृथ्वीवर यावें,धर्माचें व गोब्राह्मणाचें रक्षण करावें अशी विनंती केल्यावरून समुद्राकडून १२ योजनें जागा मागून घेऊन त्यावर द्वारका नगरी बांधून श्रीकृष्ण परमात्मा तेथें राहिले. ही कलियुगांतील द्वारका.

याच अध्यायांत असेंही लिहिलें आहे कीं, पश्चिम समुद्राच्या तीरावर कुश दैत्यानें स्थापन केलेली कुशस्थली नांवाची एक नगरी आहे. तिला पण द्वारकाच म्हणतात. तेथें श्रीगोमती गंगा समुद्रास मिळते. तेथें कृष्ण भगवान हातांत शंख, चक्र, गदा, पद्म, धारण करून रहातात.

वरील दोन्हीं वर्णनें हल्लीं अस्तित्वांत असलेल्या द्वारकापुरीला लागू पडतात.

वरील पौराणिक माहितीवरून व त्यावरून निघत असलेल्या अनुमानावरून मूळ द्वारकेचा किंवा हल्लीं अस्तित्वांत असलेल्या द्वारकेचा संबंध नगर-सोलापूर जिल्ह्यांशीं सोयरिका, लढाया, व भक्तेच्छा खेरीज करून प्रस्तुत संशोधनकार्याशीं, पोंचेलसें दिसत नाहीं. मग बाबांच्या वचनाची वाट काय ?

मूळ द्वारका पश्चिमोत्तर दिशेला गोकुळ, वृंदावन, मथुरा, हस्तिनापूर ( दिल्ली ), कुरुक्षेत्र वगैरे स्थलांच्या सन्निध बांधण्यास व ती समुद्रांत बुडवून, तिकडच्याच भागांत दुसरी द्वारका निर्माण करण्यास जशीं कांहीं विशिष्ट कारणें झालीं, तशाच कांहीं विशिष्ट कारणांनीं तिसरी एखादी द्वारका कोणत्या तरी युगांत व अवतारांत नगर, सोलापूर व सातारा जिल्ह्यांच्या भागांत निर्माण झाली असेल, तरच बाबांच्या वचनांची संगति लागून सत्यता पटेल. करितां ह्या तिसऱ्या दक्षिण-द्वारकेच्या निर्मितीबद्दल पौराणिक, भौगोलिक व इतर कांहीं माहिती मिळते कीं काय हें पाहूं.

यदुवंशानंतर मोर्यवंशाचे राजे झाले. त्या वेळीं त्यांचें राज्य उत्तरेला हिमाचला-पासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत व पूर्वेला मगधापासून पश्चिमेला सौराष्ट्रापर्यंत पसरलें

होतें. म्हणजे सबंध महाराष्ट्र त्या वेळी यदु वंशज राजांच्या आश्रयाखालीं होता, व तेव्हां-पासून श्रीकृष्णांच्या ५५ व्या किंवा ६० व्या पिढीपर्यंत महाराष्ट्रावर यादवांचेंच राज्य होतें. श्रीकृष्ण हे विक्रम संवतपूर्वी २५२५ वर्षें होऊन गेले असें वरील यादव वंशाचे हकीकतीवरून दिसून येईल.

नुकताच सन १९३५ ता. १८ जुलई रोजीं टाइम्स ऑफ् इंडियांत साताऱ्याचे कै. धर्मवीर श्री. विष्णुपंत करंदीकर यांनीं जो लेख प्रसिद्ध केला, त्यांत खिस्त शकापूर्वी २६०० वर्षांवर कोल्हापूर किंवा पन्हाळगड या ठिकाणीं यादव कुलांतील पद्मवर्ण नांवाच्या राजानें वसाहत केली. पन्हाळगड हा सह्य पर्वतावर आहे, व कोल्हापूर सपाट जागेवर आहे. करितां यादवांची वस्ती प्रथम पन्हाळगडावर झाली असावी. कारण सपाटीवर वस्ती करण्यासारखा तो काल व प्रदेश नव्हता. म्हणून कोल्हापूरची वस्ती पन्हाळगडच्या वस्तीनंतर झाली असली पाहिजे. पद्मवर्ण राजाचा थोरला भाऊ यानें त्याच वेळीं श्री-नर्मदामाईच्या कांठवर यादवांची वसाहत केली, असें लिहिलें आहे. नर्मदाकिनारा, पन्हाळगड व कोल्हापूर यांच्यामध्यें नगर, सातारा व सोलापूरचा प्रदेश येतो. अर्थात् यावरून नगर, सातारा व सोलापूर जिल्ह्यांत यादवांची वसाहत २६०० वर्षांपूर्वी होती, असें उघड होतें.

श्री. कै. बापूसाहेब करंदीकर यांचे ता. १७ ऑगस्ट १९३४ व वरील ता. १८ जुलई १९३५ असे दोन लेख मीं वाचल्यावर माझा व त्यांचा पत्रव्यवहार सुरू झाला. तोंपर्यंत ते मला किंवा मी त्यांना ओळखत नव्हतों. त्या पत्रव्यवहारावरून त्यांचें मत, अति अति प्राचीन काळीं शिरडीला द्वारका होती, पण ती सोन्याची द्वारका ( म्हणजे मूळ द्वारका ) किंवा दुसरी द्वारका हें, खुद्द शिरडीला व शिरडीच्या आसपास बऱ्याचशा गांवीं व ठिकाणीं पूर्ण संशोधन झाल्यावांचून निश्चित सांगतां येणार नाहीं. असें होतें. शिरडीला द्वारका होती हें सिद्ध करण्यास आपल्याजवळ पौराणिक व भूगर्भशास्त्राचा भरपूर पुरावा आहे, व संशोधनकार्यासाठींच ते पूर्वी एकदा बाबा ह्यात असतां शिरडीला येऊन गेले होते, व आमच्या विनंतीवरून ते गेल्या सालच्या म्हणजे सन १९३६ च्या फेब्रुवारीच्या ४ तारखेला त्यांचे नातसंबंधू श्री. परांजपे यांसह शिरडीला येऊन ता. ५ रोजीं मुक्काम करून, गांवांत व आसपासचे रुई, राहतें, निमगांव, कोऱ्हठाण व संवत्सर वगैरे गांवास जाऊन ता. ६ रोजीं नगराला परत गेले.

अगदीं अलीकडे म्हणजे ७००-८०० वर्षांपूर्वी पर्यंत यादव वंशांतील राजांचें राज्य महाराष्ट्रावर होतें असें प्रत्यक्ष इतिहास सांगतो.

श्रीज्ञानेश्वर महाराजही आपल्या श्रीज्ञानेश्वरी माईच्या १८ अध्यायांतील खालीं दिलेल्या ओंव्यांत तेंच सांगतात.

ऐसें युगीं परी कली । आणि महाराष्ट्र मंडळीं ॥
श्रीगोदावरीच्या कूळीं । दक्षिण लिंगीं ॥ १८०३ ॥
त्रिभुवनैक पवित्र । अनादि पंचक्रोश क्षेत्र ॥
जेथ जगाचें जीवनसूत्र । श्री महालया असे ॥ १८०४ ॥
तेथ यदुवंश विलास । जो सकल कला निवास ॥
न्यायातें पोषी क्षितीश । श्रीरामचंद्र ॥ १८०५ ॥

श्रीरामचंद्र म्हणजे त्या वेळीं खुद्द नेवासें येथें (शके १२१२) राज्य करीत असलेले यदुवंशांतील राजे रामदेवराव जाधव हे होत असें स्पष्ट दिसतें.

आतां ७००–८०० वर्षांपूर्वी पर्यंत म्हणजे मुसलमानांचा अंमल सुरू होईपर्यंत जर महाराष्ट्रांत मौर्य वंशापासून यादवांचें राज्य होतें,तर त्या अवधींत श्रीकृष्ण हे केव्हां तरी महाराष्ट्रांत येऊन राहणें संभवनीय दिसतें व त्याचप्रमाणें इकडे एखादी द्वारका ही निर्माण केल्याचें संभवनीय दिसतें.

श्री. विनायक मोरेश्वर भट माजी इतिहासशिक्षक ट्रेनिंग स्कूल नाशिक हल्लीं प्राक्टिसिंग स्कूल शिक्षक, ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें यांनीं मराठी पांचवी व इंग्रजी पहिल्या इयत्तेकरतां लिहिलेल्या हिंदुस्थानच्या " सोपा व सचित्र इतिहास " नांवाच्या पुस्तकांत इ. स. १०२२ सन घालून पान ४१ वर हिंदुस्थानची खालीलप्रमाणें आकृति देऊन त्यांत खालील ठिकाणीं द्वारावतीपूर म्हणून शहर दिलें आहे.

या नकाशांत द्वारका हल्लींच्या ठिकाणीं म्हणजे पश्चिमेला सौराष्ट्रांत किंवा अनर्तात न दाखवितां दक्षिणेंत " द्वारावतीपूर " म्हणून दाखविली आहे. ही माहिती त्यांना कोठून व कशी मिळाली व खरोखरच त्यांनीं वर दाखविल्या ठिकाणीं द्वारावती पूर म्हणजे द्वारका होती असें इतिहास सांगत असेल तर हा काल कोणता, त्या वेळीं या द्वारकापुरांत कोणते राजे राज्य करीत होते व हें द्वारावतीपूर कोणीं कधीं व कशाकरतां बांधिलें व त्या वेळीं सौराष्ट्रांत खरोखरीच द्वारका नव्हती की काय, वगैरे माहिती श्री.भट यांना समक्ष भेटून त्यांच्याकडून घेण्यास मला वेळ मिळाला नाहीं. श्री. भट यांनीं वरील नकाशा कांहीं तरी भक्कम आधारावरून दिला असावा. तो प्राचीन भारताचा दिसतो.

तसेंच श्री. रामचंद्र सदाशिव जोशी हेडमास्तर, ट्रेनिंग स्कूल,भिवंडी यांनीं लिहिलेल्या हिंदुस्थानच्या कालक्रम इतिहासांत सन ८२५ नंतर उत्तरेच्या बाजूस देवगिरीचे यादव, पूर्वेला एक शिलापुरी ( तेलंगणांत वरंगळ ) येथील काकतीय आणि दक्षिणेला द्वार समुद्र ( म्हैसूर येथील बेळगोळ ) येथील होयसळ बल्लाळ यांची सत्ता चालू होती, असें लिहिलें आहे. यावरून दक्षिणेंत महाराष्ट्रांत, तेलंगण म्हैसूर या ठिकाणीं समुद्र होता. अर्थात हा गोड्या पाण्याचाच समुद्र असला पाहिजे, व त्यासच द्वारसमुद्र हें

नांव असलें पाहिजे, व हें द्वार समुद्र नांव द्वारावतीपूर किंवा द्वारकानगरीवरून पडलें असलें पाहिजे, व या समुद्राच्या किनाऱ्यावर हल्लींचें नगर, सातारा, सोलापूर, कानडा वगैरे जिल्ह्यांच्या आसपास द्वारकानगरी किंवा द्वारावतीपूर असलें पाहिजे असें दिसतें. श्री. जोशी यांच्याकडूनही वरील खुलासा त्यांना समक्ष भेटून, करून घेण्यास मला अवधी मिळाला नाहीं.

वर दिलेल्या दोन भौगोलिक उताऱ्यांवरून फक्त इतकेंच अनुमान काढतां येतें कीं, पूर्वी केव्हां तरी दक्षिणेंत महाराष्ट्रांत नगर जिल्ह्याच्या बाजूस द्वारका, द्वारावती, द्वारवती, द्वारावतीपूर, या नांवाची एक नगरी होती, व तेथें समुद्रही होता, व त्या समुद्राला द्वारसमुद्र असें म्हणत असत. पण या उताऱ्यावरून तो काळ निश्चित करतां येत नाहीं. असो.

या संशोधनासंबंधीं कै. बाबासाहेब तर्खड यांनीं सन १९३४ सालानंतर ता. १८–७–३५ च्या टाइम्स ऑफ इंडियांत आलेल्या कै. धर्मवीर विष्णुपंत करंदीकर यांचा पन्हाळगड व कोल्हापूर ह्यापूर्वी यादव वसाहती होत्या अशा माहितीचा लेख आल्यावरून (व ज्याबद्दल मी पूर्वीच १९ व्या पानावर खुलासा केला आहे) ता. १९–७–३५ रोजीं मला लिहिलेल्या वार्तेत ते म्हणतात कीं, "कालच्या टाइम्स ऑफ इंडियाची एक प्रत आज टपालांतून (मजकडे) पाठवून देत आहें. श्रीअंबाबाई (कोल्हापूरची) देवालयाच्या पाठीमागें श्री. देवस्थानें यांच्या शाळेंत इ. स. १९२० सालीं मी. दडून गेलेल्या समाधी पाहिल्या आहेत, त्यामुळें Was Kolhapur a Yadav Colony? याचा विचार करतां श्रीकृष्ण भगवान डिंडिरवनामध्यें संचार करीत असतां, श्रीशिरडी हें त्यांचें उत्तरेकडील स्थान असणें संभवनीय आहे. त्यामुळें आपल्या बसण्या जागेला श्रीसाईबाबांनीं द्वारकामाई कां म्हणावें याचा शोध पण शिरडीलाच लागावा असें मला वाटतें. श्रीशिरडींतली गढी व समाधिमंदिरांतील दक्षिण बाजूकडील उंचवटयाची जागा येथेंच अपूर्व शोध लागावा असें मला कित्येक वर्षांपासून वाटत आहे. सदरील उंचवटयाच्या जागेंत मोठमोठीं भुयारें आहेत असें ऐकिवांत आहे." भुयारें आहेत ही गोष्ट खरी आहे व त्यांपैकीं एक मी, बाबासाहेब व विष्णुपंत करंदीकर यांनीं समक्ष पाहिलें आहे. याच गढीवर एक राजा राहत असे, असें बाबा आपल्यास नेहमी सांगत असें श्री. माधवराव बळवंत देशपांडे यांनीं मला पुष्कळ वेळां सांगितलें आहे व अजूनहि सांगतात.

आतां माझा व कै. श्री. धर्मवीर विष्णु रघुनाथ ऊर्फ बापसाहेब करंदीकर यांचा या संशोधन कार्यासंबंधीं जो पत्रव्यवहार झाला, तो अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें तो बहुतेक जसाला तसाच खालीं देत आहे.

ता. २१-८-३५ चें पत्रः—श्री महाराजांचा व माझा अनेक वर्षांपूर्वी संबंध आला होता. माझें कार्यक्षेत्र वेगळें असल्यामुळें जास्त लाभ झाला नाहीं. पण मीही या मार्गांतील जिज्ञासु व अभ्यासु आहें. शिरडीला किंवा त्याजवळ इ. स. पूर्वी २ ते ३ हजार वर्षांपूर्वीचे अवशेष असले पाहिजेत, अशी माझी खात्री आहे. या ठिकाणीं द्वारका होती. पण त्याविषयीं कांहीं विशेष प्रकार आहे तो आपणांस या पत्रीं कळविण्याचा प्रयत्न करतों. पत्रीं लिहितां येत नाहींत, अशाही कांहीं गोष्टी आहेत. त्यामुळें अडचण होते खरी. पण आपण महाराजांच्या भक्तवर्गांपैकीं असल्यानें भावार्थ सहजीं ध्यानांत येईलच.

संत वचन सत्य तर खरेंच. पण त्यांत अत्यंत गूढ ज्ञान असल्याकारणानें त्या वचनाचें स्वरूप पुष्कळ वेळां भूल पाडणारें असतें. ही गोष्ट अत्यंत जागरूकतेनें ध्यानांत ठेविली पाहिजे. पूर्वी आर्यावर्त ही संज्ञा हिमालय ते विंध्याचल सिंधु ते ब्रह्मपुत्रा या भागाला लावीत असत. त्या आर्यावर्तांत मथुरा वृंदावन केंद्रस्थानीं ठेवून भगवंतांनीं अप्रतिम असें सहस्रदल चक्र निर्माण केलें. एक द्वारका, एक बद्रिनारायण, एक पुरी अशीं तीन टोंकें या चक्राच्या पाकळ्यांचीं होतीं. याप्रमाणें स्वर्गोत्तरभागीं ज्याला उत्तर कुरु म्हणतात, त्यांत स्वर्गीय वैकुंठ दुसरें चक्र होतें, त्याचीही माहिती मिळते. तसेंच नर्मदेचा खालचा भाग पाताळ असून त्यांत श्रीभगवानाची आपली एक मूर्ति असे. या ठिकाणींहीही वरील प्रमाणेंच पंढरपूर केंद्रस्थानीं ठेवून सभोंवार पाकळ्या पसरत गेल्या आहेत. प्रतिष्ठान (पैठण), नेवासें, शिरडी, आळंदी, परळी (श्रीसमर्थ रामदास-स्वामींची); विजयानगर अशीं निरनिराळीं टोंकें या पाकळ्यांची आहेत. शिरडी हें या पाकळ्यांची द्वारका होय. ज्या वेळीं भगवान दिंडिरवनांत आले, त्या वेळीं ह्या स्थानाला बाह्य स्वरूप देण्यांत आलें.

बाकी, **जनलोक** हा श्वेतवराह कल्पाच्या आरंभापासूनचा आहे. नारायणांनीं वराहरूप धारण केलें, तेव्हां तत्पूर्वी निमित्त असलेल्या रसातलाला लागून हा **जनलोक** होता, त्यावेळेपासून वराह अवतार ज्या क्षेत्रावर झाला, त्याचें केंद्र (पंढरपूर) हें स्थान होतें. किती कोटी वर्षांपासून हें स्थान भगवत्तेजानें युक्त आहे, हें आज सांगतां येत नाहीं. पण आर्यावर्तांतील किंवा स्वर्गोत्तर भागांतील स्थानापेक्षां हें फार फार प्राचीन स्थान आहे.

संतवचनाची जाणीव किती कालामागें आपल्याला नेऊं शकेल? आपण वर अगदीं त्रोटक अशा रीतीनें लिहिलेल्या गोष्टीचें समालोचन केलेंत, तर आपल्या अंतः-करणांतील भक्तिभावना आपल्याला स्फूर्तीच्या लाटेवर कालाच्या अगाध पोटांत फिरवील व मग "द्वारका" कोणती याची जाणीव होईल. "सोन्याची" द्वारका! हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम्. तत्त्वंपूषन्नपावृणु सत्य धर्माय दृष्टये (ईशावास्योपनिषद्

मंत्र १५) अशी सद्गुरुचरणाची प्रार्थना केली, तर अंतःकरणामध्यें नेणिवेंतील रत्नें मंथन करून जाणिवेच्या खजिन्यांत येऊन पडतील यांत शंका नाहीं.

दक्षिणेंतील या गुप्त तेजाला बाह्य स्वरूप जेव्हां मिळालें, त्या वेळीं "द्वारका" दक्षिणेंतील द्वारका, दक्षिणोदधि ज्याला वडवाब्धि असें म्हणत असत, त्याच्या उदरांतून बाहेर पडली. श्रीरामचंद्राच्या अगोदर कांहीं काल हा भाग "उदित" झाला. त्या वेळेपासूनचा इतिहास अवगत होईल. प्रयत्न जरूर पाहिजे.

माझ्या अल्प मतीला काय वाटलें तें कळविलें आहे. आपण त्याविषयीं विचार करून ध्यानीं आणून पहावें. पटलें तर मला कळवावें. जास्त विचार करतां येईल.

ता. ३-९ ३५ चें पत्र-आपलें कार्ड आलें. माझ्या मार्गील पत्रांतील विचारसरणी कांहीं निराळ्या प्रकारची होती. पहिल्या पानावरचा शेवटचा पॅरिग्रफचें पहिलें वाक्य "संत वचनें सत्य खरीं" वगैरे संपवीतोंपर्यंत-मनामध्यें अमुक रीतीचें उत्तर आहे अशा विषयीं कल्पनाही नव्हती. पण या गूढाचें कांहीं तरी निराळें उत्तर असावें असें अंतर्यामीं खास वाटत होतें. आपण तारखांकडे पाहिल्यास पत्र लिहिल्यानंतर दोनतीन दिवसांनीं पोस्टांत टाकलें. याचें कारण आंतील विधानें अंतर्यामीं वसत असलेल्या आत्म्याला सत्य अशीं खात्रीलायक वाटत असलीं तरी बुद्धीला पटेपर्यंत गृहीत धरून निदान दुसऱ्याकडे पाठवावयाचीं नाहींत अशी माझी ठाम समजूत. त्याप्रमाणें पाहतां:-

१. भूगर्भ शास्त्ररीत्या Deccan Plateau जन लोक श्वेतवराह अवताराच्या वेळीं रसातळाशीं युक्त होता कल्पपूर्व सृष्टींत-अनुभव प्राप्त होता. Perceptibly existing हें मला सिद्ध Geology व पुराणें यावरून करतां येतें.

२. स्वर्गांत व भुतलावर on upper Himalaya's Plateau and Aryavart-between Himalaya & Vindya and Sindhu & Brahmaputra सहस्र दलचक्र होतें. हें पद्मांत (पद्मपुराणांत) वर्णन आहे. त्यावरून पातालांत असलेंच पाहिजे, असें अनुमान.

३. पंढरपूर हें केंद्र समजून घेण्यास मुळींच हरकत नाहीं. ऐतिहासिक सत्य स्पष्ट आहे.

४. भगवान इकडे आले होते. व पंढरीचें स्थान पवित्र मानून तेथें राहिले हेंही निर्विवाद आहे.

५. शिरडी हें प्राचीन काळांतील द्वारका क्षेत्र असावें यास खुद्द संतवचनांचा बाबांच्या संतवचनाचा आधार. द्वारका या चक्रांत पाहिजे. कोणती हें ठरविण्यास एक संशोधन किंवा एक संतवचन. पहिल्याच्या अभावीं दुसरें ग्राह्य धरलेंच पाहिजे.

इतकी विचारपरंपरा मनांत ज्या वेळीं पूर्ण झाली, त्या वेळीं तें पत्र धाडलें.

आपल्यापासून कोणतीही गोष्ट गुप्त ठेविली नाहीं. यास जेवढा विचार करणें जरूर होतें तें लिहून झाल्यावर झालें. ज्ञान असलें तर माझें नव्हे. चूक असल्यास मात्र ज्याप्रमाणें सूर्यकिरण खिडकींतून आंत येत असतां कांचा मलीन असल्या तर अंधारमयच येतात, तशी माझ्या मनाची स्थिति झाली असली पाहिजे. त्याबद्दल आपण माफ करालच.

आतांपर्यंततच्या माझ्या संशोधनांत माझा अनुभव असा कीं, मनांत अमुक अमुक असलेंच पाहिजे अशी भावना उत्पन्न होते व मग विचाराअंतीं बुद्धीला पटेल असें स्वरूप प्राप्त झालें म्हणजे मग त्याची जनतेपुढें मांडणी करावयाची. त्याप्रमाणें याही प्रसंगीं झालें आहे.

शिरडीला येणें शक्य असल्यास येईन. कदाचित मध्यें मुंबईला जाण्याचा प्रसंग आला तर ठाण्यास भेटेन. तळमळ सर्वत्र आहे. रत्नें प्राप्त होण्याची संधि आल्यास कोण सोडतो ?

ता. ७–९–३५ चे पत्रांतील या संबंधीं मजकूर—अंतःकरणरूपी आकाशांत गंधर्वनगरासारखीं अनंत रूपें येतात व जातात. त्यावेळीं अंतःकरणांत प्रतिबिंबित होऊन क्षणैक कां होईना, पण टिकून राहणारें जें दृश्य अनुभवास आलें तें टिपून काढलें. व बुद्धीला पटल्यावर आपणाकडे कळविलें. झालें हें संशोधन कार्य सुरवात करण्याकरतां मजला पुरेसें वाटतें. प्रत्यक्ष पाहिल्यावर मग कांहीं जास्त गोष्टी ध्यानांत आल्यास पाहूं.

नंतर ता. १२–९–३६ च्या पत्रांत लिहिलेल्या मजकुरापैकीं "कुंडिनपुराहून, नर्मदा, तापी, नद्यांमधून, गुजरात, अनर्त व सौराष्ट्र यांजकडे जाणारा रथ जाण्यासारखा मार्ग असावा" इतकाच मजकुर प्रस्तुत संशोधनाच्या कामीं उपयोगी पडण्यासारखा आहे. म्हणजे रुष्ट झालेल्या श्रीरुक्मिणी मातुःश्री ज्या मार्गानें द्वारकेतून दिंडिर वनांत तपश्चर्येकरतां आल्या तोच हा मार्ग आहे असें दिसतें.

इतकें लिहून आल्यावर मलाच विष्णुपंतांना प्रत्यक्ष भेटण्याची अतिशय उत्सुकता व तळमळ वाटूं लागली. त्याप्रमाणें नंतर त्यांचा माझा पत्र व्यवहार होऊन मी ता १ फेब्रुवारी १९३६ रोजीं साताऱ्यास गेलों, व त्यांना भेटून ता. ४–२–३६ रोजीं त्यांना घेऊन ता. ५–२–३६ रोजीं शिरडीला गेलों. तेथें त्यांनीं काय केलें याबद्दलची हकीकत पूर्वीच पान १९–२० वर दिली आहे.

नंतर ता. १८–२–३६ रोजीं मला त्यांनीं पाठविलेल्या मराठी व इंग्रजी पत्रांत ते लिहितात कीं, शिरडीसंबंधीं लिखाणाला उद्यां सुरवात करून आपल्याकडे पाठवून देईन. शिरडीच्या द्वारकामाईबद्दल विचार करतांना, कोपरगांवाजवळील संवत्सरक्षेत्राला अतिशय महत्त्व येतें. संवत्सरक्षेत्राची कथा नारदाची होय. श्रीकृष्णाच्यापाशीं त्यांच्या सोळा हजार एकशें आठ स्त्रियांपैकीं कोणती तरी एखादी स्त्री दे असें मागून प्रत्यक्ष दर्शनानें खिन्न मन झालेला नारद गोदावरी तीरावर जाऊन स्नान करीत असतांना नारदी होऊन

साठ संवत्सरांना प्रसवणारा नारद या क्षेत्रीं ही विलक्षण शक्ति अनुभवता झाला. श्रीकृष्ण त्या वेळीं जवळच असले पाहिजेत. कोठें होते ? श्री. बाबांच्याशिवाय दुसरा कोणी दाखला देण्यास राहिला नाहीं. पण जर जवळ असले, तर ते शिरडीला कां नसावेत ? अतएव या ठिकाणचें संशोधन थोडें बारकाईनें व्हावयास पाहिजे. पण संवत्सर क्षेत्राजवळ श्रीकृष्णांचा तळ अगर त्यांचें वसतिस्थान असलें पाहिजे.

दुसरी एक विचार करण्यासारखी गोष्ट ही कीं, या दक्षिणेच्या टापूंत श्रीकृष्णांचें आगमन वरचेवर होत असलें पाहिजे.

कृष्णा नदीला हें नांव तरी त्याशिवाय कसें मिळेल ?
पंढरपूरचें क्षेत्र तरी त्यांचें केंद्रस्थान कसें होईल ?
दिंडिरवनांत ते कां गेले होते ?

विदर्भाकडून पश्चिमेकडे वळून मग दक्षिणेंत सह्य भागाकडे जाण्याचा कोणता रस्ता होता वगैरे विचार करण्याजोग्या गोष्टी आहेत.

तसेंच बलरामानें द्यूत कलहांत रुक्मीला ठार मारलें. अर्थात् श्रीकृष्ण, बलराम वगैरे मंडळी या भागांत ( विदर्भांत म्हणजे वऱ्हाडांत कुंडिनपुरींत म्हणजे भीमक राजाच्या राजधानींत म्हणजे श्रीकृष्णांच्या सासुरवाडी नगरांत ) वारंवार येत असलीं पाहिजेत. या वेळीं शिरडी कोणत्या गहन-कुटिल व्यापार रस्त्यावर होता ?" नर्मदेच्या दक्षिण भागांत विदर्भ देश आहे. कुंडिनपूर किंवा कौडिन्यपूर वऱ्हाडांत ( विदर्भांत ) जिल्हा उमरावती ता. चांदूर येथें वर्धा नदीच्या तीरावर आहे. येथें विठ्ठलरुक्मिणींची यात्रा भरते.

कुंडनपूर हेंच कोडिनार असावें असें महाराष्ट्र ज्ञानकोशकार लिहितात.

बापूसाहेब ( कै. विष्णुपंत ) करंदीकरांचा व माझा यासंबंधीं पत्रव्यवहार झाला नाहीं. पण ते मला अभ्यास १९३५ च्या जून महिन्यांत भेटले, व शिरडीला येऊन ८।१० दिवस राहून पुन्हा चांगलें संशोधन करण्याचा आपला मानस आहे असें म्हणाले. परंतु "मनसा चिंतितं कार्यं दैवेनान्यत्र नीयते" या म्हणीप्रमाणें, या संशोधन कामीं लक्ष घालणारे बापूसाहेब दुर्दैवानें लवकरच दिवंगत झाले, व त्यांच्या पूर्वीच थोडे दिवस बाबासाहेब तर्खडही कालवश झाले. त्यामुळे मी अत्यंत निरुत्साही झालों; पण आपल्याला जितकें होईल तितकें आपण करावें अशी जोराची स्फूर्ति मनाला मिळाली. असो.

बापूसाहेबांच्या वरील लिहिण्याला त्यांनींच वर पंढरपूर केंद्र धरून जें षट्दल चक्र निर्दिष्ट केलें आहे, त्या षट्दलांच्या किंवा सहा पाकळ्यांच्या विवक्षित भूभागाच्या बैठकीवरून व शिर्डी हें प्राचीन कालांतील द्वारका क्षेत्र असावें या म्हणण्याला

वळकटी येते. या षट्दल चक्रांतील सहा स्थानांची, पंढरपूर केंद्र स्थानाभोंवतीं, भौगोलिक रचना खालीं दाखविल्याप्रमाणें आहे.

श्रीहरिविजय कर्ते श्री. श्रीधर यांनीं हरिविजयांत दक्षिण द्वारके संबंधानें जें लिहून ठेविलें आहे, त्यावरूनही बाबांच्या वचनाला व बापूसाहेबांच्या म्हणण्यास पुष्टी मिळते.

श्रीपांडुरंगानें प्रत्यक्ष माझ्या कानांत जें सांगितलें, तेंच मी हरिविजयांत लिहिलें आहे असें श्रीधर अध्यायाच्या शेवटीं लिहितात.

पद्मपुराणीं पांडुरंग महात्म्य । तेथें ही कथा आहे उत्तम ॥
श्रोतीं परिसिजे सप्रेम । अत्यादरें करूनियां ॥ १५६ ॥
मग मथुरेसी जातां हृषीकेशी । वियोग न सहवे राधेसी ॥
गुप्त होऊनी हिमाचळाशी । मारुती तपासी ते गेली ॥ १६४ ॥
मग तें दिव्य तप करूनी । तेच आली द्वारके लागुनी ॥
श्रीकृष्णें राधेसी देखूनी । आलिंगूनी अंकीं बैसविली ॥
अद्यापि द्वारकेसी जाण । श्रोतीं पहावें जाऊन ॥
होतें राधाकृष्ण पूजन । सर्वजन देखती तें ॥ १६६ ॥
असो अर्धांगी राधा घेऊनी । बैसला असतां चक्रपाणी ॥
तेथें आली रुक्मिणी । हरी चरण पहावया ॥ १६७ ॥
जरी सोळा सहस्र गोपिका असती । सत्यभामादि सकळ युवती ॥
परी त्याही, येतां रुक्मिणी सती । न बैसती हरि अंकीं ॥ १६८ ॥
असो रुक्मिणी आली जों एकदां । तों हरीचे अर्धांगीं बैसली राधा ॥
न धरी रुक्मिणीची मर्यादा । चढली कोपा भीमकी ॥ १७१ ॥
पुढील भविष्य जाणूनी । तात्काळ रुक्मिणी गेली रुसोनि ॥
दक्षिण दिंडिरवनीं येऊनी । तप करीत बैसली ॥ १७२ ॥
मग रुक्मिणी कारणें कृष्णनाथ । सर्व उर्वी मंडळ शोधीत ॥
तो गोकुळासि आला त्वरित । बाळवेष धरी तेव्हां ॥ १७६ ॥
सवें गाई गोपाळ घेऊनी । दक्षिण दिशे आला चक्रपाणी ॥
शोधीत वनीं उपवनीं । ते रुक्मिणी चित्कळा ॥ १७७ ॥
शोधीत शोधीत हृषीकेशी । आला लोहदंड क्षेत्रासी ॥
दिंडीरवन म्हणती त्यासी । ते द्वारकावासी प्रवेशला ॥ १८० ॥
म्हणे प्रिये तुजवांचून । मज युगासम वाटे क्षण ॥
मग रुक्मिणी बोले [illegible] । तूं कोण आदेस सांग पा ॥ १८४ ॥

ऐकोनी भीमकीचें वचन । हास्य करीत मदुसूदन ॥
मग हृदयीं दृढ आलिंगून । केलें समाधान तियेचें ॥ १८७ ॥

तो पुढें पुंडलीक भक्त । माता पितयांची सेवा करीत ॥
तेणें तोषला जगन्नाथ । जाऊन तेथें उभा ठाके ॥ १८८ ॥

हरि म्हणे धन्य धन्य पुंडलिका[१] । वर मागें भक्त टिळका ॥
येरे वीट[२] टाकिली वैकुंठनायका । बैसावया कारणें ॥ १८९ ॥

त्या विटेवरी पद जोडूनी । दोन्ही कर कटीं ठेवुनी ॥
उभा राहिला मोक्षदानी । पुंडलिकास न्याहाळीत ॥ १९० ॥

पुंडलिका वर माग येच क्षणीं । येरु म्हणे जैसा आहेस चक्रपाणी ॥
तैसा चिरकाल ये स्थानीं । उभा राहे भगवंता ॥ १९२ ॥

आणि या क्षेत्राचें नांव पंढरी नगर। दक्षिण द्वारका नाम साचार ॥
रुक्मिणी सहीत तूं सर्वेश्वर । राहें स्थिर येथेंच ॥ १९४ ॥

विठ्ठल नाम अभिधान । चालवावें आतां येथून ॥
मज कोठें न जावें सोडून । कृपाळू वा सर्वेशा ॥ १९५ ॥

म्हणून दक्षिण द्वारका पंढरी । जे विख्यात भूमंडळावरी ॥
सकळ द्वारकेची संपदा[३] मुरारी । आणीत तेव्हां पंढरी ये ॥१९६
जें जें विठ्ठलें कर्णीं सांगितलें । तें तें पत्रीं येथें लिहिलें ॥
न्यून अथवा आगळें । त्याचें तोच जाणें ॥ २१३ ॥
दशम आणि हरिवंश । पद्मपुराणींच्या कथा विशेष ॥
त्याच हरिविजयीं सुरस । श्रोतीं सावकाश परिसावें ॥ २१४ ॥

—हरिविजय अ. ३६

---

१ पुंडलीक हा शब्द पुंडरीक या संस्कृत शब्दापासून झाला असावा. पुंडरीक म्ह. पांढरें कमल. पांढऱ्या कमलाप्रमाणें स्वच्छ उज्वल व नाजुक भक्ति आहे ज्याची तो पुंडलीक.

२. वीट हा शब्द संस्कृत शब्द "इष्टका "पासून झाला आहे. या विटेचें या संशोधनकार्यात अत्यंत महत्त्व आहे. तें पुढें दिसून येईल.

३ पुंडलिकाकरतां जो देव (द्वारका सोडून) धांवत आला तो पांडुरंग किंवा माता-पित्याच्या सेवेंत अंतर न पडतां द्वारकाधीश येथच्या येथें कधी भेटेल अशा रात्रंदिवस तळमळ लागल्यामुळें पांडु वदन झालेला पुंडलीक त्यास दर्शन व वर देऊन रंजविणारा तो पांडुरंग व त्या पांडुरंगाची जी नगरी ती पंढरी किंवा त्याचें जें नगर किंवा पूर तें पंढरपूर.

४. विगतं स्थलं यस्यसःविठ्ठलः म्हणजे ज्यानें आपलें पूर्वीचें स्थल द्वारका सोडून दिलें आहे किंवा ज्याला त्या स्थलाचा वियोग झाला आहे तो विठ्ठल किंवा विटेवर (इष्टकेवर) जो स्थिर तो विठ्ठल. किंवा वीट (इष्टका) हेंच आहे स्थल ज्याचें तें विठ्ठल-पांडुरंग म्ह. उग्र तपामुळें व असह्य विरहामुळें जिच्या मुखावरील रुक्म म्ह. तेज जाऊन त्यावर पांडुरता आली आहे अशा पाडुवदना रुक्मिणीला रंजविणार तो पांडुरंग.

५. सोळा सहस्र स्त्रिया (राधा खेरीज), गोपी, गोपाळ गाई आदिकरून सर्व संपत्ति (पंढरी महात्म्य पहा.)

नातुडे जो कवणेपरी । उभा केला विटेवरी ॥ १ ॥
भला भला पुंडलिका । मानलासी जनलोकां ॥ २ ॥
कोण्या काळें सुखा । ऐसा कोण पावता. ॥ ३ ॥
अवघा आणिला परिवार । गोपी गोपाळांचा भार ॥ ४ ॥
तुका म्हणे धन्य झालें । भुमीं वैकुंठ आणिलें ॥ ५ ॥ २३४४
द्वारकेचें केणें आलें याचि ठाया । पुढें भक्तराया चौजवीत ॥ १ ॥
कां रे पुंड्या मातलासी । उभें केलें विठ्ठलासी ॥ १ २३७७
ऐसा कैसा रे तूं धीट । मागे भिरकाविली वीट ॥ २
युगें झालीं अठ्ठावीस । अजुनी न म्हणवी बैस ॥ ३
भाव देखोनी निकट । देवें सोडिलें वैकुंठ ॥ ४ ॥ २३४६
पुंडलीक भक्तराज । तेणें साधियेलें काज ॥
वैकुंठीचें निज । परब्रह्म आणिलें ॥ १ ॥
पांडूरंग बालमूर्ती । गाई गोपालां संगती ॥
येऊनीया प्रीती । उभे समचि राहिलें ॥ २ ॥ २३४७
वैकुंठीचा देव आणिला भूतळा । धन्य तो आगळा पुंडलीक ॥ १ ॥
धारिष्ट धैर्याचा वरिष्ट भक्तांचा । पवित्र पुण्याचा एकनिष्ठ ॥ २
पितृसेवा पुण्यें लाभला निधान । ब्रह्म सनातन अंगसंगें ॥ ३
अंगसंगें रंगे क्रीडा करी जाणा । ज्या घरीं पाहूणा वैकुंठींचा ॥ ४ ॥
२३४९

श्री तुकारामांची गाथा (पणशीकरशास्त्री यांनीं तपासून निर्णयसागर छापखान्यांत छापलेल्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रतीवरून.)

वरील उतारा श्रीतुकाराम महाराजांच्या गाथ्यांतून घेतला आहे. त्यांत ही अठ्ठावीस युगांपूर्वी वैकुंठींचा देव म्हणजे द्वारकेचे श्रीकृष्ण परमात्मा, पुंडलीकानें मातृ-

पितृ-सेवा पुण्याईनें पंढरपुरास आणिले असें आहे. यावरूनही बाबांच्या वचनाला चांगली पुष्टी मिळते.

श्री हरिविजयांत ( अ. ३२ ) नारदांची नारदी झाली यासंबंधीं जी सुरस कथा वर्णिली आहे, तीही वरील अनुमानाला पोषकच आहे. ती कथा खालीं लिहिल्याप्रमाणें

" यावरी एके दिवशीं नारदमुनी । स्नान करीत सुरनदी[1] जीवनीं ॥
तों मत्स्य आणि मत्स्यिणी । रमतां दृष्टी देखिली ॥ १३ ॥

काय संसार स्त्रीवीण । नाहीं देखिलें पुत्रवदन ॥
आतां विवाह करावा येथून । तरी स्त्री वाढेल कधीं ॥ १४ ॥

तरी आतां घेऊं कृष्णदर्शन । सोळा सहस्र रामा त्या लागून ॥
एक घ्यावी आतां मागून । करूं संतानवृद्धी कांहीं ॥ १५ ॥

विसरला जप तप अनुष्ठान । जवळी घेतला कमंडलु जीवन ॥
हातीं ब्रह्मवीणा घेऊन । मुक्त[2]पुरीस पावला ॥ १६ ॥

जे अनंत शक्तीची स्वामिनी । ते आदिमाया मन्मथजननी ॥
तिये मंदिरीं शार्ङ्गपाणी । बैसला होता तेधवां ॥ १७ ॥

तेथेंचि आला नारदमुनि । तों दृष्टी देखिला मोक्षदानी ॥
हातीं चामर घेऊनी । नारी रुक्मिणी वारीतसे ॥ १८ ॥

हरि म्हणे जलजोद्भवनंदना । कांहीं मज करावी आज्ञा ॥
आजि स्वामींची वासना । परम चंचल दिसतसे ॥ २० ॥

नारद म्हणे घननीळा । व्यर्थ अमुचा काळ गेला ॥
गृहस्थाश्रम नाहीं केला । पुत्र कलत्र न देखों ॥ २१ ॥

तरी तुज बहुत स्त्रिया जगन्मोहना । मज एक देई अंगना ॥
स्त्रीदान करी त्याच्या पुण्या । पार नाहीं सर्वथा ॥ २२ ॥

म्हणे जे गृहीं मी नसें ब्रह्मनंदना ।तेथून अवश्य घ्यावी ललना ॥
बरें म्हणोनि ते क्षणां । सांवरोनि वीणा उठिला ॥ २४ ॥

---

१. " गंगा विष्णु पदीजन्हुतनया सुरनिम्नगा भागीरथी त्रिपथगा त्रिस्रोता भीष्म-सूरपि "–अमरकोश प्रथम कांड वारि वर्ग श्लो. २८६.

२. अयोध्या मथुरा माया ( हरिद्वार ) काशीकांची अवंतिका । पुरी द्वारावती चैव सप्तैते मोक्षदायकाः

गेला दुसरिया गृहाप्रती । तों तेथें बैसलासे जगत्पती ॥
उद्धव अक्रुर उभे असती । विंझणें हातीं घेऊनियां ॥ ३९ ॥
कोठें आचरे कर्मकांड । कोठें उपासना दावी प्रचंड ॥
कोठें ज्ञान कथी वितंड । परम मूढां जीवासी ॥ ४० ॥
ऐसा जे गृहीं रिघे नारद । तिकडे व्यापलासे गोविंद ॥
म्हणे विश्वव्यापक ब्रह्मानंद । रिता ठाव न दिसेचि ॥ ४१ ॥
मग तैसाच वेगें निघाला । भागीरथी तीरास आला ॥
अनुतापें तप्त झाला । स्नानासि चालिला ब्रह्मपुत्र ॥ ४२ ॥
जळीं करितां अघमर्षण । तों मायेनें दाविलें चिंदाण ॥
स्त्रीचें रूप आपण । नारद जाहला तेधवां ॥ ४४ ॥
रंभे ऐसें रूप सुंदर । नारदी झाला मुनीश्वर ॥
तेथें एक पुरुष आला साचार । कामातुर होऊनियां ॥ ४५ ॥
तेणें संग देतांचि तात्काळ । गरोदर झाली नेल्हाळ ॥
नवमास भरतां समूळ । प्रसूत झाली तेधवां ॥ ४६ ॥
तात्काळ झाले साठी पुत्र । प्रभव विभवादी संवत्सर ॥
नारद मुनी करी विचार । म्हणे अनर्थ थोर जाहला ॥ ४७ ॥
मज लागलें स्त्रियेचें ध्यान । तेंच मी जाहलों न लगतां क्षण ॥
मग करीन हरिस्मरण । सोडवी येथून दयाळुवा ॥ ४८ ॥
करितांचि कृष्ण चिंतन । पूर्ववत जाहला ब्रह्मनंदन ॥
बाहेर आला स्नान करून । मग तप दारुण आचरला ॥ ४९ ॥

—हरिविजय अ. ३२

वरील उताऱ्यावरून नारदांची नारदी झाली, व तिला साठ पुत्र झाले असें दिसतें. पण ही गोष्ट घडली कोठें? द्वारकेजवळ असें सकृद्दर्शनीं दिसतें. पण कोणत्या द्वारकेजवळ? पश्चिम द्वारकेजवळ किंवा दक्षिण द्वारकेजवळ? रुक्मिणी मातुःश्री रुसून द्वारका सोडून दिंडिरवनांत ( पंढरीस ) आल्यानंतर किंवा त्यापूर्वी त्या पश्चिम द्वारकेंत असतांना? नारदांनीं सुरनदींत स्नान केलें. नंतर अनुताप पावून भागीरथी तीरावर येऊन तेथें स्नान केलें. ही सुरनदी व भागीरथी म्हणजे पश्चिम द्वारकेला असलेली गोमती गंगा किंवा दक्षिण द्वारकेस असलेली चंद्रभागा ( भीमा ) किंवा शिरडीजवळ असलेली वृद्धगंगा गोदावरी? रुक्मिणी मातुःश्री रुसून ज्या एकदा दिंडिरवनास गेल्या, त्या पुन्हा परत आल्या नाहींत, व त्यांच्या भेटीकरतां श्रीकृष्ण पश्चिम द्वारका सोडून त्यांच्या शोधार्थ जे दिंडिरवनास गेला ते त्यांना भेटून व भक्त मुकुटमणि पुंडलीक यांना

दर्शन देऊन त्यांना वर दिल्याप्रमाणें त्यांच्या विनंतीला मान देऊन दक्षिण द्वारका जी पंढरी तेथेंच विटेवर आज अठ्ठाविस युगें रुक्मिणी माईसह व द्वारकेच्या सर्व संपत्तीसह उभे आहेत. ते पुन्हा पश्चिम द्वारकेला गेले नाहींत. हरिविजयाच्या ३६ व्या अध्यायांतील वर जो उतारा दिला आहे, त्यांतील १९६ व्या ओवींत श्रीकृष्णांनीं द्वारकेची सर्व संपत्ति पंढरींत आणिली असें आहे. तसेंच श्रीसमर्थ तुकोबारायांनीं आपल्या गाथ्यांतील २३४४ व २३४७ व्या अभंगांतही तेंच लिहिलें आहे. सर्व संपत्ति याचा अर्थ सर्व वैभव, सर्व ऐश्वर्य असा घेतला म्हणजे त्यांत सोळा सहस्र एकशें आठ स्त्रियांचाही समावेश होतो. कारण इतक्या स्त्रिया असणें ही एक उत्तम प्रकारची संपत्ति वं ऐश्वर्य आहे. पण अशा प्रकारचा स्त्रियांचा स्पष्ट उल्लेख हरिविजयांत नाहीं. श्रीतुकोबारायांच्या गाथ्यांत गाई गोपाळासह व अवघ्या परिवारासह परमात्मा पंढरीला आले असें लिहिलें आहे. अवघा परिवार व सर्व संपत्ति या दोन शब्दांत सोळा सहस्र स्त्रियांचाही समावेश झालाच पाहिजे असें मला वाटतें.[1] शिवाय वरील हरिविजयांतील १६६ व्या ओवींत अद्यापपावेतों पश्चिम द्वारकेंत राधाकृष्णाचेंच पूजन होतें असें लिहिलें आहे. यावरून ज्या, अंकीं बसलेल्या राधामाईच्या अनुत्थापनामुळें रुक्मिणी माता रुसून दिंडिरवनांत तपाचरणास गेल्या, त्या दोघींची समजूत करण्याकरितां कृष्णपरमात्माच्या शिलक राहिलेल्या ऐश्वर्याचा स्वतंत्र उपभोग एकट्या मानिनी राधेनें पश्चिम द्वारकेंत घ्यावा व रुष्ट झालेल्या रुक्मिणीमातांनीं इतर स्त्रियांच्या व गाई-गोपाळांच्या लवाजम्यासह वर्तमान परमात्माच्या सर्व संपत्तीचा स्वतंत्र उपभोग दक्षिण द्वारकेंत घ्यावा अशी गोड व सुंदर युक्ति काढिली असणें बव्हंशीं संभवनीय दिसतें, व या अनुमानाच्या पुष्टीकरणार्थ नारदांची नारदी दिंडिरवनांत वृद्ध गंगेच्या म्हणजे सुरनदी किंवा भागीरथीच्या म्हणजे गोदावरीच्या तीरावरच झाली असावी असा गोदावरी व सिंहस्थ महात्म, आख्यायिका, व निसर्ग यांचा शिरडी बाजूकडेच सबळ पुरावा मिळतो.

गोदावरी व सिंहस्थ महात्मांत असें वर्णन आहे कीं, अति अति प्राचीन काळीं या भूतलावर कोणतीही नदी नव्हती. श्रीशंकरांनीं त्रैलोक्यांतील सर्व जलाचें सार व शक्ति काढून आपल्या कमंडलूंत भरून ठेविली. त्याला आपोदेवता म्हणत. ब्रह्मदेवाच्या पातकाचा क्षय होण्याकरितां शंकरांनीं तो कमंडलु ब्रह्मदेवास दिला. बलिराजाकडून मागितलेल्या त्रिपाद भूमीपैकीं तिसरें पद कोठें ठेवावें अशी विवंचना वामनमूर्ति परमात्मास पडतांच ब्रह्मदेवानें तो आपोदेवतास्थित कमंडलु पुढें केला. त्यावर परमात्मानीं पद ठेवतांच तें पाणी उसळून मेरूपर्वतावर पडलें, व तेथून जमिनीवर चारी दिशांना

१ श्रीपंढरीमहात्मांत सोळा सहस्र स्त्रियांचा उल्लेख आहे.

वाहूं लागलें. त्यापैकीं दक्षिण दिशेचें पाणी शंकरांनीं आपल्या जटेंत ठेविलें. पुढें श्रीगौतमानीं गोहत्येच्या पातकापासून आपण स्वतः मुक्त होण्याकरितां व भगीरथानीं आपले पितर मुक्त होण्यासाठीं जटेंतील आपोदेवता आपणास मिळाव्या म्हणून शंकराची आराधना केली. शंकरांनीं प्रसन्न होऊन दोघांसही तें पाणी दिलें. त्याप्रमाणें त्या पाण्याचे दोन विभाग होऊन तें पाणी मर्त्य लोकावर आलें, तेव्हांपासून " एवं द्वौरूप्यम भवद्गंगा या गांगता यतः" ती आपोदेवता पृथ्वीवर गेली ( गां=पृथ्वी; गता=गेली ) म्हणून तिला गंगा हें नांव प्राप्त झालें. नंतर माझें कार्य झालें, मी स्वर्गांत जातें, असें गंगामाई गौतमास म्हणाल्या. त्रैलोक्यावर उपकार करण्याकरितां तुला येथेंच राहिलें पाहिजे असें गौतमांनीं तिला सांगितलें. तिला तें म्हणणें पटलें. नंतर तिनें आपल्या शरीराचे १५ तुकडे करून त्यांपैकीं ४ स्वर्गांत, ४ पाताळांत व ७ मृत्युलोकावर ठेविले. विंध्याचलाच्या दक्षिणेस जे सहा मोठे सरित्प्रवाह आहेत ते याच सप्तविभागांपैकीं आहेत, व ते प्रवाह म्हणजे गोदावरी, भीमरथी, तुंगभद्र, वेणिका (वेण्या), तापी व पयोष्णि हे होत. भगीरथानें त्याच वेळीं शंकर जटेंतील जलाचा जो भाग आणिला तो त्यानें उत्तरेस हिमाचलावर ठेवला. त्याचेही असेंच मोठमोठे सहा सरित्प्रवाह झाले. व ते प्रवाह म्हणजे भागीरथी, यमुना, सरस्वती, नर्मदा, विशोका व वितस्ता हे होत.

यावरून गोदावरी ही मृत्युलोकावर सर्वांत आद्य व श्रेष्ठ नदी आहे. गंगेलाच भागीरथी व सुरनदी हीं नांवें आहेत. " गंगा विष्णुपदी जन्हुतनया सुरनिम्नगा। भागीरथी त्रिपथगा त्रिस्रोता भीष्मसूरपि " इत्यमरः प्रथम कांड, वारिवर्ग २८६

त्याचप्रमाणें चंद्रभागा, भीमरथी, भीमा हा गोदावरीचाच प्रवाह होय. गोदावरीस वृद्ध गंगा किंवा गंगेची ज्येष्ठ भगिनी असें म्हणतात.

वरील गोदावरीच्या १२ प्रवाहांत पश्चिम द्वारकेंत असलेल्या गोमती गंगेचा नामनिर्देश नाहीं.

यावरून नारदांची नारदी ज्या सुरनदींत किंवा भागीरथींत झाली, ती कोणती सुरनदी किंवा भागीरथी ? म्हणजे पश्चिम द्वारकेजवळील गोमती गंगा किंवा हरिद्वारची गंगा किंवा श्रीक्षेत्र वाराणसीजवळील भागीरथी किंवा पंढरपुराजवळील भीमरथी चंद्रभागा किंवा शिरडीजवळ असलेल्या संवत्सर क्षेत्रास लागून असलेली गोदावरी आद्य सुरनदी ?

पण नारद सुरनदींत स्नान करून कामातुर होऊन कृष्णपरमात्माच्या सोळाहजार स्त्रियांपैकीं एक मागावयास गेले तें ठिकाण फक्त दोहोंपैकीं एक असणार. एक पश्चिम द्वारका किंवा दक्षिण द्वारका दिंडिरवन, पंढरपूर, शिरडी वगैरे वगैरे. कारण याच दोन ठिकाणीं त्यांचा अवाढव्य स्त्री-परिवार असणार. इतरत्र नाहीं.

आतां या दोन स्थलांतून कोणत्या स्थलांना आख्याइकांचा व निसर्गाचा पुरावा ( प्रमाण, पाठिंबा ) मिळतो तें पाहूं.

शके १८५७ च्या रामनवमी उत्सवांत संवत्सर गांवचे एक भटजी वे. मू. रा. गंगाधर भट पाठक श्रींच्या समाधीवर अभिषेक करण्याकरितां आले होते. त्यांना दक्षिणा देते वेळीं मीं त्यांना सहज विचारलें कीं, तुमच्या गांवाबद्दल तुम्हाला कांहीं दंतकथा, इतिहास किंवा आख्यायिका माहित आहे का? असल्यास मला सांगा. ते म्हणाले, आमचा संवत्सर गांव पुणतांब्याजवळ जें संवत्सर स्टेशन आहे, तेथून ६ मैल लांब असून तो श्रीगोदावरी तीरावर वसलेला आहे. गांवापासून जरा अंतरावर पण गोदातटींच श्रीशृंगेश्वर महादेवाचें फार पुरातन स्थान आहे. आमच्या गांवच्या समोर गोदावरीच्या दुसऱ्या तीरावर कोकमठाण म्हणूनगांव आहे. कोपरगांवाहून संवत्सर ३ मैल लांब आहे. या दोन गांवांच्या दरम्यान दुसऱ्या दोन ल्हान नद्या आहेत, एकीचें नांव नारदा व दुसरीचें नांव गारदा असें आहे. नारदा नदी ही संवत्सर गांवापासून एक मैल पश्चिमेला आहे. ती संवत्सर बाजूनें शृंगेश्वर महादेवाच्या स्थानापासून थोडया अंतरावर गोदावरीला मिळते. गारदा नदी कोकमठाणच्या बाजूनें नारदा नदीच्या समोरच गोदावरीस मिळते.

याच नारदा नदींत नारदाची नारदी झाली अशी येथें फार पुरातन आमच्या वाडवडिलापासून आख्यायिका चालत आली आहे, व नारदांना त्या वेळीं प्रभवविभवादि जीं साठ मुलें झालीं त्यांचीं साठ आसनें ( बसण्याच्या जागा ) गोदावरीच्या पात्रांत आहेत. त्यांपैकीं कांहीं नादुरुस्त आहेत व कांहीं अजूनही नजरेला पडतात. संवत्सरच्या नजीक कृष्णमंदीर आहे, पण तें महानुभाव पंथाच्या लोकांचें असून अगदीं अलीकडचें आहे.

त्यानंतर ता. ६ एप्रिल १९३६ रोजीं कै. श्री. बाबासाहेब तर्खड, श्री. रघुवीर भास्कर पुरंदरे शिरडीच्या मराठी शाळेचे हेड मास्तर श्री. महाजन, श्री. बाळा शिंपी गुरव, श्री. गंगाधर भटजी पाठक व मी अशीं सहा मंडळी शिरडीहून निघून कोपरगांवाहून संवत्सर गांवच्या नजीक असलेल्या शृंगेश्वर देवालयावळ गेलों. श्रीगोदावरीच्या पात्राला लागूनच हें देवालय आहे. तेथें आम्हास गोदावरीमाईच्या पात्रांत नारदा नदीच्या संगमापासून कोकमठाणच्या वडापर्यंत ओळीनें एका सरळ रेषेंत १८ आसनें दिसलीं. त्याच वेळीं गारांचा पाऊस ८-१० दिवस अगोदर याही भागांत पडला असल्यामुळें गोदावरीच्या पात्रांत बराच चिखल झाला होता. मी खेरीज करून बाकीची पांच मंडळी नारदा नदीच्या संगमावर गेली होती. ज्याअर्थी १८ आसनें गोदावरीच्या पात्रांत स्पष्ट व स्वच्छ दिसताहेत, त्याअर्थी बाकीचीं ४२ आसनें ही तेथें असलींच पाहिजेत व तीं पाण्यांत व गाळांत दडून राहिलीं असलीं पाहिजेत, असा त्याचा अजमास झाला. कारण त्या वेळीं जरी गोदावरीच्या पात्रांत पाणी कमी होतें, तरी नारदा नदीच्या संगमाजवळ व आणखी इतर ठिकाणीं पाणी भरपूर व फार खोल होतें. व गाळही यथास्थित होता. त्यामुळें त्यांत दडून राहिलेलीं बाकीचीं ४२ आसनें दिसणें शक्य नव्हतें. पण या १८ आसनावरून बाकीचीं आसनें

तेथें असावी असा आम्हां सर्व मंडळींचा दृढ समज झाला. नारदा, गोदावरी संगम व कोकमठाणचा वड यांत अंतर कमींत कमी दोन मैलांचें येईल. संगमाच्या वरचे बाजूकडे हीं आसनें नाहींत व वडाच्या खालच्या बाजूसही आसनें नाहींत. जीं आहेत, तीं वरील २ मैलांच्या अंतरांतच आहेत. दोन आसनांतील अंतर सारखें नसून कमजास्त आहे. आसनांची लांबी, रुंदी व उंची ही सारखी नाहीं. सर्व आसनें ( बैठका किंवा चवतरे ) नैसर्गिक खडकाचीं असून निरनिराळ्या रंगांचीं आहेत. दोन आसनां मधील अंतर सरासरी शें-दीडशें फुटांचें तरी असेल.

शंगेश्वर मंदिरासमोरील आसन अप्रतिम व अत्यंत प्रेक्षणीय आहे. हें आसन पंचरंगी आहे. हे रंग अगदीं ताजे दिल्याचा भास होतो. पण ते नैसर्गिकच आहेत. सर्व आसनें एका नमुन्याचीं नाहींत. निरनिराळ्या साच्याचीं आहेत. प्रत्येक आसन अजमासें १५–२० फूट लांब, १०–२० फूट रुंद व २–३ फूट उंच आहे.

कोकमठाणच्या वडाजवळ एक देवी आहे. तीही फार पुरातन आहे. मूर्ति नाहीं तांदळा आहे. नैसर्गिक दगडाची आहे. कृत्रिम नाहीं. ही एकसष्ठावी कपिलाषष्ठी असावी असें वाटतें. या देवीसंबंधानें कांहीं दंतकथा किंवा इतिहास नाहीं. पण दरसाल वैशाख महिन्यांत येणाऱ्या अक्षय्य तृतीयेपासून पांच दिवस कोकमठाणच्या व संवत्सरच्या जवळ हजार दीड हजार लोक एकामेकांविरुद्ध आज कित्येक शतकें तिरकमठ्यांनीं, गोफण गुंड्यांनीं, नुसत्या साध्या दगडांनीं, लोखंडी बोंडाच्या काठ्यांनीं, व ढालींनीं गोदावरी पात्रांतील वाळवंटावर आपआपल्या गांवच्या तीरावरून लढाई खेळत असतात. म्हणजे ही एक पर्वणी समजून दोन्ही गांवच्या देवांचा उत्सवच होतो असें दिसतें. लढाईंत संवत्सरचे लोकांचा विजय झाला, म्हणजे ते म्हसोबा की जय अशी मोठ्यानें गर्जना करतात. कोकमठाणच्या लोकांचा जय झाला तर ते लक्ष्मी आई की जय अशी गर्जना करतात.

कपिलाषष्ठी ही साठ वर्षांनीं म्हणजे प्रभवादिभवादि साठ संवत्सरें संपलीं म्हणजे ६१ व्या वर्षी येते असें सर्वविश्रुत आहे. यावरून ती नारदांचीच कन्या, साठ संवत्सर झाल्यानंतर झाली असावी असें वाटतें. याबद्दल पुराणांत मला अद्याप आधार सांपडला नाहीं. पण कै. बापूसाहेब करंदीकर यांनीं मला सांगितलें कीं, कपिलाषष्ठी ही नारदाचीच मुलगी आहे व ही कथा पद्मपुराणांत आहे. पण पद्मपुराण मला अद्याप वाचावयास मिळालें नाहीं. साठ पुत्र झाल्यावर एकसष्ठावी ही कपिलाषष्ठी कन्या नारदांना झाली असावी व तीच कोकमठाणचे वडाखालील देवी असावी असें अनुमान निघतें.

व्रतराज ग्रंथांतील कपिलाषष्ठीसंबंधाचा उतारा खालीं देत आहे. त्यावरून येथें म्हणजे या भागांत पूर्वी द्वारका होती असें दिसतें.

"भाद्रमासस्य सिते पक्षे । षष्ठी भौमेन संयुता ॥
व्यतिपातेन रोहिण्या । सा षष्ठी कपिला स्मृता ॥

अश्विनस्य सिते पक्षे । महा पुण्य प्रवर्धिनी ॥
षष्ठि संवत्सरस्यांते । सा पुन्स्तेन संयुता ।
चैत्र वैशाखयो मध्ये । सिते पक्षे शुभोदये ॥
वैशाखेऽपिच राजेंद्र । द्वारवत्यां परास्मृता ॥

कपिलाषष्ठी या शब्दाचेंच अपभ्रष्ट रूप कोकमठाण असावें असें वाटतें. कपिल=कोकम, कुंकुम=षष्ठी=स्थान, ठाण

वरील लढाईंत कित्येकजण जखमीही होतात. पण एकमेकांवर ते कधींही फिर्याद करीत नाहींत. इतकेंच नव्हे, तर कोणी गरीब असून जखमी झाला तर सर्व लोक वर्गणी करून त्याच्या औषधपाण्याची सोय करतात. ही लढाई कां खेळतात ह्याचें कारण समजत नाहीं. पण फार पुरातन कालापासून ही वहिवाट आहे. यावरून ही लढाई म्हणजे कोकमठाण देवीचा म्हणजे कपिलाषष्ठीचा वार्षिकोत्सव आहे व तो वर लिहिल्याप्रमाणें वैशाख शुद्ध ३, ४, ५, ६ व ७ या दिवशीं होतो व वैशाखांत कपिलाषष्ठी मानण्याची पुरातन चाल फक्त द्वारकेंतच होती व ती कोकमठाण व संवत्सर याच ठिकाणीं दृष्टीस पडते. यावरून पूर्वी एका काळीं द्वारका या भागांत होती असें अनुमान निघतें. नारदांना जेव्हां स्त्रीचें वेड लागलें, तेव्हां तेच स्त्रीरूप झाले, व स्नान करून वरती येतात तोंच

" तेथें एक पुरुष आला साचार । कामातुर होऊनियां ॥ ४५
तेणें संग देतांचि तात्काळ । गरोदर झाली वेल्हाळ ॥
नवमास भरतां समूळ । प्रसूत झाली तेधवां ॥ ४६ ॥

–हरिविजय अ. ३२

हा पुरुष कोण अशी शंका येते. पण मला वाटतें हा पुरुष श्रीकृष्ण परमात्म्यापेक्षां दुसरा कोण असणार ? कारण त्यांनींच आपल्या अगम्य करामतीनें नारदांची नारदी केली अर्थात् तिचा काम शांत करण्याकरितां आपणच त्या ठिकाणीं लागलीच कामातुर पुरुष बनले, व तिला संग दिला.

आतां येथें जशा नारदी, नारदा नदी, संवत्सर गांव, साठ संवत्सरांचीं आसनें वगैरे गोष्टी जुळून आल्या, तसें येथें ज्यानें नारदीला संग दिला त्या श्रीकृष्ण परमात्म्याचें निदान मंदिर तरी पाहिजे. पण मजेची गोष्ट अशी कीं, कोकमठाण गांवात नदीच्या किनाऱ्यावर एक फार पुरातन दगडी असें श्रीकृष्णाचें मंदिरही आहे. त्याला दामोदर मंदीर असें म्हणतात. तेथें असलेल्या एक-दोन मूर्तीखंडावरून असें दिसतें कीं, मंदिरांतील दामोदरमूर्ति प्रथम काळ्या घोंटीव दगडाची असावी. पण पुढें ती कोणी तरी व केव्हां तरी मुद्दाम फोडली असावी किंवा कांहीं कारणानें नाहींशी केली असावी. हल्लीं त्या मंदिरांत जी मूर्ति आहे ती निराळ्या दगडाची असून ती कालिया सर्पानें वेढे

घातलेली अशी कृष्णाची मूर्ति आहे. कांहीं असो. नारदीला संग देणाऱ्या पुरुषाचें ( श्रीकृष्णाचें-दामोदराचें ) मंदीर पण तेथें आहे. हेंही मंदीर श्री. पुरंदरे, बाळा गुरव, मी, माझें कुटुंब व ज्येष्ट भगिनी आऊताई व देशपांडे-स्नुषा सौ. राधाबाई अशा सद्दा मंडळींनीं ता. २३-४-३६ रोजीं कोकमठाणला जाऊन पाहिलें. गांवचे वृद्ध लोक तेथें आले होते. पण कोणालाच या देवाचा, व देवालयाचा इतिहास अथवा आख्याइका माहित नसल्याचें दिसलें.

हें मंदीर अति जुनें असून दगडाचें आहे, व तें गोदावरीस पुरातन बांधलेल्या अनंत घाटावर आहे. ह्या घाटाचें नांवही दामोदर मंदिराची किंवा कृष्ण मंदिराची साक्ष पटवीत आहे.

ह्या मंदीरावर नक्षी व चित्रें कोरलीं आहेत. दामोदर मूर्ति चतुर्भुज आहे. चार हातांत अनुक्रमें शंख, चक्र, गदा, व पद्म अशीं अयुधें आहेत. ही मूर्ति तीन-साडेतीन फूट उंचीची लहान तरुण वयाची आहे, अंगावर लेणीं आहेत, कालिया सर्पाचा वेढा सर्व अंगाला दिला आहे, डोक्यावर मुकुट आहे व मुगुटाच्या मागील बाजूकडून कालिया सर्पाची फडा मुकुटावर आली आहे, दामोदर मूर्तीच्या पायाखालीं दोन मूर्ति आहेत. एक पुरुषाची व एक स्त्रीची. स्त्रीच्या डोक्यावर दामोदरांनीं आपली गदा मारिली आहे. पद्म ही मूर्ति अलग असून भंगलेली आहे. गाभाऱ्याच्या दरवाजावर गरुडाची मूर्ति आहे. व मंदिराच्या दरवजावर दोन्ही बाजूंला ज्या अनेक लहान लहान मूर्ति आहेत, त्यांत जय-विजयांच्या मूर्ती आहेत. उजव्या बाजूला देवाची मूर्ति आहे. या देवीची माहिती वराह पुराणांत आहे; या पुराणांत या गांवाला कोकामह असें नांव दिलें आहे असें मला एका भटजींनीं सांगितलें. मी वराहपुराण संगमनेर येथें वाचलें. पण मला त्यांत ही माहिती मिळाली नाहीं.

या दामोदर मंदीरांत अलीकडे कोणी तरी एक शंकराची पिंडी व नंदी बसविला आहे; पण या मंदीराला कोणीं शिवालय, शिवमंदीर किंवा शंकरालय म्हणत नाहींत. दामोदर मंदीरच म्हणतात.

गारदानदी संबंधानें इतिहास किंवा आख्यायिका उपलब्ध होत नाहीं; तरीपण कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, नारद नारदा नदींत स्नान केल्याबरोबर स्त्रीरूप नारदी झाले. पण त्यांना त्या स्त्रीरूपाचा व संसाराचा कंटाळा येऊन अनुताप झाला, तेव्हां त्यांनीं गारदा नदींत स्नान केलें व त्यामुळें त्यांना पूर्ववत पुरुषरूप प्राप्त झालें. म्हणजे संसार-तप्त झालेल्या नारदाला ज्या नदीच्या स्नानापासून गारपणा (थंडता, शीतलता, शांतता ) मिळाला ती गारदा. गार=थंड. थंडपणा देणारी ती किंवा गारपणा देणारी किंवा गार करून सोडणारी ती गारदा. पण यांत गार शब्द मराठी व दा शब्द संस्कृत म्हणजे हा

घेडगुंजरी समास होईल. तथापि स्त्रीरूपाच्या तापापासून मुक्त करणारी ती गारदा असा या घेडगुजरी समासाचा अर्थ मात्र होऊं शकेल. असो. त्याबद्दल विद्वान तज्ञ संशोधकांनीं स्थळ पाहून विचार करावा.

मला पंढरीमहात्म्य नुक्तेंच शिरडीस वाचावयास मिळालें. त्यावरून वरील अनुमानाला चांगलीच वळकटी येऊन त्यांतील बऱ्याचशा स्थलांच्या जागेचा व अर्थाचा खुलासा व उलगडा होतो.

## श्रीरुक्मिणी मातुःश्रींची दिंडीर वनांतील तपश्चर्येची जागा, व त्या वनाची मर्यादा

पाहूनिया एकांत स्थान ॥ तप मांडिलें दारुण ॥ मज शोधाया जगउजीवन ॥ येईल आपण या ठाया ॥ १७ ॥ दंडकारण्य गोदातीर ॥ तिच्या उत्तरेस तीर्थ सुंदर ॥ त्याहून विशेष अपार ॥ दक्षिण दिशे तीर्थें असती ॥ १८ ॥ दक्षिण कोल्हापूर क्षत्र ॥ काशीहूनी शतगुणी थोर ॥ तेथें राहतां आहोरात्र ॥ होय उद्धार प्राणियां ॥ १९ ॥ त्याचें द्वादश योजनें पूर्वें । कृष्णातीर सुंदर बरवें ॥ तें शूर्पाल क्षेत्र जाणावें ॥ अति उत्तम साजिरें ॥ २० ॥ त्याचें उत्तरेस द्वादश योजने थोर ॥ दिंडीरवन महा घोर ॥ लोहदंड पूर्ण क्षेत्र ॥ नाम तया जाण पां ॥ २२ ॥ षोडश गांवें गोदातीर ॥ त्याचे उत्तरेसि निर्धार ॥ क्षेत्राचें पश्चिमेस करवीर द्वादश योजनें नेमस्त ॥ २३ ॥ तया दिंडीरवनीं ॥ तप करी रुक्मिणी । सर्व सौभाग्य कारणी ॥ तेथें रुसोनि बैसली ॥ २४ ॥ वेणुनादीं गोपाळ रिझवुनी ॥ पुढें एकलाचि चक्रपाणी ॥ प्रवेशला दिंडिरवनीं ॥ म्हणे येथें रुक्मिणी पाहे पां ॥ ३४ ॥ अगाध कल्पांच्या युगांतरीं ॥ उभा अठ्ठावीस द्वापारीं ॥ ते युगिची कृष्णावतारी ॥ तप करीत रुक्मिणी ॥ ५४ ॥ पंढरी म. अ. १

## त्या वनास दिंडीरवन व लोहदंड हें नांव कसें पडलें ?

त्या वनामाजी अद्भुत ॥ दिंडीरनामे असे दैत्य ॥ तो चालूं नेदी सूर्याचा रथ ॥ लोकसमस्त पीडीतसे ॥ ५६ ॥ दिंडिर दैत्य आणि मल्लिकार्जुन ॥ यांचें सहस्त्रवर्षें युद्ध दारुण ॥ मग गदा[1]प्रहारें करून ॥ दैत्यासि मल्लिकार्जुन मारी ॥ ६७ ॥ माझ्या नामें करून ॥ यासि म्हणति दिंडिरवन ॥ स्वामी तुवां ही येथें राहून ॥ हेंच वन उद्धरावें ॥ ६८ ॥ दिंडिरवनासि होता वर ॥ रुक्मिणी तप करी दुर्धर ॥ म्हणोनियां श्रीधर ॥ उद्धरावया आला तेथें ॥७०॥ अध्याय १ ला

---

१ गदाप्रहार=( लोखंडाच्या विवक्षित प्रकारानें बनविलेले काठीनें ) लोखंडाच्या काठीनें=म्हणून त्यास लोहदंड हें नांव पडलें.

पंढरपूर ( लोहदंड, दिंडीरवन ) दक्षिणद्वारका

क्षेत्राची मर्यादा व व्याप्ति

पंढरीचें पूर्व द्वार ॥ त्रिविक्रम पवित्र क्षेत्र । तेथीचा महिमा अपार ॥ कीती तरी वर्णावा ॥ १ ॥ त्रिविक्रम रक्षितद्वार ॥ दक्षिण द्वारीं गूर्पाळ क्षेत्र ॥ अश्वत्थरूपीं श्रीधर ॥ कृष्णातीरीं विराजे ॥ २ ॥

आतां पश्चिमेचें द्वार ॥ तें जाणिजे करवीर ॥ तीर्थ पवित्र साचार ॥ स्नानें उद्धार प्राणियां.

आतां उत्तरेचें द्वार ॥ तें प्रवरा संगमी गौतमी तीर ॥ पूर्वाभिमुक तें सुंदर ॥ सिद्धेश्वर देव तेथें ॥ ६ ॥ अ. ३

परमात्मांनीं दक्षिण द्वारकेंत द्वारकेची सर्व संपत्ति आणिली त्यांत सोळा सहस्र स्त्रियांही आणिल्या होत्या.

द्वारकेची संपदा सकळीक ॥ पंढरीसी आणिली देख ॥ वामभागीं उभी सुरेख ॥ रुक्मिणी देवी हांसत ॥२७॥ रुक्मिणीस पती समजाऊं आला ॥ आणिक कृष्णनायकास कळला ॥ तोचि पंढरीसी आला ॥ सोळा सहस्र पातल्या ॥ ३०॥ द्वारका सागरीं बुडविली ॥ सुदर्शनावरी धरिली ॥ पंढरी अद्यापि रक्षिली ॥ तेणें सकल विघ्न निरसे ॥ ३१ ॥ द्वारके भौवतें सुदर्शन ॥ रक्षित होतें अनुदिन ॥ तेथें सकळ यादव संहारून । द्वारका जाण बुडविली ॥ ३२ अ. ॥

परमात्मांच्या सोळा सहस्र स्त्रिया इकडे आल्या व त्या इकडेच राहिल्या यावरून नारदाची नारदी इकडेच झाली या अनुमानास व नैसर्गिक पुराव्यास चांगली बळकटी येते. सुरनदी किंवा भागीरथी म्हणजे गोदावरीच या अनुमानास ही सत्यता येते, व इकडे पूर्वी द्वारका ( दक्षिण द्वारका ) होती ह्या म्हणण्याची ही सत्यता पटते, व पंढरपूरच्या ( चार द्वारांचे ) मंडलांत किंवा घेरांत शिरडी येते. म्हणजे शिरडी हा द्वारकेचा भाग होता हें पंढरी महात्मावरून स्पष्ट होतें.

परमात्मास या वेळीं इकडे येण्यास कारणें झालीं तीं.

१ श्रीरुक्मिणीमाईची समजूत करणें.

२ दिंडिरवनाचा उद्धार करणें.

३ भक्त शिरोमणि पुंडलीक यांना दर्शन देणें. व वर देणें.

पंढरपूर ( म्हणजे दक्षिण द्वारका ) च्या चारी द्वारांच्या मर्यादे क्षेत्रांवरून शिरडी हें ठिकाण दक्षिण द्वारकेच्या कक्षेंत येतें, हें सोबत जोडलेल्या नकाशावरून दिसून येईल.

पंढरीस पुष्कळ तीर्थें आहेत. त्यांत तीन मुख्य आहेत. बिंदुतीर्थ ( महाद्वारांत ), लक्ष्मीतीर्थ व सूर्यतीर्थ चंद्रभागेच्या वाळवंटांत. बिंदुतीर्थ गुप्त आहे. तें पांडुरंगाचें

मूलस्थान, लक्ष्मीतीर्थ श्रीरुक्मिणीमातुःश्रींच्या तपश्चर्येचें ठिकाण व सूर्य तीर्थ हें श्रीपुंडलिकांच्या आश्रमाचें स्थान आहे.

## भीमा नदीची उत्पत्ति कशी व कोठें झाली, व ती पंढरीस कशी आली व तिचें महत्त्व.

**शिव म्हणे मृडानी । मी त्रिपुर दैत्यातें मर्दुनी । श्रम पावोनी विठ्ठल ध्यानी । भीमाशंकरीं बैसलों ॥ १०१ ॥ तप करितां अति दुर्धर । अंगीं चालिला घर्मपूर । तेचि भीमा साजिर । भीमरूपें धावली ॥ १०२ ॥ गडगडा ते गर्जत । आली पंढरीपर्यंत । तों पुंडलिकापुढें भगवंत । देखोनि विस्मित ते झाली ॥ १०३ ॥ जैसी विख्यात भागीरथी । तैसी भीमरथी पावनक्षिती । शिवें आपली ज्ञानभक्ती । तेणें प्रकटविली त्याच रूपें ही ॥ १०६ ॥ पुंडलिकाश्रमीं सूर्यतीर्थ । उभा पुढें लक्ष्मीकांत । कौतुक पहावया येथ । भीमरथी पातली ॥ १०७ ॥**

भीमा नदी ही दिंडिरवनाची किंवा दक्षिण द्वारकेची किंवा पंढरपूर क्षेत्राची मध्यरेषा आहे, हें सोबतच्या नकाशावरून दिसून येईल.

याच श्रीभीमरथीमाईच्या वाळवंटांत एक विष्णुपद म्हणून तीर्थ आहे. याच तीर्थाला वेणुनाद असें नांव आहे. कृष्णपरमात्मा पश्चिम द्वारकेंतून निघून गोकुळांत येऊन नंतर दक्षिणेंत रुष्ट झालेल्या रुक्मिणीमाईचा शोध व समजूत करण्याकरितां आले ते प्रथम त्यांच्याबरोबर असलेल्या लवाजम्याला वेणुनादीं ठेवून आपण एकटेच दिंडिरवनांत शिरले. नंतर त्यांची समजूत करून पुंडलिकांच्या इच्छेप्रमाणें त्यांनीं दिंडिरवनांत दक्षिण द्वारका स्थापन करून पंढरी हें त्याचें केंद्र बनविलें, व वेणुनादीं स्वहस्तें काला करण्यास सुरवात केली, व तेव्हांपासून उत्तरेंतील गोकुलपुरींतील काला दक्षिण द्वारकेंत पंढरींत वेणुनादीं होऊं लागला, व तोच काला बाबांनीं स्वहस्तें शिरडींत तीन प्रकारें त्याच्या समाधि स्थितीपर्यंत करून दाखविला. नंतर श्री भीष्मशास्त्री बाळाबुवा, व ह. भ. प. श्री दासगणूमहाराज हे शिरडी हा दक्षिण द्वारकेचा भाग असल्यामुळें काला कीर्तन स्वरूपांत शिरडींत करूं लागले, असें दिसतें. (श्रीसाई कालाकीर्तनाख्यान पाहा.)

या काल्याच्या प्रथेवरून ही शिरडी ही द्वारका व बाबा हे कृष्ण असें सिद्ध होतें.

आतां विंध्यपर्वताच्या दक्षिण भागांत पूर्वी गोड पाण्याचा समुद्र होता, असें कै. श्री. विष्णुपंत करंदीकर यांनीं आपल्या ता. १७ ऑगस्ट १९३४ च्या केसरी पत्रांतील लेखांत लिहिलें आहे. तरी या गोष्टीला शिरडीचे बाजूस आणखी ही निसर्गाचा पुरावा आहे, असें श्री. माधवराव विष्णु सहस्रबुद्धे इरिगेशन सब ओव्हरसिअर, कंट्राक्टदार, शिरडी विभाग यांचें म्हणणें आहे. त्यांचे म्हणणें समुद्र या भागांत ( श्रीगोदावरी व कृष्णामाई या दोन महानद्यांच्या मधील प्रदेशांत ) होता इतकेंच नव्हे, पण त्याचें मंथनही याच भागांत झालें

असलें पाहिजे. समुद्रमंथन जें झालें तें गोड्या समुद्राचें म्हणजे क्षीरसागराचें झालें, व तें मुख्यत्वें अमृताकरितां झालें. तें देव व दैत्य यांनीं केलें. प्रथमच विष निघालें. तें ज्यांनीं घ्यावें त्यांनीं अमृत घ्यावें असें ठरलें. शंकरांनीं विष घेतलें. तेव्हां अमृत देवांच्या वांटणीला आलें. पण दैत्यांची इच्छा राहिली. दैत्य आपल्याला अमृत पचूं देणार नाहींत म्हणून विष्णूंनीं मोहनीरूप धारण करून, दैत्यांना मोहनी घालून आपण अमृत सर्व देवांना देण्याकरतां सिद्ध झाले. अमृत प्राशनाकरितां देवपंक्ति बसली. शंकर ( ऊर्फ म्हातार देव ) सर्व देवांच्या शेवटीं बसले. राहू व केतु या राक्षसांना मोह आवरेना म्हणून ते विष्णूला व इतर देवांना नकळत देवांच्या पंक्तींत बसले व अमृत प्राशन करूं लागले. इतक्यांत ही लबाडी चंद्रानें व सूर्यानें विष्णूच्या नजरेला आणिली, तेव्हां विष्णूंनीं सुवर्णपात्रांनीं राहूचें शीर ( केतु ) छेदन केलें. तें राहूचें शिराविरहीतचें धड हल्लीं नगरजिल्ह्यांत राहुरी तालुक्यांत शिरडी पासून २५–३० मैल असणाऱ्या राहुरी गांवांत, असलेल्या राहूच्या मंदिरांत आहे. मीं हें मंदीर समक्ष पाहिलें आहे, व राहुरीपासून सुमारें ८०–८५ मैल अंतरावर असणाऱ्या रतनगड गांवीं केतूचें मंदीर आहे. त्यांत केतूचें धडावांचून नुसतें शिरच आहे तें मीं पाहिलें नाहीं. पण राहुरीचे व त्या भागांतील सर्व लोक ही दंतकथा सांगतात, व ही समुद्रमंथनकथा पद्मपुराणांत ८--९--१०व्या अध्यायांत दिली आहे, ती मीं वाचली आहे; ( संस्कृत प. पुराण व्हॉल्यूम २, श्री. कै. म. चि. आपटे यांनीं पुणें-आनंदाश्रमांत सन १८९४ सालीं छापून प्रसिद्ध झाला आहे तो पहा. )

रतनगड या नांवाची व्युत्पत्ति ही आपल्या मुद्दयाला पोषकच आहे. प्रवरा नदी रतनगडावरूनच निघते. तिला अमृतवाहिनी असें म्हणतात. राहूनें गिळलेलें अमृत केतूच्या मुखांतून या गडावर बाहेर पडलें व तें प्रवाहरूपानें वाहूं लागलें, त्यास प्रवरा ( अति श्रेष्ठ ) किंवा अमृतवाहिनी हें नांव मिळालें. रत्नगड–रतनगड–क्षीरसमुद्र मंथनांतून निघालेल्या १४ रत्नांपैकीं अमृत हें रत्न ज्या गडावर केतु मुखांतून पडलें तो रत्नगड किंवा रतनगड.

विषप्राशन केलेल्या म्हातार देवाचें ( शंकराचें ) मंदीर मौजे घाट शिरस, महाल पाथर्डी, जि. नगर येथें हल्लीं आहे, व १४ रत्नें वांटण्याच्या वेळीं हे म्हातार देव देवांच्या पंक्तींत शेवटीं बसले होते व त्यांनीं विषरत्न आपल्यास घेतलें अशी घाटशिरस येथें व तिकडील भागांत आख्यायिका आहे, असें शिरडीचे तलाठी श्री. प्रल्हाद सदाशिव गुंफेकर, राहणार नेवासें, हे सांगतात.

श्रीविष्णूंनीं मोहिनी स्वरूप धारण केलें, तें अद्यापही त्याच नांवानें म्हणजे मोहिनी-राज या नांवानें शिरडीहून २५-३० मैल दूर असलेल्या नेवासें ( निधिनिवास ) क्षेत्रीं विराजमान झाले आहेत. समुद्र मंथनांतून निघालेल्या १४ रत्नांपैकीं लक्ष्मी, कौस्तुभ,

शंख व धनुष्य हीं चार रत्नें विष्णूनीं ( मोहिनीराजांनीं किंवा अर्धनारीनटेश्वरांनीं ) आपल्याकरतां ठेविलीं. हल्ली नेवासास मोहिनीराजांचे अर्धांगी लक्ष्मी आहे, हें सुप्रसिद्ध आहे. मोहिनीराजांना त्यावरूनच अर्धनारीनटेश्वर म्हणतात. त्यांचा अर्धा भाग पुरुषाचा व अर्धा भाग स्त्रीचा आहे. अर्ध्या भागास पुरुष वेष व अर्ध्या भागास स्त्री-वेष घातलेला असतो. याच मोहिनीराजांना, भगवान् श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं श्रीज्ञानेश्वरींत १८ व्या अध्यायांत १८०४ या ओंवींत श्रीमहालया व ( राजवाडे प्रतींत १७८२ व्या ओंवींत ) महालसा असें म्हटलें आहे. मीं नेवासें स्वतः पाहिलें आहे.

ऐरावत, कामधेनु, रंभादि देवांगना, पारिजातक, धन्वंतरी, हीं पांच रत्नें देवांचा राजा इंद्र यांनीं आपल्याकरतां ठेविलीं, त्या इंद्राचें स्थान बेलापूर ( इंद्र स्थापित बिल्वेश्वर अपभ्रंश बेलापूर ) येथें आहे. (श्री. हरि गणेश पारखे, बी. ए. एलएल्. बी. नगर जिल्हा स्कूल बोर्ड चेअरमन यांचा १९३१ सालीं लिहिलेला " आमचा नगर जिल्हा " ).

कालकूट विष व चंद्र हीं दोन रत्नें शंकरांनीं आपल्याकरितां ठेविलीं. त्या शंकराचें स्थान घाटशिरस हें आहे.

देवांचें वैद्यराज अश्विनीकुमार किंवा धन्वंतरी हें रत्न इंद्रांनीं घेतलें. पण तें अश्विनीकुमार ज्या ठिकाणीं राहिले होते तें ठिकाण अश्वी या नांवानें प्रसिद्ध आहे. तसेंच धन्वंतरीचें घराणें कायगांव टोक्यास प्रसिद्ध आहे.

चंद्र हें रत्न जरी शंकरांनीं ठेवलें, तरी जेव्हां तें सागराच्या उदरांतून बाहेर आलें तेव्हां ज्या स्थानीं पृथ्वीतलावर राहिलें, तें स्थान अद्याप पावेतों चांदगांव या नांवानें प्रसिद्ध आहे व तेथें चंद्रेश्वर महादेवाचें मंदिर आहे.("आमचा नगर जिल्हा" या पुस्तकांत आहे.)

ज्या सूर्यनारायणानें आपल्याकरतां सात तोंडांचा घोडा हें रत्न ठेवलें, त्या सूर्यनारायणाचें यमस्थान किंवा विवस्वान स्थान म्हणजे कोल्हार हें आहे. ( " आमचा नगर जिल्हा " पारखे कृत यांत आहे.

ज्या दैत्यराज जरासंधानें मथुरेवर १८ हल्ले केले, त्या जरासंधाची नगरी जोर्वे येथें होती याबद्दलची दंतकथा मला जोर्वें, ता. संगमनेर येथील रहिवासी श्री. एकनाथ गोपाळशेट सोनार, वय अजमासें ६० ६६ यांनीं ता. २३-१०-३३ रोजीं शिरडी येथें अशी सांगितली कीं त्यांच्या गांवीं [illegible] महार याच्या घरास ११ हात लांबीची व २४ इंच घेराची एक हाडाची तुळई ( beam ) होती. ती ( एकनाथशेटनीं ) त्यांनीं स्वतः ४० वर्षांपूर्वी आपल्या डोळ्यांनीं पाहिली होती. त्या महाराचा निर्वंश झाला म्हणून ती तुळई गांवकरी लोकांनीं त्यांचे गांवीं असलेल्या प्रवरा नदींत टाकून दिली. ही नगरी जरासंधानें पालथी केली, म्हणून तेथें जी मडकीं-गाडगीं जमिनींत सांपडतात तीं पालथीं सांपडतात.

असलें पाहिजे. समुद्रमंथन जें झालें तें गोडया समुद्राचें म्हणजे क्षीरसागराचें झालें, व तें मुख्यत्वें अमृताकरितां झालें. तें देव व दैत्य यांनीं केलें. प्रथमच विष निघालें. तें ज्यांनीं घ्यावें त्यांनीं अमृत घ्यावें असें ठरलें. शंकरांनीं विष घेतलें. तेव्हां अमृत देवांच्या वांटणीला आलें. पण दैत्यांची इच्छा राहिली. दैत्य आपल्याला अमृत पचूं देणार नाहींत म्हणून विष्णूंनीं मोहनीरूप धारण करून, दैत्यांना मोहनी घालून आपण अमृत सर्व देवांना देण्याकरतां सिद्ध झाले. अमृत प्राशनाकरितां देवपंक्ति बसली. शंकर ( ऊर्फ म्हातार देव ) सर्व देवांच्या शेवटीं बसले. राहू व केतु या राक्षसांना मोह आवरेन म्हणून ते विष्णूला व इतर देवांना नकळत देवांच्या पंक्तींत बसले व अमृत प्राशन करूं लागले. इतक्यांत ही लबाडी चंद्रानें व सूर्यानें विष्णूच्या नजरेला आणिली, तेव्हां विष्णूंनीं सुवर्णपात्रांनीं राहूचें शीर ( केतु ) छेदन केलें. तें राहूचें शिराविरहीतचें धड हल्लीं नगरजिल्ह्यांत राहुरी तालुक्यांत शिरडी पासून २५-३० मैल असणाऱ्या राहुरी गांवांत, असलेल्या राहूच्या मंदिरांत आहे. मीं हें मंदीर समक्ष पाहिलें आहे, व राहुरीपासून सुमारें ८०-८५ मैल अंतरावर असणाऱ्या रतनगड गांवीं केतूचें मंदीर आहे. त्यांत केतूचें धडावांचून नुसतें शिरच आहे तें मीं पाहिलें नाहीं. पण राहुरीचे व त्या भागांतील सर्व लोक ही दंतकथा सांगतात, व ही समुद्रमंथनकथा पद्मपुराणांत ८--९--१०व्या अध्यायांत दिली आहे, ती मीं वाचली आहे; ( संस्कृत प. पुराण व्हॉल्यूम २, श्री. कै. म. चि. आपटे यांनीं पुणें-आनंदाश्रमांत सन १८९४ सालीं छापून प्रसिद्ध झाला आहे तो पहा. )

रतनगड या नांवाची व्युत्पत्ति ही आपल्या मुद्द्याला पोषक आहे. प्रवरा नदी रतनगडावरूनच निघते. तिला अमृतवाहिनी असें म्हणतात. राहूनें गिळलेलें अमृत केतूच्या मुखांतून या गडावर बाहेर पडलें व तें प्रवाहरूपानें वाहूं लागलें, त्यास प्रवरा ( अति श्रेष्ठ ) किंवा अमृतवाहिनी हें नांव मिळालें. रत्नगड--रतनगड--क्षीरसमुद्र मंथनांतून निघालेल्या १४ रत्नांपैकीं अमृत हें रत्न ज्या गडावर केतु मुखांतून पडलें तो रत्नगड किंवा रतनगड.

विषप्राशन केलेल्या म्हातार देवाचें ( शंकराचें ) मंदीर मौजे घाट शिरस, महाल पाथर्डी, जि. नगर येथें हल्लीं आहे, व १४ रत्नें वांटण्याच्या वेळीं हे म्हातार देव देवांच्या पंक्तींत शेवटीं बसले होते व त्यांनीं विषरत्न आपल्यास घेतलें अशी घाटशिरस येथें व तिकडील भागांत आख्यायिका आहे, असें शिरडीचे तलाठी श्री. प्रल्हाद सदाशिव गुंफेकर, राहणार नेवासें, हे सांगतात.

श्रीविष्णूंनीं मोहिनी स्वरूप धारण केलें, तें अद्यापही त्याच नांवानें म्हणजे मोहिनी-राज या नांवानें शिरडीहून २५-३० मैल दूर असलेल्या नेवासें ( निधिनिवास ) क्षेत्रीं विराजमान झाले आहेत. समुद्र मंथनांतून निघालेल्या १४ रत्नांपैकीं लक्ष्मी, कौस्तुभ,

शंख व धनुष्य हीं चार रत्नें विष्णूनीं ( मोहिनीराजांनीं किंवा अर्धनारीनटेश्वरांनीं ) आपल्याकरतां ठेविलीं. हल्ली नेवाशास मोहिनीराजांचे अर्धांगी लक्ष्मी आहे, हें सुप्रसिद्ध आहे. मोहिनीराजांना त्यावरूनच अर्धनारीनटेश्वर म्हणतात. त्यांचा अर्धा भाग पुरुषाचा व अर्धा भाग स्त्रीचा आहे. अर्ध्या भागास पुरुष वेष व अर्ध्या भागास स्त्री-वेष घातलेला असतो. याच मोहिनीराजांना, भगवान् श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं श्रीज्ञानेश्वरींत १८ व्या अध्यायांत १८०४ या ओवींत श्रीमहालया व ( राजवाडे प्रतींत १७८२ व्या ओवींत ) महालसा असें म्हटलें आहे. मीं नेवासें स्वतः पाहिलें आहे.

ऐरावत, कामधेनु, रंभादि देवांगना, पारिजातक, धन्वंतरी, हीं पांच रत्नें देवांचा राजा इंद्र यांनीं आपल्याकरतां ठेविलीं, त्या इंद्राचें स्थान बेलापूर ( इंद्र स्थापित बिल्वेश्वर अपभ्रंश बेलापूर ) येथें आहे. (श्री. हरि गणेश पारखे, बी. ए. एल्एल्. बी. नगर जिल्हा स्कूल बोर्ड चेअरमन यांचा १९३१ सालीं लिहिलेला " आमचा नगर जिल्हा " ).

कालकूट विष व चंद्र हीं दोन रत्नें शंकरांनीं आपल्याकरितां ठेविलीं. त्या शंकराचें स्थान घाटशिरस हें आहे.

देवांचें वैद्यराज अश्विनीकुमार किंवा धन्वंतरी हें रत्न इंद्रांनीं घेतलें. पण तें अश्विनीकुमार ज्या ठिकाणीं राहिले होते तें ठिकाण अश्वी या नांवानें प्रसिद्ध आहे. तसेंच धन्वंतरीचें घराणें कायगांव [illegible] प्रसिद्ध आहे.

चंद्र हें रत्न जरी शंकरांनीं घेतलें, तरी जेव्हां तें सागराच्या उदरांतून बाहेर आलें तेव्हां ज्या स्थानीं पृथ्वीतलावर राहिलें, तें स्थान अद्याप पावेतों चांदगांव या नांवानें प्रसिद्ध आहे व तेथें चंद्रेश्वर महादेवाचें मंदिर आहे.("आमचा नगर जिल्हा" या पुस्तकांत आहे.)

ज्या सूर्यनारायणानें आपल्याकरतां सात तोंडांचा घोडा हें रत्न ठेवलें, त्या सूर्यनारायणाचें यमस्थान किंवा विवस्वान स्थान म्हणजे कोल्हार हें आहे. ( " आमचा नगर जिल्हा " पारखे कृत यांत आहे.

ज्या दैत्यराज जरासंधानें मथुरेवर १८ हल्ले केले, त्या जरासंधाची नगरी जोर्वे येथें होती याबद्दलची दंतकथा मला जोर्वे, ता. संगमनेर येथील रहिवासी श्री. एकनाथ गोपाळशेट सोनार, वय अजमासें [illegible] यांनीं ता. २३-१०-[illegible] रोजीं शिरडी येथें अशी सांगितली कीं त्यांच्या गांवीं [illegible] महार याच्या घरास ११ हात लांबीची व २४ इंच घेराची एक हाडाची तुळई ( [illegible] beam ) होती. [illegible] एकनाथशेटनीं ) त्यांनीं स्वतः ४० वर्षांपूर्वी आपल्या [illegible] पाहिली होती. त्या [illegible] निर्वंश झाला म्हणून ती तुळई गांवकरी लोकांनीं [illegible] गांवीं असलेल्या प्रवरा नदींत टाकून दिली. ही नगरी जरासंधानें पालथी केली, [illegible] तेथें जीं मडकीं-गाडगीं [illegible] सांपडतात [illegible] पालथीं सांपडतात.

शिरडीच्या पश्चिम दिशेनें सुमारें ३५ मैलावर निफाड तालुक्यांत नांदुर मदमेश्व नांवाचें गांव आहे. तेथें सन १९०८--९ सालीं श्रीगोदावरीमाईस जलप्लवन खात्या कडून (Irrigation Department) एक फार मोठा पाट खणण्यांत आला व तेथें फार मोठया उंचीचें एक धरण बांधण्यांत आलें. त्या वेळीं तेथें २०--२५ फू खोलीवर एक ७० फूट लांबीचा सांगाडा आढळून आला. तो १० फूट लांबीच्य सात बैलांच्या गाडयांवर घालून निफाडचे मामलतदारसाहेब यांच्यामार्फत मुंबईस पाठविण्यांत येऊन नंतर तो विलायतेस गेला. तो माणसाचा होता असें शिरडी जवळील निमगांवचे पाटील केशव बाळा व सोनेवाडीचे जलप्लवन खात्यांतील तार मास्तर श्री. गंगाधर विष्णु क्षीरसागर व इतर पुष्कळ मंडळी स्वतः डोळ्यानें पाहिल्याचें सांगतात. मी निफाड मामलतदारसाहेब श्री. कामे (हल्ली नंदुरबार) व श्री. नांदे, बी.ए एलएल्. बी., सरपंच निफाड ग्रामपंचायत यांना श्री. जे. डी. गडकरी, एलएल्. बी वकील निफाड यांच्या सांगण्यावरून या सांगाडयाची माहिती ता. १६-१०-३७ रोजी विचारली होती. पण त्यासंबंधीं माहिती कोणीच मला दिली नाहीं. तथापि तो सांगाड प्रत्यक्ष पाहिल्याबद्दल माहिती सांगणारे इसम या भागांत पुष्कळ आहेत.

राहुरी, रतनगड, नेवासें, बेलापुर, घाटशिरस, अश्वी, चांदगांव, कोल्हार जोर्वे व नांदुर मदमेश्वर हीं सर्व गांवें नगर जिल्ह्यांत आहेत हें दिसून येईल. यावरून पौराणिक दृष्टया समुद्र या भागांत होता. त्याचें मंथनही इकडेच झालें, व त्यांतून निघालेल्या रत्नांची वांटणीही इकडेच झाली, असें स्पष्ट दिसतें.

जोर्वे व नांदुर मदमेश्वराच्या माहितीवरून भूगर्भशास्त्र दृष्टया, गोडया पाण्याचा समुद्र येथें होता (क्षीरसागर) असें दिसतें. हीं गांवें नगरजिल्ह्यांतच आहेत.

वरील अनुमानास श्री. गोदावरीमहात्म्य अ. ३५ याचा आधारअसून आणखी एक संतकविवचनाचा पुरावा मिळतो. तो खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. समुद्रमंथन महाराष्ट्रांत झालें, असें सुमारें १२५ वर्षांपूर्वी श्री. होनाजी बाळ, व सगनभाऊ यांचे समकालीं होऊन गेलेले, शिरडीपासून, ७--८ कोस दूर सिन्नर रस्त्यावर असलेले वाव ग्रामनिवासी, नामदेव शिंपीजातीचें अवतारी व प्रासादिक संतकवि तमासगीर श्री. परशराम (विठ्ठल गुरूचे शिष्य) यांनीं केलेल्या लावण्यांपैकीं नंबर १२७ लावण्यांत खालील मजकूर आहे.

### लावणी १२७

"मोहनी राज। महाराज श्यामसुंदरा सावळी तनू। नैवासें केलें म्हणून नेवासें सकळ लागलें म्हणूं ॥ धृ० ॥ देवदानवें। मिळून केलें समुद्रमंथन जधीं। शेषाचा दोर लावला। मंदाचळाची रवी। हात पायाची करून मालडी। नाटक हरि लाघवी। पृथ्वी लागली। डबू

कच्छ रूप । देवें धरलें तधीं ॥ सुरापान अमृत वाटितां । कळूं लागली दुही । सुर पंक्ती मधें राहु बैसला । चंद्र दावित खुणं । तानवढानें शीर छेदिलें निवडुन जैसे कणू ॥ मोहनीराज ॥१॥

मूळ द्वारांतूनि मुळा निघाली । कंठातुनि प्रवरा । रतन गडापशिं । रत्नें वाटुन । दिधली सुराऽसुरां । राहु मारिला म्हणुन राहुरी । वस्ति मुळेच्या तिरां । टोंक्या पाशीं । संगम झाला । स्थापुनि सिद्धेश्वरा (नेवाशाचे मोहनी राज=हरी वटोक्याचें सिद्धेश्वर=हर) हरी हरांची दोन्हीं स्थानें । जुनाट परंपरा । अमृताची धार बारिक । वाहे प्रवरा निरां । पुण्य प्राणी असेल कोणी । योगी त्या घडेल प्राशन ॥ मोहनी राज ॥२॥

या कवीच्या सर्व लावण्या ४ कडव्याच्या किंवा ४ पेक्षां जास्त कडव्यांच्या आहेत. फक्त हीच लावणी २ कडव्यांची मिळाली. हिचीं आणखी २ कडवीं कोठें तरी असावींत व त्यांत याचसंबंधाची जास्त माहिती असली पाहिजे. पण तीं २ कडवीं उपलब्ध नाहींत असें या लावण्याचें पुस्तक छापणाऱ्या गृहस्थानें पुस्तकाच्या प्रस्तावनेंत लिहिलें आहे. प्रस्तावनेंत या कवींच्या संतत्वाबद्दल व त्यांच्यावर झालेल्या ईशकृपेबद्दल चांगली माहिती दिली आहे.

## पौराणिक कालांतील महाराष्ट्राची मर्यादा

पैठण हें पूर्वी महाराष्ट्राचें केंद्र बनलें, व गोदावरी महाराष्ट्राची मध्यवर्ति रेषा बनली. त्र्यंबकेश्वरापासून मोंगलाईंत असणाऱ्या नांदेड गांवापलीकडे असणाऱ्या बासर गांवापर्यंत गोदावरी महाराष्ट्रांत आहे, व बासरगांवीं जी सरस्वतीदेवी आहे तिच्या पश्चिमेस महाराष्ट्र व पूर्वेस तैलंगण असा पौराणिक उल्लेख आहे. या गोदवरीच्या उत्तर तटास शेषाद्रि पर्वतापर्यंत व दक्षिण तटास भीमानदीपर्यंत महाराष्ट्राची हद्द मानण्यांत येते. पूर्वेला प्रणिता अथवा मेन (वेनगंगा व पश्चिमेस सह्याद्रि अशी मर्यादा पौराणिक ग्रंथावरून दिसते. ( पारखेकृत आमचा नगर जिल्हा पान ১० )

कोकमठाण ( शिरडीपासून ८ मैलांवर गोदावरीच्या कांठीं), नातुळठाण, नागठाण, भामठाण व वादाठाण हीं पांच ठाणीं गोदावरीच्या कांठीं विद्यापीठें बनलीं होतीं. त्या स्थानाला पुराणांत मातृकस्थानें (Alma-mater=an epithet applied by student to the university-where they have been trained ) असें नांव आहे. जसजसा दंडकारण्याचा ( रामक्षेत्राचा ) उत्कर्ष होत चालला, तसतसें त्याचें महाराष्ट्र बनलें, व एक मध्यवर्ति विद्यापीठाची आवश्यकता भासूं लागली, व पैठण ऊर्फ प्रतिष्ठान हें मध्यवर्ति विद्यापीठ निर्माण झालें.

मातुलठाण म्हणजे ( पुणतांबें असावें. नागठाण, भामठाण, व वादाठाण हीं स्थानें मोंगलाईंत आहेत. पारखेकृत "आमचा नगर जिल्हा"

महाराष्ट्रांत गोडया पाण्याचा समुद्र होता म्हणजे श्रीनर्मदामाईपासून श्रीकृष्णा-माईपर्यंतच्या मधील भागांत दर्या होता म्हणजे क्षीरसमुद्र होता असें दिसतें.

वरील माहितीवरून शिरडी हें गांव रामअवतारीं किंवा कृष्णअवतारीं कोणत्या नांवानें प्रसिद्ध होतें याचा पत्ता लागत नाहीं. फक्त समुद्रमंथन शिरडी जवळ झालें. १४ रत्नांची वांटणी ही शिरडीजवळच झाली, विद्यापीठें हीं शिरडीच्या नजीक गांवांत होतीं व नारदांची नारदीही शिरडीजवळच झाली व शिरडी हें गांव दक्षिण द्वारकेचें केंद्र जें पंढरपूर त्याच्या चतुःसीमेंत येतें; म्हणजे शिरडी पंढरपूरचाच भाग होता इतकें सिद्ध होतें नवासें येथील एका बडव्यांच्या घरीं महालयामहात्म्य म्हणून एक संस्कृतांत लिहिलेला फा मोठा ग्रंथ आहे, व महाल्या हें नेवाशाचें प्रसिद्ध दैवत जें मोहिनीराज त्याचें नांव आहे या ग्रंथांत समुद्रमंथनाचें व त्या भागांतील पुष्कळ गोष्टींचें वर्णन आहे असें समजतें. परंतु तो ग्रंथ बराच प्रयत्न केला. पण उपलब्ध झाला नाहीं. उपलब्ध झाल्यास शिरडी ग्रामा-संबंधीं बराच प्रकाश पडेल असें वाटतें. प्रयत्न सुरू आहे. बाबांची इच्छा!

येथपर्यंतच्या संतवचन, पुराण, आख्यायिका व निसर्ग यांच्या पुराव्यावरून बाबा हल्लींच्या शिरडींतील मशिदीस द्वारका, द्वारकाबाई, द्वारावती या नांवानें का संबोधीत व तिच्या प्रभावाची महती कां गात, या भागांत पूर्वी गोडया पाण्याचा समुद्र होता, या भागांत फार फार प्राचीन काळापासून यादवांचें राज्य होतें, दिंडिरवनाची व्याप्ति पंढरपूर केंद्र धरून, परळी ( सज्जनगड ), आळंदी, शिरडी, नेवासें, पैठण व विजयानगर या वर्तुळभागांत होती. रुष्ट झालेल्या श्रीरुक्मिणीमातुःश्रींना भेट देऊन त्यांची समजूत करण्याकरतां व भक्तसिंह श्रीपुंडलीक यांना दर्शन देऊन त्यांना वर देण्याकरितां कृष्ण परमात्मा फार फार वर्षांपूर्वी एका काळीं दिंडिरवनांत आले; द्वारकेची सर्व संपत्ति, सर्व वैभव, सर्व ऐश्वर्य इकडे आणून भक्तचूडामणि पुंडलीक यांचे नरमागणीस मान देऊन दक्षिणेस दक्षिण द्वारकेची स्थापना दिंडिरवनांत करून, श्री. पुंडलीक यांनीं बसण्याकरतां दिलेल्या विटेवर आज अठ्ठावीस युगें विठ्ठल या नांवानें पंढरपूर येथें श्रीरुक्मिणी मातुःश्रीच्या सान्निध्यांत उभे आहेत असें सिद्ध होतें.

येथें " उभे " व " विटेवर " या शब्दांचे अर्थ संकुचित न घेतां विस्तृत घेतले पाहिजेत. तशीच हल्लींची विठ्ठलमूर्ति दगडाची आहे व वीटही दगडाचीच आहे. मूर्ति दगडाची असल्यामुळें तिला वीट सोडून कोठेंही हालचाल करतां येत नाहीं. किंवा खाली बसतांही येत नाहीं. पण श्रीकृष्णपरमात्मा ह्यांना वाटेल तिकडे हालचाल करतां येत होती, व बसतां-उठतांही येत होतें. दगडाची मूर्ति व दगडाचीच वीट असल्यामुळे विठ्ठलमूर्ति त्या विटेवर अठ्ठावीस युगें उभी आहे हें ठीक आहे. पण निरनिराळे अवतार किंवा भिन्न भिन्न रूपें घेणारी कृष्णमूर्ति एके जागीं अशी कशी व किती काल उभी राहील

पण तशी जरी उभी राहिली नाहीं, तरी भक्तानें भक्तीनें व प्रेमानें दिलेल्या वस्तूचा उपयोग, तिला यत्किंचित केव्हां व कोठेंही न विसंबतां, आपल्या मोईप्रमाणें कोणत्याही अवतारांत व स्वरूपांत भक्तखूण म्हणून निरंतर करीत राहिलें म्हणजे झालें; तशीच बाबा उशाशीं घेऊन निजत असलेल्या विटेची हकीकत आहे. असो. या विटेची हकीकत पुढें विस्तृतपणें येणार आहे, म्हणून येथें देत नाहीं.

कृष्ण परमात्मा मानव स्वरूपांत असल्यामुळें ते पंढरपूर केंद्र स्थानांतून वर्तुळांतील इतर सहा पाकळ्यांपैकीं कोठेंही राहूं शकत होते. द्वारकेचा परीघ जर ८०० मैलांचा होता, तर तिचा व्यास २००-२५० मैलांचा असलाच पाहिजे. पंढरपुराहून वरील साही स्थानें निःसंशय दोन-अर्डीचशें मैलांच्या आंतच आहेत. करितां शिरडी हें ठिकाण परमात्म्याचें एवढया मोठ्या घेराच्या या दक्षिण द्वारकेंतील अत्यंत शांततेचें एकांताचें व फार आवडतें स्थल असूं शकेल, व श्रीकृष्णही पुंडलिकानें दिलेली वीट नेहमी अत्यंत काळजीपूर्वक आपल्याजवळ, श्रीलक्ष्मीमातुःश्रीप्रमाणें किंवा कौस्तुभ मण्याप्रमाणें ठेवीत असतील.

आतां कृष्ण परमात्म्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळीं रूपें धारण केलीं आहेत हें सुविख्यातच आहे. गोकुळांत असतांना हे एका काळीं ब्रह्मदेव झाले होते. पंढरपुरास विष्णुरूपानें विठ्ठलरूप बनून मस्तकावर शंकर धारण केलें व विष्णु स्वतः आहेतच. विष्णु नारायणः कृष्णो वैकुंठो विष्टरश्रवः ( अमरकोश ) म्हणजे हे दत्ताचा पूर्ण अवतार आहेत असें निःशंक सिद्ध होतें.

आतां आपण शिरडींतील बाबांच्या चरित्राकडे व लीलांकडे वळूं, व द्वारकेंतील कृष्ण परमात्मांच्या चरित्रांत व लीलेंत व बाबांच्या शिरडींतील चरित्रांत व लीलेंत सूक्ष्म दृष्ट्या किती तरी विलक्षण साम्य आहे तें पाहूं.

ता. २१ एप्रिल १९३६ रोजीं शिरडीचे रामगीर गोसावी ( ज्यांना बाबा बापुगीर म्हणत ) त्यांनीं मला श्रीद्वारकामाईंत ( शिरडींतील मशिदींत ) बाबांच्या अनेक लीला सांगतांना प्रस्तुत संशोधनाला लागू पडणारी अशी एक कथा सांगितली; ती अशी कीं,, एका पौष वद्य आमावास्येला आलेल्या सूर्यग्रहणाच्या दिवशीं बडे बाबा मालेगांवचे एक फकीर मशिदींत कांहीं धान्य वांटीत होते. त्यांनीं मला दीड रुपया दिला. बाबांनीं मला विचारलें, " काय दिलें रे तुला बडे बाबांनीं ? दाखव मला." मीं दाखविलें. बाबांनीं तो दीड रुपया मजकडून घेतला. पाहिला, व मला परत दिला, व मला म्हणाले कीं, आपण कीं नहीं **माहुरला** लहानाचे मोठे झालों. लोक लइ त्रास देऊं लागले. आपण कटाळलों. मग मी गेलों **गिरनारला.** तिथं बि लोक लइ त्रास देऊं लागले. मग मी गेलों **अबूच्या पहाडावर.** तिथं बी लोक लइ सताऊं लागले. मग मी गेलों **श्रीगापुरला.** तिथं बि लोकांनीं लइ सतावले; मग तिथून मी गेलों **अकलकोटला.**

तिथं वि लोकांनीं आपल्याला लइ तरास दिला. मग तिथून मी गेलों **दौलताबादला.** तिथं एक आपल्याला जन्या ( श्रीसमर्थ जनार्दन स्वामी ) भेटला, त्यानं माझी लइ सेवा केली. मग मीं गेलों **पंढरपुरला** तिथं वि कंटाळा आला. मग मी आलों **शिरडीस.** आन् इथंच राहिलों.

वरील कथेवरून बाबांनीं पहिल्या सहा स्थानीं दत्तस्वरूपांत वास्तव्य करून शेवटच्या दोन ठिकाणीं कृष्ण स्वरूपांत राहून व श्रीमद्भगवद्गीतेंत व पुराणांतरीं लिहिल्याप्रमाणें शिरडींत अनेक कृष्णलीला प्रगट केल्या, व अगणित कृष्णलीला ध्वन्यर्थानें करून दाखविल्या, हें त्यांच्या पुढील उद्गारावरून व चरित्रावरून दिसून येईल.

पुढील पानावर वरील आठ पुण्यक्षेत्रांचा संक्षिप्त नकाशा दिला आहे; त्यांतील स्थलांचा अनुक्रम प्रथम गिरनार, नंतर अबू व नंतर माहुर असा घेतला म्हणजे कृष्णप्रभु पूर्वीं श्रीरुक्मिणीमाईची समजूत करण्याकरितां, भक्तश्रेष्ठ पुंडलिक यांना दर्शन देण्याकरितां व दिंडिरवनांत दक्षिण द्वारकेची स्थापना करण्याकरतां पश्चिम द्वारकेंतून ज्या मार्गानें दक्षिणेंत आले, त्या मार्गाचें ध्वन्यर्थाचें बाबांनीं दिग्दर्शन केलें आहे असें दिसतें. बापुगीर ८० वर्षांवर वयाचे आहेत. त्यामुळें त्यांचे सांगण्यांत स्थलें मागें-पुढें होण्याचा संभव आहे.

## बाबांचे उद्गार

१ बाबा प्रथम एकदा माधवराव देशपांडयांना म्हणाले कीं, शाम्या, तुझा व माझा बहात्तर पिढयांचा सहवास आहे. तुला त्याची आठवण नाहीं व मला त्याची आठवण आहे.

तसेंच अगदीं पहिल्याच भेटींत बाबा नानासाहेब चांदोरकरांना म्हणाले कीं, नाना, तुझा-माझा चार जन्मांचा सहवासआहे. मला तो माहित आहे, व तुला तो माहित नाहीं म्हणून मी तुला नेहमीं नेहमीं बोलावतों, नाहीं तर जगांत काय नाना थोडे आहेत ?

## गीतेवरून श्रीकृष्ण व बाबा यांचेमधील साम्य

" बहूनि मेव्यतीतांति जन्मानि तव चार्जुन ॥
तान्यहं वेद सर्वाणि, नत्वं वेत्थ परंतप "॥

श्री. भ. गी अ. ४, श्लोक ५.

अर्थ—माझे पुष्कळ जन्म झाले व तुझेही पुष्कळ झाले. फरक इतकाच कीं ते मला सर्व माहित आहेत, तुला माहित नाहींत.

## माधवराव देशपांडे यांची सख्य भक्ति

२ माधवराव देशपांडे पहिल्यापासून बाबांना 'देवा' म्हणून संबोधित व अखेरपर्यंत त्यांना 'अरेतुरेच' म्हणत. त्यांना वाटेल ते प्रश्न करीत. त्यांना अद्वातद्वा बोलत, त्यांना शपथा घालीत, त्यांना दरडाऊन सांगत, त्यांच्याशीं गप्पा गोष्टी करीत, त्यांना चिलीम भरून देत व आपणही पीत. त्यांच्याशीं भांडत, त्यांच्यावर रुसत व रागवत व कधीं कधीं त्यांना उपदेशाच्या गोष्टीही सांगत. पहिलीं कांहीं वर्षे माधवराव

त्यांच्याकडे देव किंवा संत म्हणून जात नसत. फक्त चिलीम पिण्याकरतांच जात असत. बाबा वेडथर आहेत असें ही त्यांना प्रथम कित्येक दिवस वाटे. बोलण्यांत माधवराव शेवटपर्यंत पुष्कळ वेळा अतिप्रसंगही करीत. पण बाबा केव्हांही न रागावतां त्यांची समजूत करीत व त्यांची आणही वाहत. पुढेंपुढें माधवरावांना अनंत अनुभवानें बाबांची खरी योग्यता कळूं लागली, बाबांवर त्यांचा पूर्ण विश्वास बसला, बाबांची वाचा सत्य आहे असें त्यांच्या अनुभवास येऊन बाबांचें सामर्थ्य कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुम् अशा प्रकारचें असून बाबा अतिमानुष अति मर्त्य आहेत असें समजून ते त्यांना परमात्मा मानूं लागले, व आपण देवाशीं (बाबांशीं) अतिप्रसंग करतां याबद्दल पुष्कळ वेळां त्यांना पश्चात्ताप होऊन वाईटही वाटे. माधवरावांची त्यांच्यावर एकनिष्ठ भक्ति होती व अद्या-पही आहे. नारदीय नवविधा भक्तीपैकीं माधवरावांची बाबांवर असलेली भक्ति, आठवी सख्यभक्ति ( अर्जुनाप्रमाणें ) होती असें मला वाटतें.

" सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण, हे यादव हे सखेति ॥
अजानता महिमानं तवेदम् । मया प्रमादात्प्रणयेन वाऽपि ॥४१ ॥
यच्चाऽवहासार्थमसत्कृतोऽसि । विहारशय्यासनभोजनेषु ॥
एकोऽथवाऽप्यच्युत तत्समक्षम् । तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ॥ ४२ ॥
श्री. भ. गी. अ. ११

अर्थ—तुमचा हा महिमा न ओळखितां मित्र समजून 'अरे कृष्णा, अरे यादवा अरे सख्या' असें चुकीनें किंवा सलगीनें जें कांहीं मी अमर्याद बोललों असेन, आणि आहार-विहारांत किंवा निजण्या-बसण्यांत, हे अच्युता ! एकटयाला किंवा चारचौघांत मी जो कांहीं थट्टेनें तुमचा अपमान केला असेल, त्याची आपण मला क्षमा करावी असें तुम्हा ( ज्यांच्या शक्तीचें किंवा गुणांचें मोजमाप करतां येण्यासारखें नाहीं ) अप्रमेयां-जवळ माझें मागणें आहे.

वरील श्लोकद्वयांतील अर्थोद्धार व त्यावर असलेलें श्रीज्ञानेश्वर भाष्य यांत व वरील विवेचनांत पुष्कळ साम्य आहे असें दिसून येईल.

## नानासाहेब चांदोरकरांची संस्कृताहंतेची नष्टता

३. भारतीय युद्धाच्या वेळीं समरंगणावर भक्तराज अर्जुन मोहपीडित झाला असतां जशी त्याला श्रीकृष्णांनीं भगवद्गीता सांगून त्याचा मोह नाहींसा केला, तसाच भक्तवर्य कै. नानासाहेब चांदोरकरांचा संस्कृताचा अभिमान घालविण्याकरतां शिरडी येथील द्वारकामाईंत ( मशीदींत )

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे । समवेता युयुत्सवः ॥
मामकः पांडवाश्चैव । किमकुर्वत संजय ॥१॥

## गीतेवरून श्रीकृष्ण व बाबा यांचेमधील साम्य

या श्रीमद्भगवद्गीतेंतील पहिल्या अध्यायांतील पहिल्याच श्लोकांतील पहिल्या ओ ळींतील दोन शब्द " धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे " यांचा व तिसऱ्या ओळींतील " मामकाः पांडवाश्चैव" यांचा अर्थ विचारून, तसेंच त्याच श्रीमद्भगवद्गीतेंतील

तद्विद्धि प्रणिपातेन । परिप्रश्नेन सेवया ॥
उपदेक्ष्यंति तेज्ञानं । ज्ञानिनस्तत्व दर्शिनः ॥

चवथ्या अध्यायांतील वरील ३४ व्या श्लोकाचा अर्थ विचारून त्याना कुंटीत करून नाना-साहेबांना बाबांनीं सर्व गीतेचा व्याकरणसह बरेच दिवस रोज तास-दीड-तास याप्रमाणें अर्थ सांगून त्यांचाही अभिमान नष्ट करून गीतेचें खरें रहस्य किंवा हृद्गत त्यांच्या अंतः-करणावर बिंबविलें. यावरून मशीद ही द्वारका ( किंवा कुरुक्षेत्र) आहे व बाबा हे कृष्ण-परमात्मावतार होते असें ध्वनित होत नाहीं का ?

## बाबांच्या मुखोद्गारांवरून श्रीकृष्ण व बाबांचें साम्य

४. कै. काकासाहेब (हरि सीताराम, बी. ए., एलएल्. बी., सॉलिसिटर, विलें-पारले) दीक्षितांना व कै. नानासाहेब ( नारायण गोविंद, चांदोरकर बी. ए., डे. कलेक्टर कल्याण ) चांदोरकरांना बाबा एकदां म्हणाले कीं "आतां आपण जाऊं ते आठ वर्षांचे होऊन येऊं " श्रीकृष्णमूर्ति देवकीमातेजवळ प्रथम प्रकटली, ती आठव वर्षांची होती. असें पुराणांतरीं व इतर ग्रंथांतही वर्णन आहे.

"आठ वर्षांची मूर्ती । असंभाव्य पडिली दीष्टी ॥
तेजें दशदिशा उजळती । तेथें लपती शशि सूर्य ॥ ११६ ॥
श्रीहरिविजय अ. ३

श्रीसाईलीला उपोद्घात वर्ष १ लें अंक १ ला पान २ यावरूनही बाबा कृष्णावतार होते असें ध्वनित होत नाहीं का ?

५. एकदा बाबा कै. काकासाहेब दीक्षितांना म्हणाले, " काका मी पूर्वी लोकांना औषध देत असें. पुढें औषध देणें सोडलें आणि हरि हरि करूं लागलों. आणि हरि हरि करतां करतां हरि भेटला. " या उद्गारावरून बाबा कृष्णरूप होते असेंच सिद्ध होतें

## व्यासपूजेवरून श्रीकृष्ण व बाबांचें साम्य

६. बाबांनीं आपली स्वतःची पूजा शके १८३१ ( सन १९०९-१० ) आषाढ शु. १५ च्या दिवशीं आपल्या भक्तजनांकडून शिरडींतील द्वारकामाईंत करून घेतली ( याबद्दल सविस्तर वृत्तांत श्रीसाईलीला वर्ष १० अंक ६ पान १३ ते २१ यांवर पहावा. ) ही पूजा म्हणजे व्यासपूजा, व ही पौर्णिमा म्हणजे गुरुपौर्णिमा. कृष्ण-प्रभूंना जगद्गुरु ही संज्ञा आहे, व व्यासांनाही जगद्गुरु ही संज्ञा आहे. व्यास व कृष्ण

हे एकरूपच होते. " व्यासो नारायण : साक्षात् " विष्णु नारायणः कृष्णः (अमरकोश) " मुनोना मप्यहं व्यास. " ( श्री. भ. गी. अ. १०, श्लो. ३७ ) व्यासांना कृष्ण ही संज्ञा आहे. तसेंच त्यांचें नांव कृष्ण द्वैपायन आहे. " नमहमरागमकृष्णं कृष्णद्वैपायनं वंदे " ( वेणीसंहार नाटक ) (एल. आर. वैद्य यांचा संस्कृत इंग्लिश कोश पान २०६ व ८८१ ) कृष्णद्वीपांत जन्म झाला म्हणून कृष्ण द्वैपायन असें व्यासांना म्हणतात असें महाराष्ट्रीय कोशाचें पान "ध" यावर कोशकर्ते डाक्टर केतकर यांनीं लिहिलें आहे. तथापि वरील चारी उताऱ्यांत व्यासांना जो कृष्ण शब्द लावला आहे तो कृष्ण-परमात्मा या अर्थानेंच लावलेला दिसतो. अर्थात बाबांची त्या दिवसाची पूजा म्हणजे कृष्णदर्शक असून द्वारकामाईतील पूजा दक्षिण द्वारका दर्शक आहे असें स्पष्ट दिसतें.

## मंदिरावरून प्रभु मुरलीधर व बाबांचें साम्य

७. नागपूरच्या श्रीमंत बुटीसाहेबांनीं बांधिलेल्या शिरडी येथील दगडी वाड्यांत ज्या जागेवर गोपालकृष्णाचें किंवा मुरलीधराचें मंदीर होणार होतें, त्याच जागेवर बाबां-च्याच आज्ञेनें त्यांची पुण्य समाधि बांधण्यांत आली.

निर्याणापूर्वी ४-५ दिवस सोनीचे आईस ( अंधू मारवाड्याच्या बायकोस ) बोलावून श्रींनीं सांगितलें कीं, आतां मला मशिदीचा कंटाळा आला, चावडीचा कंटाळा आला. आतां मी वाड्यांत जाऊन बसेन. तेथें भटे लोक माझा संभाळ करतील.

तसेंच कै. बापूसाहेब जोगांच्या कुटुंबाना समाधिस्थ होण्यापूर्वी ४-५ वर्षीपूर्वीच बाबांनीं त्यांचा-हात धरून आणून सांगितलें कीं, ही हगदोंडीची जागा माझी आहे. इथें दगडी इमारत होईल. तेथें मी बसेन वगैरे वगैरे. यावरुन बाबा गोपाळकृष्ण किंवा मुरलीधर होते व मशीद ही द्वारका होती हें निर्विवाद ठरतें.

श्रीसाईलीला वर्ष १ लें, अंक ११, पान ७९-८०

## विटेवरून कृष्ण व बाबा यांच्यामधील साम्य

८ बाबा शिरडींत आल्यापासून त्यांच्याजवळ एक मातीची पक्की भाजलेली वीट होती. तिची ते अत्यंत काळजी घेत व रोज उशाकडे घेऊन निजत. ते मशीदींत आले तेव्हां कै. म्हाळसापती व काशीराम शिंपी तिला स्नान घालीत, तिची पूजा करीत व नीट जपून धुनीच्या खांबाजवळ ठेवीत. रात्रीं तिला कपड्यांत गुंडाळून बाबा उशास घेत. पुढें महादु फणसे मशिदीचें काम करूं लागला तोही ती वीट अत्यंत काळजीपूर्वक धुवून श्री-धुनीमाईचा खांब व हल्लीं बाबांच्य कपड्याच्या पेटीच्या खालीं असलेली सीमेंटची बैठक यांमधील लहानशा फटींत ठेवी, व रात्रीं कपड्यांत गुंडाळून बाबांच्या उशाकडे ठेवी. बाबांचें त्या विटेवर फार प्रेम असे.तें तिला कधींही विसंबत नसत. ती वीट त्यांची जीव कीं प्राण असे.एक दिवस ती कोणाच्या हातून फुटली व तिचे दोन तुकडे झाले; हें बाबांना

कळल्यावर त्यांना अत्यंत वाईट वाटलें.ते कळवळले,त्यांनीं आपलें स्वतःच थोबाड झोडून घेतलें, रडूं लागले व म्हणाले कीं माझी संगतीण गेली. मी आतां राहणार नाहीं. वीट फुटल्या दिवसापासून बाबांना बरें वाटेनासें झालें व ते पांचव्या किंवा सहाव्या दिवशींच समाधिस्त झाले.ती फुटकी वीट महादूनें तशीच त्यांच्या समाधींत त्यांचे उशाकडे ठेविली आहे असें महादू फसले व माधवराव देशपांडे व तात्या पाटील कोते सांगतात.

यावरून ही वीट भक्तशिरोमणि पुंडलीक यांनीं कृष्णपरमात्मास पंढरी क्षेत्रांत बसावयास दिलेल्या विटेचे व श्रीपांडुरंग ज्या विटेवर उभे आहेत तिचें दर्शक असून बाबा हे विठ्ठल–कृष्ण स्वरूप होते याचें दर्शक आहे असेंच सिद्ध होतें. पांडुरंगांनीं वीट पायाखालीं घेतली व बाबा ती उशाकडे घेत इतकाच फरक, व वस्तुतः तोही फरक नाहीं. कारण कृष्ण परमात्मा मानव स्वरूपांत–देहांत असतां ते पुंडलिकांनीं दिलेली वीट प्रेमवस्तु म्हणून अशीच अत्यंत काळजीपूर्वक कोठें तरी स्वतःजवळ जतन करून ठेवीत असले पाहिजेत. विठ्ठलरूपी दगडाच्या मूर्तीनें चिरस्थाई स्थिर स्वरूप घेतल्यानुळें तिच्या विटेलाही तिच्याचप्रमाणें तिच्या पायाखालीं २८ युगें चिरस्थाइत्व प्राप्त झालें. बाबांचाही पुढें केव्हांतरी संगमरवरी दगडाचा शेषशायी स्वरूपांत चिरस्थाई पुतळा तयार झाल्यास त्यांच्या उशाकडील संगमरवरी विटेलाही चिरस्थायित्व येईल. ही फुटकी वीट ही हल्लीं समाधींत बाबांच्या उशाकडे महादु फसल्याच्या हट्टानें व आग्रहानें ठेविली असल्यामुळें बाबांच्या बरोबर तिलाही चिरस्थायित्व आलें आहे.

**पाद घर्षणाची वीट वरी । ते न वेंची निर्धारीं । ती पडली होती भूमीदरी ।**
**बैसावयासी चिरकाळ ॥ १० ॥ ते वीट पुंडलिकें । बैसावया लाविली कौतुकें ॥**
**ती पायाखालीं लक्ष्मीनायकें । घालोनि इंद्र उद्धरिला ॥ ११ ॥**

पां. स. अ. २

ह्या विटेच्या योगानें बाबा महादु फसल्याचा उद्धार करतील. नाहीं म्हणून कोणीं सांगावें ?

## बाबा व पांडुरंग यांतील साम्य

९. पंढरीस कशास जातां ? पंढरी येथेंच आहे, व ही मशीदही द्वारकामाई आहे, असें बाबा नेहमी पंढरीस जाऊं इच्छिणाऱ्या लोकांना सांगत, त्यांना बसल्या ठिकाणींच विठ्ठलस्वरूपांत दर्शन देत, हें सर्वश्रुत आहे. (श्री. रघुवीर भास्कर पुरंदरे वगैरे वगैरे) या बाबांच्या उद्गारांवरून व प्रत्यक्ष कृतीवरून बाबा हे कृष्ण व मशीद ही द्वारका असेंच सिद्ध होतें.

## छत्रचामरें, अबदागीर, पालखी वगैरे वगैरे राजैश्वर्य साम्य

१०. कै. श्री. राधाकृष्ण आई ह्या कै. नानासाहेब चांदोरकर ह्यांच्याबरोबर

पंढरपुराहून शिरडीस सन १९०५–६ च्या सुमारास आल्या. त्यांचें नांव सुंदराबाई क्षीरसागर. ह्यांची बाबांवर अत्यंत प्रेमळ भक्ति असून त्यांनीं आपलें तन व मन बाबांना सर्वस्वी अर्पण केलें होतें. ह्यांचे वेळेपासूनच बाबांची आरति होऊं लागली, व आरतीच्या वेळेस अबदागीर, चवऱ्या, छत्रचामरें बाबांवर ढाळूं लागलीं. बाबा चावडींत जातांना वाजत-गाजत घोडा, पालखी, चोपदार, भजनकरी मंडळी, गरुड टके, पताका या इतमामानिशीं जाऊं लागले. चावडी, आरसे, हंडया, झुंबरें, तसबिरी यांनीं सुशोभित झाली. यांच्याचमुळें रात्रीं बाबांची शेजारति व पहाटे काकडआरति सुरू झाली. ह्या स्वतः बाबांची सेवा करीत व दुसऱ्याकडूनही करवून घेत. यांनीं शिरडीला संस्थानचें स्वरूप आणिलें. ह्या शिरडीस फक्त ८–९ वर्षेंच होत्या; व वयाच्या ३५ व्या वर्षीं ह्यांनीं आपला अवतार शिरडीलाच संपविला. पण ह्यांनी आपल्या आठ वर्षांच्या कारकीर्दींत जें काम केलें; तें एखाद्या साधारण भक्ताला पंचवीस वर्षांत सुद्धा करतां आलें नसतें. या बालविधवा होत्या. बाबा आपले पूर्वजन्मींचे पति असें समजून त्या बाबांची सेवा करीत असत. त्या आपला चेहरा बाबांना कधीं दाखवीत नसत व मशीदीच्या ओटयावरही कधीं चढत नसत. "बाबा ही त्यांना ही पूर्वी ( पूर्वजन्मीं ) आपल्या-जवळ होती. पण आपण तिला कधीं शिवलों नाहीं असें म्हणत" असें शिरडीचे माधवराव देशपांडे सांगतात. राधाकृष्ण आईजवळ एक लहानशी धातूची गोपाल-कृष्णमूर्ति असे. त्या मूर्तीस त्या २४ तास जवळ बाळगीत. शौचास जातेवेळीं सुद्धा ती मूर्ति त्यांचेजवळ असे. बाबांचा सर्व राजविलासी थाट यांनीं बनविला. या शिरडीस आल्यापासूनच बाबांच्या फकिरी बाण्याचा देखावा जाऊन त्यास राजयोग्याचें स्वरूप प्राप्त झालें. त्या जरी वयानें लहान होत्या, तरी जबरदस्त कर्तृत्ववान होत्या. त्यांची सर्व भक्तजनावर इतकी छाप होती कीं, त्यांचा शब्द मोडण्यास कोणाची छाती होत नसे. त्यांचा सर्व काळ बाबांच्या सेवेंत व बाबांच्या शिवाऊ राज-वैभवांत भर घालण्यांत जाई, यांच्या मुखांत निरंतर राधाकृष्ण हें नांव असे, व त्या-वरूनच त्यांना राधाकृष्ण हें नांव पडलें असावें. ह्या शिरडीस आल्यापासून बाबांना नित्य नेमानें दररोज पांच पानांचे गोविंद विडे व कुटलेले विडे पाठवीत, व त्यापैकीं कुटलेला विडा बाबा रोज दुपारच्या जेवणानंतर खात व वर पाणी पीत. तसेंच बाबा एका दिवसाआड जेव्हां रात्रीं चावडींत निजावयास जात, त्या वेळीं मायंकाळीं त्या न्हाऊन फक्त पांच दिवे कंदीलांत ठेवून स्वतः पांढरे पातळ नेसून तोंडावर पदरा घेऊन तो कंदील मशिदीचे पायरीवर ठेवीत व परत जात. हीं पांढरीं पातळें बाबाच त्यांना घेऊन देत. बाबा त्यांना दररोज एक वेळां दुपारीं आलेल्या भिक्षा व नैवेद्यांपैकीं एक भाकरी व थोडीशी भाजी माधवराव देशपांडे यांचे हस्तें पोंचवीत.

## राधाकृष्ण यांच्या शिरडींतील चरित्रावरून कृष्ण व बाबा यांच्यामधील साम्य

श्री गोकुळ अष्टमीचा उत्सव, बाबा कृष्ण आहेत अशा भावनेनें शिरडींत बाबांचे मंदिरांत ( श्रीद्वारकामाईत ) श्रीराधाकृष्णआईनींच प्रथम सुरू केला.
व त्यांत त्यांनीं पंढरपुरच्या काल्याची प्रथा शिरडींत आणिली. राधाकृष्ण आई पंढरपुराहून शिरडीस आल्या. त्यांचे पूर्वी शिरडींत काला करण्याची चाल नव्हती.

वरील दृश्य, बाबा कृष्ण होते, मशीद द्वारकामाई होती व राधाकृष्णआई या पूर्वी केव्हां तरी व कोणत्या तरी जन्मांत राधा होत्या, याचीच साक्ष पटवितें. हल्लीं द्वारकेंत जशी राधाकृष्णाची ( रुक्मिणी कृष्णाची किंवा रुक्मिणी पांडुरंगाची नव्हे ) पूजा होते तशीच शिरडींतहि राधाकृष्णआई हयात असेपर्यंत बहुतेक सर्व भक्त संघात बाबा प्रमाणेंच त्यांचीही सेवा करीत असे. राधाकृष्ण आई राधेप्रमाणेंच मोठया मानी असत. या कोणीतरी पूर्वजन्मींच्या योगभ्रष्ट योगिनी असाव्या असें दिसतें. ( श्रीसाईलीला वर्ष १ लें अंक १ ला पान १७१ )

श्रीहरिविजयांत ८ व्या अध्यायांत जें राधेचें नाटक कथानक दिलें आहे, त्यांत व वरील राधाकृष्ण आईचें वर्तनांत बरेंचसें साम्य दिसतें.

### गायी पाळण्यावरून कृष्ण व बाबा यांचेमधील साम्य.

११. बाबांच्या जवळ गाई, शेळ्या, मोर व बकऱ्या असत. त्या तात्याबा कोते पाटील यांचेकडे असत. तेच त्यांची सर्व व्यवस्था ठेवीत असत. व त्याच गाईचे व शेळ्यांचे दीह, दूध, लोणी, ताक बाबा खात.

१२. शिरडीच्या आजूबाजूस फार पूर्वी पुष्कळ गोंळवाडे होते असें तेथील व इतर ठिकाणचे लोक सांगतात. यावरुन ही बाबांची भूमिका श्रीकृष्णाचीच होती व मशीद ही द्वारावती होती असें दिसतें.

### वनमाला दोघेंही अंगावर घालीत म्हणून बाबा व कृष्ण यांत साम्य

१३. बाबांचा बाग ऊर्फ तपोवन शिरडींत तयार होण्यापूर्वी कित्येक भक्त ( म्हाळी मर्द नामदेव, सावत राहणार कसरवाडी ता. संगमनेर ) बाबांना नेहमीं तरवडाची रानटी फुलें आणून देई व वाही. तसेंच निमगांवचे कै. श्री. सीताराम जयराम डेंगळे हे रोज जंगली फुलांची माळ स्वतः करुन मुद्दाम दुपारचें वेळीं घेऊन येत व बाबांना घालीत, व बाबा त्या तरवडाच्या फुलांचा व त्या माळेचा आनंदानें स्वीकार करीत. कृष्ण परमात्माचे मूर्तिगटीही कृष्ण परमात्मास जंगली फुलांच्याच माळा घालीत.

### दोघेही हातांत काठी घेत म्हणून श्रीकृष्ण व बाबा यांत साम्य

१४. कृष्ण परमात्माचे हातांत एक काठी असे. बाबाही हातांत सटके ( दांडकी, काठया ) ठेवीत.

" जानूमध्यें धरिली काठी । सुहास्य वदन जगजेठी । वनमाळा रुळती कंठी । चरणांगुष्ठपर्यंत ॥ ८१ ॥ पां. म. अ. २

या वरील वर्णन सादृश्यावरून बाबा हे कृष्ण परमात्मा होते असेंच सिद्ध होतें.

१ काला

बाबा शिरडींत आल्यावर प्रथम कधीं कधीं नाना प्रकारचे निरनिराळे पदार्थ आणून स्वतः हंडी तयार करीत. कधीं लहान व कधीं मोठी हंडी तयार करीत. द्वारकामाईचे अंगणांत चूल घालून मसाला स्वतः वांटून तो हंडींत इतर पदार्थांबरोबर घालून शिजवून सर्वांस ( ज्यांची इच्छा असेल त्यांस देत ) देत. हीच काल्याची प्रथा. ( श्रीसाईसच्चरित्र अ. ३४ सविस्तर वर्णन पाहावें. )

दोघेही काला करीत म्हणून कृष्ण व बाबा यांच्यांत साम्य

नंतर श्री राधाकृष्ण आई शिरडींत आल्यापासून भक्तजनांकडून पुष्कळ नैवेद्य बाबांकडे येऊं लागले. दुपारची आरति झाल्यावर माधवराव देशपांडे यांच्या विनंतीवरून बाबा आपल्या नेहमींच्या आसनावरून उठून फुलांचे शेरे व माळा घातलेल्या बाळामियाच्या कमानीजवळ असलेल्या निंबगरास पाठ लावून येऊन बसत, व आलेल्या नैवेद्यांतील भातांत भात, भाजींत भाजी, कढींत कढी, ताकांत ताक, दुधांत दूध, दह्यांत दहिं, शिऱ्यांत शिरा, याप्रमाणें पदार्थ एकांत एक मिसळून, त्या सर्वांचा काला करून त्यांतच आपण मागून आणिलेले भिक्षेचे पदार्थ घालून आपल्याभोंवती वर्तुळाकार बसलेल्या सर्व गोपगणास वांटून देत.

हें दृश्य खालीं वर्णिलेल्या दृश्यासारखेंच आहे.

यमुनें पावळीं । गडियां बोले वनमाळी । आणा शिदोऱ्या सकळीं । काला करूं आजी । अवघे एक ठायीं । करूनि स्वाद त्याचा पाहीं । मजपाशीं आहे तेही । तुम्हां माजी देतों ॥ १ ॥ म्हणती बरवे गोपाळ । म्हणती बरवे गोपाळ । वाहती सकळ । मोहरी पांवे आनंदें । खडकीं सोडियेल्या मोटा । अवघा केला एकवटा । काला करूनियां वांटा । गडियां देतो हरी ॥ २ ॥ प्यारे भोंकरें भाकरी । दहिं भाताची शिदोरी ॥

श्रीतुकाराम गाथा अभंग १७२ व १७७

काला

वेणु नादीं श्रीधरें । काला वाटिला स्वकरें
विमानि वैकुंठी एकसरें । देव तेथें पाहती ॥ २४
कमलाकार गोपाळ । मध्यें भ्रमर तमालनील ।

निधाना भोंवते साधक सकळ । साधाया जेविं बैसले
॥ २५ ॥ आपुल्या शिदोऱ्या संपूर्ण । हरीपुढें ठेवी
ती आणून ) २९ ॥

पांडुरंग महात्म्य अ. १०

यावरूनही बाबा कृष्णावतार होते हेंच सिद्ध होतें.

वेणुनाद—भीमरथीचे वाळवंटांत असलेल्या विष्णुपद तीर्थास वेणुनाद म्हणतात.

**२. रागावणें, रुसणें व हट्ट करणें**

एकनाथ षष्ठीचे दिवशीं सायंकाळीं रथाचे मिरवणुकीच्या वेळीं बाबा तात्याबा कोते यांच्यावर रागावले. तात्याबाही बाबांवर खूप संतापले. दोघेही हट्टाला पेटले. रात्रीं १२ वाजेपर्यंत मिरवणूक थांबून राहिली. नंतर बाबा शांत झाले. तात्याबांनींही आपला हट्ट सोडला. आनंदानें मिरवणूक झाली. ( श्री सा. सच्चरित वर्ष १ लें अंक ६ पान ५५–५३–५७ )

**१ पासून खालील ११ बाबींतील लीलेचें कृष्ण व बाबा
यांच्या प्रत्येक बाबींत साम्य**

बाबांचें व तात्याबांचें बोरावरून रागावणें, रुसणें व हट्टास पेटणें.

( श्री तात्याबांनीं स्वतः सांगितल्यावरून

पुरणपोळी

कै. नानासाहेब चांदोरकरांचें पुरणाचे पोळीवरून बाबांबरोबर रागावणें, रुसणें, हट्ट धरून बसणें. बाबांनीं सरोष व सप्रेम समजूत करणें. ( श्रीसाईलीला वर्ष ६ जोड अंक १–२ पान ६६५ )

**तें कारण मनीं धरिलें । मग सरोष बोलों आदरिलें । जैसे मातेच्या कोपीं
थोकलें । स्नेह आथी ॥ ८८ ॥ तूं जाणतां तरी म्हणविसी । परी नेणिवेते
न सांडिसी । आणि शिकवूं म्हणों तरी बोलसी । बहुसाल नीति ॥ ९० ॥**

श्रीज्ञानेश्वरी अ. २ ओं.—व ९२

**शामा हट्ट**

श्री. माधवराव देशपांडे यांचें बाबावर नेहमींच रागावणें, रुसणें, व हट्ट धरून बसणें हें सर्वश्रुत आहे.

**३. चोरी, भांडणें, कलागती, व हास्य,**

मशिदींत बसून नित्य रामायण व विष्णुसहस्रनाम वाचणाऱ्या एका रामदाशास, पोटदुखीचें मिष करून, औषधासाठीं बाजारांत पाठवून त्याचे बोजक्यांतून विष्णुसहस्र-नामाची पोथी काढून घेऊन ती माधवरावांस देणें, व माधवरावांची व रामदाशाची कलागत लावणें व आपण हंसणें,

( श्री सा. सच्चरित अ. २७, पान ४८२ )

### चुंबन, भांडण

कै.आण्णा चिंचणकर व मावशीबाईचें चुंबनावरून भांडण लावणें व आपण हंसणें.

( श्री सा. सच्चरित अ. २४ पान ४०९ )

### ४. खोडया, थट्टामस्करी व हास्य

### वस्तु लपवणें, ढकलून देणें, डोळे झांकणें

तात्याबा कोत्यांचें उपरणें दडवून ठेवणें, खांबामागून त्यांना ढकलून देणें, त्यांचे डोळे झांकणें, व हें कोणी केलें असें विचारलें म्हणजे पुन्हां खांबाआड दडून बाबांनीं खदखदां हंसणें.

### पायांची गुंतागुंती

द्वारकामाईंत बाबा, तात्याबा व म्हाळसापती रात्रीं निजले असतां झोंपेंत याचे पाय त्याच्या उरावर, त्याचे पाय याच्या उरावर, कोणाचे पाय आपल्या अंगावर असें करून ठेवावें. सकाळीं उठून पाहावें व विचारावें बाबा हें कोणी केलें? म्हणजे बाबांनीं खदखदां हंसावें.

### धाबळी

भर उन्हाळ्याच्या दिवसांत, तात्याबाला धगधगीत पेटलेल्या धुनीमाईजवळ निजवावयाचें, व त्यांना झोंप लागली म्हणजे आपली धाबळी त्यांच्या अंगावर घालावयाची. यामुळें त्यांचें सर्वांग नखशिखांत घामानें डवडबे. ते जागे होईत व सर्व घाम पुशीत. बाबा हें कोणी केलें म्हणून विचारलें म्हणजे बाबा खदखदां हंसत.

### खडे

मुलें मशिदींत खडयांनीं खेळत असतां, बाबांनीं त्यांची नजर चुकवून त्यांतील एक खडा हळूच पायानें लपवून ठेवावयाचा, व खडा कोणी घेतला म्हणून विचारलें म्हणजे आपल्याला नाहीं रे माहीत म्हणून सांगावयाचें, व मुलें फारच गयावया करूं लागलीं म्हणजे मग तो खडा हळूच काढून ध्यावयाचा व खदखदां हंसावयाचें.

( बयाजी कोते व महादु फसले )

### गुदगुल्या, थट्टा व विनोद

बाबा कधीं कधीं तात्याबाला गुदगुल्या करीत, व बाबा हें काय म्हणून विचारले म्हणजे हंसत. त्यांना कधीं कधीं पोठ्या व मांडया चेपावयास सांगत, व तात्याबांनीं जरा हात वर नेला म्हणजे म्हणत "हां, उपर हात मत लगाडो, हां उपर हात मत लगाडो" व खदखदां हंसत.

### फुगडी

बाबा कधीं कधीं तात्याबाबरोबर फुगडी खेळत.

फुगडी फू, फुगडी घालिता उघडी राहे । लाज सांडोनी
एक एकी पाहे ॥ ८ ॥

( तुकाराम गाथा २४८ अभंग )

### कुस्ती व सोंगट्या

बाबा, कधीं कधीं तात्याबाबरोबर कुस्ती खेळत. तात्याबा बाबांचे ढुंगणाखालीं हात घालीत, व तसेंच त्यांना एका हातानें उचलून आपले अंगावर घेईत. अरे कोत्या, मी पडेन, मी पडेन, तुला गांठ येईल, असें म्हणून बाबा हंसत.

कधींही बाबा तात्याबाबरोबर सोंगट्या खेळत नसत; पण राधाकृष्ण आई मात्र इतर सामानाबरोबर त्यांच्याकडे सोंगट्या, पट, गंजिफा अगर इतर कोणाबरोबर स्वतः पत्ते बाग चावडींत निजावयास जात तेव्हां नेमानें पाठवीत. चावडींत गांवकरी लोक नेहमींच सोंगट्या खेळत असत व भांडतही असत.

**देवेसी कोलकाटी धरूं। अखंड लोंबी झोंबी करूं ॥**
**सारी खेळतां अस्करूं। निकरें ही भांडो ॥**

श्रीज्ञानेश्वरी अ. ११, ओं. ५४८

## ५. विनोद

### अंग रगडणें

तात्याबा बाबांचे अंग रगडीत व पाय रगडीत. पाय रगडीत रगडीत मांडीच्या वर चेपीत जाईत. तेव्हां विनोदानें बाबा त्यांना म्हणत "हां उपर मत हात लगाडो, उपर मत हात लगाडो" व हंसत.

### सदर

बाबाही केव्हां केव्हां तात्याबांचें अंग दाबीत, व चटकन् उठून त्यांच्या पायां पडत. बाबा हें काय, हें काय, असें म्हणून तात्याबा त्यांचे हात धरीत. हातांना झटका मारून बाबा पटकन् त्यांच्या पुन्हा पायां पडत व त्यांना नमस्कार करीत. बाबा हें काय करतां ? बाबा हें चांगलें का ? असें म्हटलें म्हणजे म्हणत, "गप बस! तुला काय माहीत आहे" व हंसत.

### नमस्कार

कित्येक वेळां बाबा तात्याबापुढें दोन हात जोडीत. व त्यांना दुरूनच नमस्कार करीत, व "जय देवा, जय देवा" असें म्हणत व हंसत.

### सलाम

कित्येक वेळां बाबांना, तात्याबा पालथा हात कपाळास लावून "बाबा सलाम, आलेकं सलाम, आलेकं सलाम" असें म्हणत. बाबाही तात्याबांना, तसाच कपाळाला पालथा हात लावून "सलाम, आलेकं सलाम, आलेकं सलाम" असें म्हणत व हंसत.

### वेषपालट

कित्येक वेळां तात्याबा बाबांच्या डोक्याचें फडकें सोडीत, त्यांच्या डोक्यावर आपली शिंदेशाई पगडी घालीत, त्यांच्या अंगावर आपलें उपरणें घालीत, व

एक आरसा आणून देत. मग बाबा हें आपलें रूप आरशांत पाहात, खांदे वर करीत, डोळे मिचकावीत, वेड्यावांकड्या माना हालवीत व याप्रमाणें आरशांत पाहून म्हणत कीं, "काय रे, हा कोत्या असाच दिसतो नाही रे, आणि असंच करतो नाहीं रे?" नंतर पगडी, उपरणें व आरसा तात्याबांना देऊन टाकीत.

## ६ खेळ

### पंजा

कधीं कधीं बाबा तात्याबाबरोबर पंजा खेळत. आपल्या उजव्या हाताला पंजा तात्याबांकडे करीत. मग तात्याबा आपल्या पंजाची बोटें बाबांच्या पंजाच्या बोटांतु घालीत, व एकमेक एकमेकांचीं बोटें हळू हळू दाबीत. मग बाबा जरा जोरानें तात्याबांचीं बोटें दाबीत. मग तात्याबा खूप जोरानें बाबांचीं बोटें दाबीत. मग बाबा ओरडून म्हणत, "अरे कोत्या, अरे कोत्या, माझीं बोटें मोडतो कीं काय?" असें म्हणून खदखदां हंसत.

### हयदोस धुल्ला

एकदा ताजे आले. यांत लोक खेळ खेळूं लागले. बाबा तात्याबांना म्हणाले, "तात्या, लोक काय करीत आहेत?" तात्याबा म्हणाले, "लोक हयदोस धुल्ला खेळत आहेत." बाबा नंतर द्वारकामाईचे ( मशीदीचे ) दरवाजाजवळ आले व तात्याबांचे हातांत हात घालून " हयदोस धुल्ला, हयदोस धुल्ला, " असें म्हणत म्हणत त्यांनीं द्वारकामाईतील दगडाभोंवतीं दोन तीन फेऱ्या केल्या व तात्याबांना विचारलें कीं "काय रे कोत्या, आपला हयदोस धुल्ला झाला कीं नाहीं?" तात्याबा म्हणाले, "झाला." मग बाबा म्हणाले, "हां! आतां जा." पण बाबांनीं असा हयदोस धुल्ला फक्त एकदांच केला.

कृष्णपरमात्माचे ९ लक्ष गोपी गोपाळ होते, व त्यांचीं नांवें व कामें विवक्षित होतीं.

**सर्वे नवलक्ष सवंगडे । पशूपाळ वेडे बागडे ।सुदामा बोले बोबडे ।**
**तें आवडे गोविंदा ॥ २ ॥** (एकनाथ महाराजांचे काल्याचे अभंग)
**वांकडे बोबडे । खुडे मुडे एक लुडे । कृष्णा आवडती पुढें । बहु भाविक ते ॥७॥१७२**
**गांठीचें ते सोडूं नावडे खाय आइतें दिलें । जैसे होतें मिळे संचित तैसें लागलें खावें । एकी अंगी लाविल्या राखा।एक ते मोलीव बोडके केला सपाट शिखा।एक ते आळशी**
**तळी रे वरी वाढिव्या काखा ।** ५, ६, ७ । १७० तुकारामगाथा.

### गोपी-गोपाळ व त्यांचीं विवक्षित नांवें

कृष्ण परमात्माप्रमाणें बाबांचेही असंख्य गोपी गोप होते. ते द्वारकामाईंत जमत. बाबा त्यांना विवक्षित नांवानें संबोधीत. त्यांपैकीं कांहीं येथें देतों. काशा, आपा, शाम्या,

घोडमुख्या, बाबूराव, वामन, कोंडाजी, अंडाजी, दादा, मामा, शिपुरडा गुरवडा, सोनारडा, नाना, काका, लंगडा काका, मोठा काका, परधान, आण्णा, गणू, हेमाड, भाऊ, दाढीवाला, ठकी, हलालखोर, येडा मास्तर, बोडका ब्राह्मण, घोडे डाक्टर, भटाचा कार्टा, बामणाचा पोरटा, बडे बाबा, बापूसाब, टापुसाब, अर्धा कोल्हाटी. महाध्या पाध्या, अर्धा गांडू, बुट्टया, भुट्टया, क्षिप्रा, बुट्टा भट्टया, अवदसा, रामकृष्णी, राधाकृष्णी, मावशी, दुर्गी, हेडंबी, राधामामी, बायजामामी, सइआई, ताइआई, भिमबाई, सोनिबाई, पिल्ले, नंध्या, फंध्या, चिंधिचोर, भाऊ, बाळा बोडका, भाऊ, बुटीचा जांवई तुबाजी गणपतराव बापू वगैरे वगैरे.

या सर्वांचीं दिवक्षित कामें होतीं. ज्याचें काम त्यानेंच केलें पाहिजे असा बावांचा दंडक होता. एकाचें काम दुसऱ्यास ते केव्हांही करूं देत नसत.

### पिंगा.

बाबा, कधीं कधीं माना व हात व पाय वांकडे तिकडे करून तात्याबाबरोबर पिंगाही घालीत, व खेळत.

### नाच व गाणें

कधीं कधीं बाबा द्वारकामाईंत दिवसा चारपांचचे सुमारास नाचाच्या तालावर वाकडी मान, पाय, वाकडे हात करून डोळे मिचकावून, थट्टेचे बोल बोलत, नाचत, बागडत व गाणें गात.

### मुरली पांवा

दोन्ही हातांत मुरली धरून किंवा पांवा धरून जसे कृष्ण परमात्मा दीड पायावर नाचत तसे हातांत कांहीं घेतल्यावांचून पण तसे केल्याचा देखावा दाखवून, वाकुल्या दाखवीत, डोळे मिचकावीत, दीड पायावर मागें पुढें पावले टाकीत, निरनिराळे हावभाव करीत, मजा मजा करीत, नाचत व हंसत. पण हें सर्व तात्याबा व ते दोघेच असत तेव्हां करीत. तिसऱ्याचे देखत करीत नसत.

## विलास, राजभोग.

### विडे.

बाबा विडे खात. पुष्कळ खात. रात्रीं व दिवसा खात. कोंडाजी लालभाई शेख मुसलमान रा. राक्षी ता. शेवगांव जि. नगर त्यांना विडे करून देई. त्यापैकीं एकेक ते सर्वांच्या अंगावर फेंकीत. व एक आपण स्वतः खात व त्यावर दोन घोट पाणी पीत.

श्रीराधाकृष्ण आई आल्यानंतर बाबांची सर्व राजवीलासी, राजभोग व राजैश्वर्य व्यवस्था त्याच पाहात.

शिरडींतील ८–९ वर्षांचे राधाकृष्ण आईचें चरित्र म्हणजे तो राधाविलासच होता असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं, त्या खालील कामें अगर सेवा करीत.

## रस्ते सफाई.

१, पहांटेस उठून दररोज दोन वेळ मशीदीचें (द्वारकामाईचें) पटांगण, बाबांची फेरीची व परसाकडेस जाण्याची वाट किंवा रस्ते झाडून साफ करीत.

## सकाळची निहारी लोणी-माखण हा कृष्णपरमात्माचा अत्यंत आवडणारा पदार्थ

२. दररोज सकाळीं तोंड धुण्यास ऊन पाणी, लाडू बदाम रोटी, दहिंदूधाच्या वाट्या, लोणी व खडीसाखर वगैरे पदार्थ निहारीच्या ताटांत घालून पाठवीत.

३. दुपारीं शिरा, खीर, पुऱ्या, पोळ्या, घुगऱ्या, भजीं पाठवीत.

## भोजन.

भाज्या, चटण्या वगैरेंचीं २-३ चांदीचीं ताटें भरून पाठवीत. तसेंच विडे, पाणी भरलेली चांदीची झारी ही पाठवीत.

## फराळ

४ तिसऱ्या प्रहरीं पुन्हा फराळाकरतां निरनिराळे पदार्थ पाठवीत.

## भोजन

५ सांयकाळीं भाकरी, दहींदूध, साबण्या, रेवड्या, शेंगादाण्याचे काजू, विडे, पाण्याची झारी वगैरे पदार्थ पाठवीत.

तिन्ही वेळां रोज हे सर्व पदार्थ व सामान तात्याबाबरोबर पाठवीत.

## आरति

६ त्यांनीं बाबांची पहांटेची काकडआरति, दुपारची आरति व रात्रीची शेजारति सुरू केली.

## घोडा

७ बाबांच्या संस्थानांकरतां त्यांनीं घोडा आणविला त्याचें नांव श्यामसुंदर ठेविलें.

## राजविलासी सामान

८ तासे, वाजंत्री, चवऱ्या, मोरचेलें, अबदागीर, गरूडटक्के पालखी, रथ वगैरे बाबांच्या मिरवणुकीचें सामान त्यांनीं आणविलें.

## चांदीचीं भांडीं

९ बाबांच्या पूजेकरतां, फराळाकरतां, विड्याचें सामान ठेवण्याकरतां पाणी पिण्याकरतां व स्नानाकरतां चांदीचीं भांडीं घंगाळ तांबे, लोटया, पेलें, ताटें, टक्कें, अत्तरदाणी, गुलाबदाणी वगैरे वस्तु त्यांनीं आणविल्या.

## गाद्या, लोड, तक्के, पोषाख

१० बाबांना बसण्यास व निजण्यास बहुमोल गाद्या, व टेकण्यास सुंदर भारी किंमतीचे तक्के व लोड व मिरवणुकीच्या वेळेकरतां बहुमोल पोषाख त्यांनीं आणविले,

## मिरवणुक

मशिदींतून चावडींत जाईपर्यंतची बाबांची पालखीची रथाची गुरवारची एका दिवसाआड निजावयास जाण्याची सणावारांची मिरवणूक त्यांनीं सुरू केली.

## कमानी ववेली

१२ द्वारकामाईतून मंदिरापर्यंत व चावडीपर्यंत बाबांच्या फेरीच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस कमानी करुन त्यावर छायेकरतां सायलीचे वेल लावण्याची व्यवस्था त्यांनीं केली.

## कापडी व रेशमी वस्त्रें व सामान

१३. बाबांना बसण्याकरतां सत्रंज्या, जाजमें, पायघड्यास ( द्वारकामाईतून चावडींत जावयाच्या मिरवणुकीचे वेळीं रस्त्यावर पसरण्याकरतां ) रस्त्यावर घालण्याकरतां बनाती, शालजोड्या, पैठण्या, जरीचे शेले, चावडींत व द्वारकामाईत लावण्याचे पडदे त्यांनींच आणविले.

## छडीदार चोपदार

१४. छडीदार व चोपदार, त्यांच्या चांदीच्या काठ्या, त्यांचे पोषाख वगैरे व्यवस्था त्यांनीं केली.

## दिवेबत्त्या

१५. दिवे, बत्या, टेंभे मिरवणुकी बरोबर ठेवण्याची व्यवस्था त्यांनींच केली.

## भजन

१६. त्यांनींच द्वारकामाईत मिरवणुकीचे वेळीं भजन सुरू केलें.

## ८ खाण्याचे पदार्थ देणें

## विशेष

माधवराव देशपांडे यांना रोज दुपारीं येणाऱ्या सर्व नैवेद्यांचा काला करून वाटण्याचे वेळीं आंब्याच्या फोडीची बशी, तात्याबास साभण्या रेवड्या, बर्फी पेढे, व बयाजीस कधीं कधीं पुलावा मुद्दाम राखून ठेवून बाबा देत.

## ९ मुका चुंबन

बाळा काशिराम शिंपी ज्या दिवशीं गांवांस जावयास निघे त्यादिवशीं बाबाकडे येऊन बाबा मी गांवाला जातों. दे मला मुकु असें म्हणे व बाबा त्यास मुका देत.

## १० बाबांना उचलणें

बाबांचे कमरेखालीं काठी घालून आवश्यक उचलण्यास कधीं कधीं बाबा महादु फसले व बयाजी कोते यांना सांगत व ते तसें करीत.

## ११ रग जिरविणें

कोणाचीही रग जिरवावयाची असल्यास बाबा त्यांना आपलें अंग रगडावयास सांगत. बयाजी कोते, माधवराव देशपांडे, तात्याबा कोते, महादु फसले, आण्णा चिंचणकर, मावशीबाई, दुर्गाबाई वगैरे भक्त मंडळी अंगांतून चांगला घाम निघेपर्यंत बाबांचें अंग चेंपीत. निरनिराळ्या वेळीं निरनिराळी एकेक किंवा दोन दोन मिळून चेंपीत. अंगांतून घामाच्या धारा वाहूं लागल्या, रग जिरली व अंगावरील वस्त्रें घामानें भिजून चिंब झालीं म्हणजे तीच मंडळी स्वतः होऊनच चेपण्याचें बंद करीत. पण बाबा मात्र कधींही पुरे म्हणून म्हणत नसत.

"चंद्र तेथे चंद्रिका, शंभु तेथें अंबिका" या श्रीज्ञानेश्वरींतील १८ व्या अध्यायांतील शेवटच्या श्लोकावरील भाष्यांत लिहिलेल्या दृष्टांताप्रमाणें "कृष्ण तेथें द्वारका" असलीच पाहिजे. ही दोहोंची सांगड अविभेद्य समवायी आहे. या लेख पूर्वार्धीतील संतौक्तिक, पौराणिक, भौगोलिक, भूगर्भशास्त्रीय, दंतकथिक व प्रात्यक्षिक उपलब्ध माहितीवरून असें दिसतें कीं आजपर्यंत ( जगाच्या प्रारंभापासून ) कितीही कृष्णावतार झाले असले तरी आपल्यास फक्त तीनच कृष्णावतारांची म्हणजे तीनच द्वारकानगरींची माहिती मिळते. कृष्ण परमात्मा निजधामास गेले त्या वेळीं बुडविलेली किंवा रुसलेल्या, श्री रुक्मिणीमाईंची समजूत करण्याकरतां दक्षिणेंत दिंडिर वनांत आले तेव्हां त्यांच्या सर्व सोळा हजार स्त्रिया परमात्म्यांचा शोध करण्याकरतां दिंडिरवनांत–पंढरीस–आल्या तेव्हां त्यांचे मागें समुद्रांत बुडविलेली द्वारका पाहिली होय. श्री पुंडलिकांच्या वराप्रमाणें बुडविलेल्या द्वारकेची सर्व संपत्ति व इतर सर्व परिवार आणून दिंडिरवनांत निर्माण केलेली दुसरी द्वारका (हल्लींचें पंढरपूर) व नंतर ऋषिमंडळींच्या विनंतीवरून समुद्रापासून १२ योजनें जागा मागून घेऊन निर्माण केलेली हल्लींची काठेवाडांत असलेली तिसरी पश्चिम द्वारका.

पंढरपुर क्षेत्र मंडळांत शिरडी येते. म्हणून शिरडी ही फार फार पुरातन काळीं द्वारका–दक्षिण द्वारका होती किंवा दक्षिण द्वारकेचा अत्यंत महत्त्वाचा भाग होता असें अनुमान निघतें.

या लेखाच्या उत्तरार्धांतील बाबांच्या उपलब्ध असलेल्या अल्प चरित्रावरून व कृष्ण चरित्राला जुळणाऱ्या विविध प्रकारच्या लीलांवरून बाबा हे कृष्ण होते असें खात्रीशीर अनुमान निघतें. व बाबा मशिदीस द्वारका कां म्हणत व उशाशीं वीट घेऊन कां निजत, या गोष्टींचाही चांगलाच उलगडा होतो, व बाबांची उत्पत्ति नक्की कशी यावरही चांगला प्रकाश पडतो, असें माझ्या अल्प समजुतीस वाटतें.

बाबा शिरडींत आल्या दिवसापासून एक दिवसा आड द्वारकामाईतून चावडींत निजावयास कां जात असत याबद्दल अद्याप कांहीं खुलासा होत नाहीं. असो. तोही त्यांच्याच कृपेनें व प्रेरणेनें पुढेंमागें होईल.

आतांपर्यंत यथामति मिळविलेल्या संशोधनसामग्रीवरून शिरडी ही द्वारका व बाबा हे कृष्ण अशी खात्री होते. तथापि तिला शिरडींत प्रत्यक्ष कांहीं ठिकाणीं उत्खनन केल्याशिवाय सिद्धांतस्वरूप येणार नाहीं याची मला पूर्ण जाणीव आहे. शक्यतो प्रयत्न केला आहे. तज्ज्ञांनीं याचा अंतःकरणपूर्वक विचार व मनन करून या कार्यास शक्य ती मदत करून आपल्या ज्ञानाचा लाभ मला देऊन मला प्रोत्साहन द्यावें व दिशा दाखवावी. अशी माझी वाचकवृंदास अति नम्र विज्ञप्ति आहे. शेवटीं झालेली वाङ्मयकुसुमांजलि अनन्य भक्तिप्रेमानें प्रथम श्रीदत्तगुरु साइबाबांचे पुण्यचरणीं अर्पण करून नंतर जनी जनार्दनासही समर्पण करून हा छोटासा लेख संपवितों.

या संशोधन कामीं ठिकठिकाणीं जे नकाशे दिले आहेत ते श्री. मोहनीराज बालाजी औटी, शाळा मास्तर हेरदाळें ता. कोपरगांव यांनीं तयार केलें त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

ठाणें, गुरुवार
मिति फा. श. ९
शके १८५९ ता. १०-३-३८

श्री साइपदरज दासानुदास,
बा. वि. देव
बाबांचें बाळ

# विक्रीस तयार पुस्तकें. पोस्टेज व व्ही. पी. खर्च अलाहिदा पडेल.

| कापडी बांधणीचीं:- | रु. आ. पै |
|---|---|
| १ श्रीसांईलीला मासिक वर्ष १ ते १३-प्रत्येक वर्षास | ३-४-० |
| १ श्रीसाईसच्चरित, कै. अण्णासाहेब दाभोळकरकृत | ३-८-० |
| २ श्रीकेकावली, यशोदा पांडुरंगी टीकेसहित | २-०-० |
| कागदी बांधणीचीं- | |
| १ श्रीसाईबाबा ऑफ शिरडी, रा. ब. प्रधानकृत | १-०-० |
| श्री. बा. वि. देवकृत कागदी बांधणीची- | |
| १ श्रीसाईबाबा पुण्यतिथि कीर्तनाख्यान | ०-२-० |
| १ श्रीसाई दत्तजन्म कीर्तनाख्यान | ०-२-० |
| १ कै. श्री. नानासाहेब चांदोरकर आख्यान | ०-२-० |
| १ श्रीद्वारकामाई संशोधन अंक | ०-४-० |
| १ श्रीसाईबाबा व त्यांचे गुरुबंधु श्री. कवाडकर महाराज | ०-४-० |
| इतर पुस्तकें | |
| १ श्रीसाईलीला सुटे अंक जुने व नवे प्रत्येक अंकास | ०-४-० |
| १ कै. श्री. हरि सीताराम दीक्षित चरित्र अंक | ०-८-० |
| १ कै. श्री. म्हाळसापती चरित्र अंक | ०-४-० |
| १ श्रीसद्गुरुसाईगुणोपासना | ०-२-० |

वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील:—

१ रा.रा.रामचंद्र रामकृष्ण सामंत, ४५ टर्नर रोड, वांद्रें, मुंबई नं. २०

१ रा. रा. बाळा पिलाजी गुरव, मु. शिरडी. पो. रहाता, जि. नगर,

दक्षिणा प्राइझ कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश,
विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनीं उत्कृष्ट अभिप्राय
दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणूमहाराज ह्यांनीं.....
नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चाफेकर, M. A, LL. B.
ह्यांनीं प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

**श्री पासष्टी-भावार्थ-दीपिका**

हा नरेंद्र बुक डेपो, दादर, मुंबई येथें मिळेल.

कापडी प्रत १० आणे    साधी प्रत ८ आणे,

**सांडू ब्रदर्स**

ओरिजिनल

**ब्राह्मी तेल**

मेंदूचे सर्व विकारांवर

**ख र्जु रा स व**

दमा, खोकला, व क्षय यांवर

**महारास्नादि काढा योगराजगुग्गुळ**

सर्व प्रकारचे वातविकारांवर

**द. कृ. सांडू ब्रदर्स** आर्यौषधि-कारखाना.
चेंबूर-मुंबई.

हें पुस्तक श्रीलक्ष्मी-नारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें
रामचंद्र काशीनाथ तटणीस यांनीं छापून
रामचंद्र रामकृष्ण सामंत यांनीं ४५ टर्नर रोड, वांद्रें (मुंबई २०) येथें प्रसिद्ध केलें.